म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र. नं. ३२२२

१८३२



REFBK-0004726

त्याक्षणीं । स्वप्न संपुनी । तिच्या लोचनीं । जागृती आली ॥
दृश्यें तीं स्वप्नांमधलीं ॥ लोपलीं ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०५५
ठाणे

संदर्भ नं. १०६०
ता. १३/३/३३
ठाणे

स्थळप्रत
म.ग्रं.सं.ठाणे

संदर्भ
ग्र. सं. क्र. ठाणे

नमःश्रीसिद्धराजाय !

# लीलेचा संसार

सामाजिक खंडकाव्य

क. ठा. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 8026
प्र. ठाणे (स्था. १८९३)
REFBK-0004726
REFBK-0004726

लेखक

श्री. त्र्यंबक गंगाधर धारपुरे, मिरज.

' भाव-गीतें, ' ' कुण्हेरांची फुलें, ' ' पवित्र-नेत्र, '
' नक्षत्र-संभव, ' संकृताचें मराठी रूपांतर, ' भिल्लराज-
स्तोत्र, ' ' बिल्व-दलें ' वगैरे काव्यांचा कर्ता

प्रस्तावनालेखक,

श्री. वा. कृ. भावे, बी. ए. संपादक ' केसरी ' पुणें.

निरीक्षण लेखक

श्री. प्र. के. अत्रे, बी. ए. बी. टी. टी. डी. (लंडन)

किंमत १२ आणे.

प्रकाशकः—
त्र्यंबक गंगाधर घारपुरे,
पेठ सदाशिव, २९७ पुणें.

प्रथमावृत्ती
डिसेंबर १०।१२।३२.

मुद्रकः—
लक्ष्मण भाऊराव कोकाटे,
हनुमान प्रेस, २०० सदाशिव पेठ, पुणें शहर.

६७६
ग्रंथ संग्रह
९.०.६०
अ. क्र.
ता. २३/३/३३
म. मं.

# " क्षमस्व ! "

शिस्तीच्य बाबतींत शिकस्त केली तरी, शेवटीं लग्नामध्यें घाई ही होतेच ! " घाई " हें लग्नाचें ठराविक वैशिष्ट्यच आहे कीं, काय कोण जाणें, कांहींही असो, पण तें–एकं प्रकारें शोभाच आणतें ! आणि घाई तरी मंगल मुहूर्त साधण्यासाठींच नाइलाजास्तव होते. त्यामुळें घाईत होणाऱ्या क्षुल्लक चुकांकडे दुर्लक्ष करून तत्वाकडे नजर देणारी सूज्ञ माणसेंही त्यावेळीं असतातच !

चालढकालं कामें करणाऱ्या तसेंच शिस्तीच्या बाबतींत " अहि नकुला " इतकें सख्य असणाऱ्या ऐदी माणसाच्या अस्वाभाविक तारांबळीलाही कोणी कोणी " लग्नघाई " असें ठासून म्हणण्यास मागेंपुढें पहात नाहींत ! एका दृष्टीनें तेंही खरेंच, कीं ते " मागेंपुढें " पहातच नाहींत. " मागें पुढें " न पाहणारे म्हणजे ते डोळे असून आंधळे, अर्थात् त्यांचे विचार " आंधळ्या कोशिंबिरीच्या खेळांत " शिरल्यावांचून कळणें कठिणच ! शिवाय तसाही " कोशिंबिरीसाठीं " प्रयत्न केला तरी ती हातीं लागेल न लागेल याविषयीं शेवटपर्यंत मन साशंकच असणार !

अशा तऱ्हेनें " लग्न–घाई " हा सामासिक शब्द त्यांच्या " मतलब सिंधूंत" वापरलेला आढळला तरी सूज्ञ माणसें तसल्या लग्न–घाईला लग्न–घाई असें न म्हणतां " घाईकरितां लग्न " असेंच म्हणणार !

प्रस्तुत विचार इतके सुचण्याचें कारण माझ्या या पुस्तक छापणेंच्या बाबतींत तोच प्रकार झाला. लग्न जुळवून पार पाडणें किंवा ग्रंथ लिहून प्रसिद्ध करणें हे प्रसंग दोन, पण कार्य बाहुल्य दोहोंत एकच ! दोन्ही प्रसंगीं होणाऱ्या तारांबळीची जाणीव त्या त्या कार्य कर्त्यांनाच असणार !

पण ' लग्न–घाईतही ' कारवाई करणेस विहिणबाई असतातच कीं नाहीं ? विरुद्धपक्षाची ढिलाई असो, नसो, वेळीं अवेळीं आपली बढाई मारण्यास त्या आल्याच म्हणून समजावें ! त्यांचें चढाईचें धोरण शाब्दिक वादविवादाची लढाई जुंपण्यास पुरेसें होतें !

सूज्ञांस विशेष सांगावेंसें वाटत नाहीं. त्यांचें प्रेमळ व उदार अंतःकरण बालकवीच्या काव्यांत "प्रीति माझ्या हृदयांत करी वास। न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास"॥ असेंच सांगत असतें! म्हणून तर मला त्यांना सांगावेंसें वाटतें कीं—
"कांहीं घाई झाली असल्यास

—क्षमस्व!"

काव्यरचनाकाल:—
ता. १०।४।३० ते २८।१०।३२.

प्रकाशन दिन:— ता. १०।१२।३२
पुणें सदाशिव २९७

—त्र्यं. गं. धारपुरे



# " समर्पण "



तो काल ! तो क्षण ! आठवतांच आपोआप आशेच्या आशाळभूत चंचल दृष्टिपुढें त्यावेळच्या चिमण्या जगांतील तीं बालपणचीं चित्रविचित्र चित्रें चित्रित झालेलीं एकदम उभीं राहिलीं !

भविष्यकालाची भेदक दृष्टी व वर्तमानकालाची वर्तुलाकार संकुचितदृष्टी, या विषमतेच्या स्पर्धेत विषमतेच्या झळा जाणत्या जीवाच्या जीवितास लागतांच, प्रसन्नतेच्या प्रभातीं प्रेमळ प्रभाकराच्या प्रभेंत बाळवृत्तीच्या विकासप्रवण कोंवळ्याकळ्या हांसत असतां, मनाची एकतानता करणारा त्यावेळचा तो बालपणचा अत्यंत नितांत रम्य सुंदर देखावा आठवून कोणाच्या मुखांतून अरेरे ! !! " तेहिनो दिवसाः गताः" असे उद्गार निघणार नाहींत ?

आयुष्याच्या पहिल्या मार्गावर जीवाचें फूलपांखरूं स्वच्छंदानें विहार करीत असतां ज्यांचा सहवास हितावह झाला. पुत्रवत् ज्यांनीं प्रेम केलें व बालमनाच्या बालअंकुरांना नीट वळण लाविलें ! तेंच भावी आयुष्याच्या रूपरेषेस कारणीभूत झालें !

अशाप्रकारें पुणें मुक्कामीं ज्यांच्या बोर्डींगांत आयुष्याचा एक काळ थोडा कां होईना पण योग्य शिक्षणांत गेला त्या माझ्या—

**ती. गुरुवर्य शंकर गणेश लवाटे ऊर्फ भाऊ**

**यांना " लीलेचा संसार " हें काव्य सप्रेम समर्पण !**

भाऊ ! —

वयाच्या याच्या वाढत्या वळणानें देहांत हातभर अंतर पडलें; त्यामुळें कदाचित् "हा कोण ?" हें प्रश्नार्थक सर्वनाम प्रश्नरूपानें पुढें उभें राहून विचाराच्या मध्यस्थीच्या प्रस्तावनेची ओळ वाचल्याविना आपणांस ओळख चटकन् पटणें क्षणभर कठीण वाटेल !

उच्च शिक्षणाची हाव पुरी न झाल्यानें तिच्यावर निराशेच्या निशेचें आवरण पडून विचारांचें माजलेलें रण, अंतःकरण होरपळूं लागलें ! "पुढें काय ?" या मानवी स्वभावाच्या वैचित्र्याचें चित्र स्वतःच्या स्वभावाच्या प्रत्यक्षतेच्या पुराव्यावर केवळ कल्पनेच्या कलमानें काळजीनें काढीत असतां विवेकाच्या प्रखर उन्हांत त्याचे रंग उडूं लागून कागदाचा कोरेपणाच त्यावेळीं अधिक खिन्नपणा दाखवूं लागला ! तथापि बालपणीं माझें अंतःकरण सुसंकृत करून त्यांत सद्विचारांचें जें बीजारोपण केलेंत त्यास काळानें कां होईना पण मधुर फळें आल्यावांचून कशीं राहतील ?

आणि तीं फळें कृतज्ञतापूर्वक आपणांस अर्पण करण्याचें औचित्य मी कां साधूं नये !

ता. १०।१२।३२, पुणें.

आपला नम्र,
त्र्यंबक गंगाधर धारपुरे.

नों. नं. ........
ठाणे

# प्रस्तावना.

इतर समाजाप्रमाणें आपल्या हिंदू समाजातहि कांहीं दोष आहेत. सासुरवास हा त्यापैकींच एक होय. सासूनें सुनेला कां छळावे याची उपपत्ती वेगवेगळ्या रीतींनीं लावतां येते. पूर्वी मुलींचीं लग्नें अगदीं बालपणीं म्हणजे वयाच्या पांचव्या सहाव्या वर्षीं होत. अशा मुली अडाणी असाव्या, त्यांच्या अंगीं संसारास आवश्यक त्या शिस्तीचा व गुणांचा उद्भव झाला नसावा हें अगदीं सहाजिक समजण्यास हरकत नाहीं. इतकी लहान व नेणती मुलगी सासरीं आली म्हणजे तिला संसारदक्ष बनविण्याची जबाबदारी सासूवरच पडे. मुलगी सून म्हणून आपल्या घरीं नांदत असली तरी तिचा जन्म परकीय कुटुंबांतच झाला असल्यामुळें तिजविषयीं मायेचा नैसर्गिक ओलावा सासूच्या हृदयांत कोठून सांपडणार ? तथापि मायेच्या ऐवजीं सासूला सहानुभूति वाटावी अशी अपेक्षा कोणी करील. परंतु अशी सहानुभूति वाटावयास जें शिक्षण व जी उदार दृष्टि सासूस असली पाहिजे ती नसल्यानें सुनेच्या हातून कामधामांत कांहीं चूक घडल्यास तिला योग्य ती दिशा दाखविण्याऐवजीं मारहाणीनें ताळ्यावर आणण्याकडेच सासूची प्रवृत्ति होत असे. यामुळें लहान मुलींपुढें सासू व सासर हीं दोन नांवें काढतांच भीतीनें तिचा थरकाप उडत असल्यास नवल काय ! अशा स्थितींत सास्वांनीं सुनांना छळल्याचीं उदाहरणें मागील पिढीपर्यंत इतकीं घडत आलीं आहेत कीं, त्यांवर स्त्रियांनींसुद्धां पुष्कळ शोकपर गाणीं रचलीं आहेत.

कवि रा. त्र्यंबक गंगाधर धारपुरे यांनीं रचलेले ' लीलेचा संसार ' या नांवाचें प्रस्तुत काव्य त्याच धर्तीवर आहे. मात्र तें आधुनिक कालांतील असल्यामुळें पूर्वींच्या गाण्याहून अधिक ठाकठिकीचें व विविध चालींचें आहे. पूर्वकालापेक्षां प्रस्तुत कालांत पुष्कळ फरक पडला आहे. सर्वत्र शिक्षणाचा प्रसार झाला आहे. स्त्रियांतहि शिक्षित स्त्रिया मोठ्या प्रमाणांत आढळूं लागल्या आहेत. शारीरिक शिक्षा हा मुलांना वळण शिकविण्याचा जुना उपाय शाळांतूनहि बंद पडल्यासारखा आहे. तोच परिणाम गृहरूपी शाळेंतहि सासू-सुनेच्या नात्यांतहि दृष्टोत्पत्तीस येणें क्रमप्राप्त होय. परंतु तितकी सुधारणा सर्वत्र निरपवाद झाली नाहीं ही

दुःखाची गोष्ट असून तिचें प्रत्यंतर " लीलेच्या संसारांत " पहावयास मिळतें. सद्यः कालीं फरक पडला आहे तो असा कीं, सासवा या बऱ्याच अंशीं अशिक्षित आहेत पण सुना शिक्षित होत आहेत. तथापि याचा परिणाम सुनांना हितावह न घडतां सुनांच्या अधिक छळासच कोठें कोठें कारणीभूत झाला आहे. सुनेला सासूनें छळावें याला ज्या सबबी सासूनें मनांत योजून ठेवलेल्या असतात त्यांत सून शिकलेली आहे ही एक नवी सबब भरीला आली. शिवाय आणखीहि सबब सांगतां येईल. सासूचें वळण जुनें व सुनेचें वळण व आवडी नावडी नव्या या जुन्या-नव्यांचा खटका उडून नव्याच्या अप्रीतीमुळें सुनला छळण्याची दुर्बुद्धि सासुला झाल्यास ती अस्वाभाविक नव्हे.

प्रस्तुत कथानकांतील नायिका लीला हिचा अमानुष छळ तिची सासू म्हाळसाबाई व नणंद दुर्गा यांनीं केला व अखेर लीलेनें त्या छळाला त्रासून जीव देण्याकरितां विहिरींत उडी टाकली. पण सरकारी वारंट चुकविण्यासाठीं वेषांतर केलेला तिचा सुशिक्षित व देशभक्त बालमित्र धैर्यधर ( यशवंत ) त्या भयाण स्थलीं असतां त्याला आवाज ऐकूं आला व त्यानें तिला बाहेर काढलें. यापुढच्या लीलेच्या संसाराला निराळें वळण लागून ती व तिचा नवरा कमलाकर यांनीं सुखानें आयुष्य घालविलें. इतकेंच नव्हे तर तिची सासू व नणंद या शुद्धीवर येऊन त्याहि योग्य मार्गाला लागल्या. सासू म्हाळसा ही नांवाप्रमाणें कजाग व नणंद दुर्गाही कृत्या दाखविलेली आहे. त्यायोगानें लीलेचा कांहींहि अपराध नसतां त्यांनीं तिचे हाल कां मांडावे याची उपपत्ति लागते. परंतु ती पुरेशी नसल्यामुळें त्या भयंकर छळाची शक्यता मनाला तितकी नीटशी पटत नाहीं. छळानें वैतागलेली लीला जीव द्यावयास गेलीच पण तिनें जीव दिला नसतां तरी तिचा जीव घेण्याचा बेत सासूनें व नणंदेनेंहि केला होता ही गोष्ट अतिशयोक्तीची वाटते.

अशा रीतीनें कथानक गुंफण्यांत थोडासा सैलपणा राहिल्याचें आढळून आलें, तरी सासवांनीं सुनांचा छळ करूं नये, त्यांना स्वतःच्या कन्येप्रमाणें वागवावें हा कवि रा. घारपुरे यांचा अभिप्रेत हेतु प्रस्तुत सहज सुंदर काव्यांत परिणामकारक रीतीनें साधला असल्याचें नमूद करण्यास खरोखर आनंद वाटतो. हें खंडकाव्य असून त्यानें पुस्तकाचीं ९४ पानें व्यापिलीं आहेत. त्याच्या ओळीच मोजल्या तर त्या तीन हजारांहून अधिक भरतील. अर्थात् हें काम

अत्यंत परिश्रमाचें व आवडीचें आहे यांत संशय नाहीं. कथानकांत विविध प्रसंग गोवून तें मनोरंजक बनविण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. लीला दळत असतां तिच्या तोंडचीं गाणीं गोवलीं आहेत तीं मधुर व हृदयास चटका लावणारीं आहेत. दमयंतीचें गाणें शोकरसात्मक आहे. ' जुनाकाळ ' आणि ' नवाकाळ ' हें गाणें केसरींत प्रसिद्ध झालें होतें. त्यांत दोन्ही काळांतील दाखविलेला विरोध मार्मिक व सत्यास धरून आहे. ' संन्याशाचा संसार ' या गाण्यांत नाजुकपणाची लकेर असून कविची मार्मिकता व्यक्त होत आहे. कथानकाचें मुख्य स्थळ एक मध्यम प्रतीचें गांव हें असून त्यांत वर्णिलेली लोकरीति यथातथ्य आहे. प्रचलित चळवळी कशा चालतात, त्यांत कित्येक स्वार्थसाधू लोक शिरून आपला हात कसा धुवून घेतात या गोष्टी सर्वांच्या परिचयाच्या आहेत.त्या कवि घारपुरे यांनीं कुशल लेखणीनें लोकनिदर्शनास आणून त्यापासून योग्य तो बोध घेण्याचा मार्ग जनतेस मोकळा करून दिला आहे. दृश्य तिसरें यांत दिवाकर ऊर्फ शामराव, नाना वगैरे पात्रें उद्बोधक असून तीं आदर्शभूत आहेत. किंबहुना " लीलेचा संसार " या काव्यांतील सर्वच पात्रें जगाच्या संसारांत प्रत्यक्ष वावरणारीं असून तीं मानवी स्वभावाचीं द्योतक आहेत. प्रस्तुतच्या काव्यास काव्यबद्ध नाटक म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं ! कारण नाटकाप्रमाणेंच यामधलीं संविधानकें जुळलेलीं आहेत व नाटक लिहिण्यास लागणारे गुण ठायीं ठायीं व्यक्त झालेले आहेत. यमक, मात्रा वगैरे अनेक काव्य–बंधनें सांभाळून कवि घारपुरे यांनीं आपली लेखणी सफाईदार चालविली आहे. यावरून त्यांचें भाषेवरील प्रभुत्व सहज कळण्यासारखें आहे. एकंदर काव्याची भाषा सोपी व ज्या त्या प्रसंगाप्रमाणें खुलणारी आहे. ' गडगडाट आणि विद्युत्पात ' या प्रकरणांत रा. घारपुरे यांना रौद्ररस प्रकट करण्यांत चांगलेंच यश प्राप्त झालें आहे. सासू व नणंद यांनीं लीलेला क्रूरपणानें मारहाण केली तो प्रसंग रंगविला आहे. सदर प्रसंग वाचीत असतां सासू म्हाळसा ही कैदाशिणीप्रमाणें डोळ्यासमोर उभी रहाते. लीला विहिरींत जीव द्यावयास घरांतून निघाली त्या प्रसंगाचें वर्णनही अत्यंत शोकरसपरिपूर्ण आहे. रात्रीची वेळ. घरांत माणसें निजलेलीं, दिवा मिण मिण करणारा, वारा सुटलेला असा वेळीं लीला घर सोडून बाहेर पडली. तेव्हां

' पदराने अश्रु पुसुनी ।
उंबरातील त्या वंदूनी ॥ क्षण उभी ।
त्या स्नेहयुक्त वातीला ।
भाव सर्व हृदयामधला ॥ जणुं कळे ॥
वाऱ्याचा तों ये झोत ।
ती विझतां विझतां वात ॥ वाचली ॥
मार्गातच तुळशी देवी ।
ती मस्तक भावें लववी ॥ तिजपुढें ' ॥

इत्यादि देखावा दिसला. तो पुढें घडणाऱ्या गोष्टींचा निदर्शक असून त्यांत कवींची कोमल, सात्विक व धर्मप्रवणवृत्ती उत्तम रीतीनें प्रकट झाली आहे. काव्याविषयीं थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास काव्य वाचित असतां ते ते प्रसंग प्रत्यक्षच घडत आहेत कीं काय असा भास क्षणोक्षणीं झाल्यावांचून रहात नाहीं. ' रसात्मकं काव्यम् ' हा काव्यांतील मुख्य गुण. तो अथपासून इतिपर्यंत प्रतीत होत आहे. कवित्व हा निसर्गदत्त गुण आहे व तो कवि घारपुरे यांच्या अंगीं चांगला वसत आहे. ते स्वतः होतकरू आहेत व खंडकाव्य हा त्यांचा प्रयत्न पहिलाच असून त्यांत त्यांनीं यश मिळविलें आहे. काव्यनिर्मिती हेंच कार्य त्यांना आपल्या आयुष्याचें ध्येय या नात्यानें चालवावयाचें असल्यास त्याला परिणत स्वरूप आणण्यास त्यांना अद्यापि भरपूर काळ आहे. त्या काळांत त्यांनीं आपल्या गुणास पैलू पाडून त्यांना कलावान् बनविल्यास त्यांच्या गुणांतील सौंदर्य पूर्णत्वानें प्रकट होईल. यासाठीं संस्कृत महाकवींच्या काव्याचें काळजीपूर्वक वाचन, साहित्यशास्त्राचें परिशीलन; इंग्रजी काव्याचा अभ्यास यांची त्यांनीं जितकी जोड द्यावी तितकी थोडी आहे. अभिजातपणा म्हणतात तो हालाच. तो त्यांनीं साध्य करावा असें त्यांस सुचवून प्रस्तावना लिहिण्याचें हें आनंददायक काम संपवितों.

पुणें.
गुरुवार ता. १।१२।३२

वासुदेव कृष्ण भावे.

# निरीक्षण

मराठींत खंडकाव्यें निर्माण होत नाहींत म्हणून हिरमुष्टी असलेले रसिक कांहीं कमी नाहींत. लघुकाव्याच्या या मोसमांत खंडकाव्यांना फारशी मागणी नसल्यामुळें त्यांची पैदास कवींना तितकीशी परवडत नाहीं ही अर्थशास्त्राची भाषा झाली; तथापि, कलेच्या दृष्टीनें एकाद्या कथानकाला कादंबरीचा किंवा नाटकाचा ऐसपैस पेहेराव जितका साजून दिसतो, तितकी कवितेची नियमबद्ध व वृत्तमय जबरदस्ती त्याच्या प्रकृतीला फारशी मानवत नसावी. कसेंही असलें तरी भव्य व उदात्त स्वरूपाचीं महाकाव्यें हें वाङ्मयाचें वैभव आहे असें समजणारे रसिक जोपर्यंत आहेत, तोपर्यंत खंडकाव्यांची आवश्यकता ही भासणारच. या वैभवाच्या भांडागारांत थोडी तरी भर दरवर्षी पडत आहेच. या दृष्टीनें प्रस्तुत काव्याची भर कांहीं अनुपेक्षणीय नाहीं असें मला वाटतें.

प्रस्तुत खंडकाव्याचे कर्ते रा. घारपुरे हे कांहीं नवशिके कवि नव्हत यापूर्वी देखील त्यांनीं एक दोन लहानशीं खंडकाव्यें प्रसिद्ध केलेलीं आहेत. व त्यांपैकीं कांहींचीं मजल दुसऱ्या आवृत्तीपर्यंत गेली असल्याचें मला कळतें. त्यामुळें प्रस्तुतसारखें प्रदीर्घ खंडकाव्य लिहिण्यास लागणाऱ्या साधनसामुग्रीची व सामर्थ्याची त्यांच्याजवळ सिद्धता होतीच.

सासूनणंदांनीं केलेला गरीब सुनांचा अमानुष छळ हा या काव्याचा मुख्य विषय आहे. हा विषय आमच्या मराठी लेखकांना अत्यंत प्रिय आहे व याजवर आजपर्यंत अनेक कादंबऱ्या, नाटकें व काव्यें निर्माण झालेलीं आहेत. याच विषयावर मराठींत यापूर्वी प्रसिद्ध झालेले एक खंडकाव्य रसिकमान्य आहेच. अमेरिकेंत गोऱ्या लोकांनीं नीग्रो गुलामांची जितकी गांजणूक केली नसेल, दक्षिण आफ्रिकेंत हिंदी मजुरांचा वसाहतवाल्यांनीं जितका छळ केला नसेल तितकी गांजणूक व छळ

आमच्या मराठी सास्वांनीं आपल्या सुनांचा केलेला आहे हें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. ज्यावेळीं, आमचे जवानमर्द ब्राह्मणभाई उत्तरहिंदुस्थानांत मोठमोठ्या लढाया मारण्यांत गुंतलेले असत, त्यावेळीं त्यांच्या वीरपत्नी आपल्या पिढीजाद पराक्रमाची तहान आपल्या स्नुषांवर भागविण्यांत गुंग असत. तिकडे शत्रूचीं थोबाडें रंगत असतांना इकडे सुनांची श्रीमुखें रंगलीं जात असत. कर्ते पुरुष मुलुखगिरीवरून परते आले तरी घरांत सासूसुनांची रणधुमाळी चाललेली असावयाचीच ! द्वंद्वयुद्धांत तिऱ्हातांनीं हात घालणें हा युद्धधर्म नसल्यानें, ती रणधुमाळीची मौज दुरून कौतुकानें पहाण्यापलिकडे अगर त्या बाबतींत उपेक्षेचें सोंग आणण्यापलिकडे पुरुषवर्गाची मजल गेली नाहीं ! अशा तऱ्हेनें एक वेळ आमच्या स्त्रियांनीं देखील पुरुषार्थाचें पराक्रम गाजविलेले आहेत व अद्यापिही त्या क्वचित् गाजवितही असतील ! धन्य ते पत्नीभीरू श्वशुर, धन्य ते मातृभक्त पती व धन्य त्या सहनशील स्नुषा ! पूर्वीं पतिनिधनानंतर सती जाण्याची जी चाल होती तिच्या मुळाशीं पतिभक्तिपेक्षां सासूची भीति अधिक असावी असें देखील वाटतें. पाश्चात्य देशांत सासू हा थट्टेचा विषय असला तरी आमच्याकडे सासू ही संस्था अद्यापिही भीतीप्रद समजली जाते.

सदर काव्यांत नायिका लीला हिचा तिच्या सासूनें केलेला छळ याच दृष्टीनें भडक रंगांत रंगविलेला आहे. एवढेंच नव्हे तर तिचा खून करण्याचा बेतही सासूनणंदांनीं केलेला दाखविला आहे, तें कांहीं अशक्य नाहीं. सुनेच्या अंगावर राकेल तेल ओतून तिला जिवंत जाळणाऱ्या सास्वांच्या गोष्टी अगदीं सुशिक्षित कुटुंबांत देखील घडून आल्याचें आपण एक वेळ ऐकलेलें आहे. या कथेचा शेवट आनंददायक केलेला आहे. ज्या संसारांत अशा तऱ्हेच्या सास्वा असतात त्यांचा शेवट आनंदांत होणें कधींही शक्य नसलें तरी या काव्याची सुखान्त समाप्ति वाचकाऱ्या

दृष्टीनें योग्यच ठरेल. शेवटीं, उपकथानकाच्या अनुसंधानानें जो पुनर्विवाहाचा प्रसंग दाखविलेला आहे तो देखील मराठी काव्यांत अभिनव असून कवीच्या सुधारणाप्रियतेचा द्योतक म्हणून समजावयाला हरकत नाहीं.

काव्याची रचना सफाईनें झालेली आहे हें स्पष्टपणें सांगावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं. वृत्त व शब्दरचना भावनानुकूल आहेत. कांहीं कांहीं प्रसंग चातुर्यानें व कोमलतेनें रंगविलेले आहेत. उदाहरणार्थ लीलेला आपल्या पतिविषयीं जें मधुर स्वप्न पडलेलें आहे त्याचें वर्णन कवींनी फारच काव्यमय रसिकतेनें केलेलें आहे.

दारांत पडे पाऊल । प्रेमाचें गालीं फूल । विकसलें,
मंदस्मित खुललें त्यांत । चंद्रकोर जशि गगनांत । चवथिची,
प्रेमाच्या अंतःकरणीं । लज्जेची नाजुक राणी । हांसली,
मृदुगालीं सौंदर्याचें । प्रतिबिंब नव्या प्रेमाचें । विलसलें,

मधून मधून विनोदाच्या छटाही दिलेल्या आहेत. कथानकाच्या ओघांत जीं स्फुट गाणीं अंतर्भूत केलेली आहेततीं देखील प्रेमळच आहेत. कथानकाचो खुलावट अधिक स्पष्टपणें व्हावयास पाहिजे होती. तसेंच मध्यभागीं गद्य पत्रें, इंग्रजी तार इ० जो भाग आला आहे तो काव्यास पोषक नाहीं. तथापि, हें खंडकाव्य श्री. घारपुरे यांच्या काव्यशक्तीसंबंधीं आदर व आशा उत्पन्न करील असेच आहे, एवढें सांगितलें म्हणजे त्यांत सगळें आलें.

ता. ६।१२।३२. प्रल्हाद केशव अत्रे.

# लीलेचा संसार.

## प्रकरणें.

### दृश्य पहिलें.


पृष्ठें

१ काय केलें जळचरीं । धीवर त्यांच्या घातावरीं, ... १
२ देवळांत ! ... ... ४
३ लीलेचें संसार–चित्र ! ... ५
४ बालपणचा थोडा इतिहास १४
५ कलहाच्या ठिणग्या ! ... १५
६ सुख आणि दुःख ! ... १६
७ निराशेंत निराशा ! ... १८
८ आगीच्या भयंकर ज्वाळा ! २०
९ प्रकाश कीं अंधार ! ... २२
१० गडगडाट आणि विद्युत्पात २४
११ लीलेचें संसार–चित्र ! ... २८
१२ प्रसन्नतेच्या पोटीं विषण्णता ! २९
१३ ध्यानीं तें मनीं ! ... ३४
१४ भयंकर दृश्य ! ... ३५
१५ दुर्विचारांचें महायुद्ध ! ... ३७
१६ दुर्दैवाची कामगिरी ! अरेरे !!! ... ... ३८
१७ इकडे ... ... ४१
१८ सत्यमेव जयते ! ... ४४


### दृश्य दुसरें,


पृष्ठें

१ पुण्याहून प्रयाण ! ... ४७
२ उद्वेगाचे उद्गार ! ... ४८
३ विरह, उपरति, आणि समाधान !
४ अंधार !!! ... ५६
५ अंधारांतील दोन प्रकाश–किरणें ! ... ... ५९
६ विघ्नांतील वीघ्न ! ... ६३
७ पापाचें प्रायश्चित्त ! ... ६४


### दृश्य तिसरें.


१ चमत्कारिक पत्र ! ... ६७
२ विधि–घटना ! ... ६८
३ विलक्षण योगायोग ! ... ७२
४ धन्योद्गार ! ... ... ८०
५ काव्यमय प्रसंग ! ... ८१
६ चमत्कार ! ... ... ८५
७ आनंदी आनंद ! ... ८७
८ लीलेचा संसार ! ... ८९
९ "प्रसाद चिन्हानि पुरः फलानि" ... ... ९०
१० लीला आणि शशी ! .. ९१
११–१२ ओहो !— दिवाळी ! ९२

# " कृतज्ञतापूर्वक आभार "

केसरीचे विद्वान् व अधिकारी संपादक श्री. वा. कृ. भावे यांनीं "प्रस्तावना" व कविवर्य प्र. के. अत्रे यांनीं " निरीक्षण " लिहून दिल्याबद्दल मी उभयतांचा कृतज्ञतापूर्वक आभारी आहे !

प्रस्तावना किंवा निरीक्षण लिहिण्याचें कार्य दिसतें तितकें सोपें नसतें व एकपरी तात्वीक दृष्टीनें विचार करितां अवघडही नसावें. अवघड नसावें म्हणण्याचें कारण ज्यांना ज्या विषयाचा व्यासंग असतो त्यांना त्या विषयांतील लहानमोठा कोणताही विषय अवघड वाटत नसतो असें मला वाटतें ! नाहीं तर माझ्या विनंतीपेक्षां महत्त्वाचीं व निकडीचीं कार्यें मागें असूनही वेळांत वेळ काढून माझ्यासाठीं ते परिश्रम घेतेना ? वाङ्मयाविषयीची उपजत आवड व गुणगौरवाची उदारता त्यांच्या ठिकाणीं आहे हें उघड आहे !

कधीं कधीं आशेपुढें निराशेच्या कारणपरंपरेचे डोंगर उभे राहून " राहीला अनंत पलीकडे " अशी उद्वेगजनक नाजूक परिस्थिति निर्माण होते ती बहुतेकांच्या अनुभवाची आहे. त्याप्रमाणेंच श्री. अत्रे यांचें निरीक्षण वेळेवर हातीं पडण्याचें बाबतींत ती अनुभवास आली. कारण निरीक्षण हातीं पडण्याच्या काळांत प्रतिक्षण तें वेळेवर मिळणार नाहीं. असें भासल्यामुळें निराशेंत गेला परी, क्षण " राहिला अनंत अलीकडे " असें झालें ! अनंत पलीकडे नाहीं, व अ कडेही नाहीं तो सगळीकडे–जवळच आहे. असो, शेवटीं निरीक्षण वेळेवर मिळालें !

आतां आभार मानण्याचे बाबतींत पुष्कळदां असें घडतें कीं, कोठें कोठें आभारप्रदर्शनाला भरती येऊन तिची मजल खिळे जोडणाऱ्या महाशयापर्यंत जाते, तर कोठें कोठें ओहटी लागून शंख व शिपा उघड्या पडतात ! तें पाहूनच सूज्ञांनीं दयाळूपणानें शंखांना देव्हाऱ्यांत स्थान दिलें आहे कीं काय कोण जाणे ? पण शिपा या बोलून चालून स्त्री जातीच्याच ! बायकांचा कोप विकोपास

गेला तर प्राणाशींच गांठ! बाकी मंगळसूत्राची गांठ प्राणाशीं–गळ्याशींच असते! म्हणूनच त्या नेहमीं जिवावर उदार असतात कीं काय त्यांच जाणे! शिपांना योग्य स्थान शंखाच्या दृष्टीनें तरी मिळालें नाहीं! त्या औषधी महायुद्धांत भस्मसात् होतात! पण त्यामुळें "सीताशुद्धीच" झाली असें होतें.

याप्रमाणें ग्रंथकारांकडून कांहींचे आभार मानले जातात व कांहींचे अनवधानतेमुळें मानले जात नाहींत असें न व्हावें म्हणून केवळ या पुस्तक छापण्याच्या बाबतींत ज्या लहानथोरांचें मला साह्य झालें असेल त्या सर्वांचें कृतज्ञतापूर्वक आभार मानणें मी माझें आद्य कर्तव्यच समजतों.

बुधवार, ता०
७।१२।३२ } त्र्यंबक गंगाधर धारपुरे, पुणें.

रा. म. ... ग्रंथ संग्रहालय ... नोंद नं. ... सं. क्रमांक १०६० ता. १३/३/३३ स्थलांतर

अध्याय पहिलें

सामाजिक खंडकाव्य—

# " लीलेचा संसार. "

( जातिः—अर्जुन )

## प्रकरण पहिलें

" काय केलें जळचरीं । धीवर त्यांच्या घातावरी ॥ "

कुठल्याशा एका गांवीं । जाहली गोष्ट ऐकावी ॥ नीट ती ॥
सद्‌गुणी शीलसंपन्न । गृहिं होती एका सून ॥ नांदत ॥
परि जाच तिला सासूचा । हा खेळच दुर्दैवाचा ॥ या जगीं ॥
अपराध तिचा तो काय ! । ती "सून" जाहली होय ॥ येवढा ॥
धान्यांत खडे मिसळून । ती सासु म्हणे " निवडून ॥ काढ हे ॥
शिकलीस लिहावाचाया । सुस्वरांत गाणीं गाया ॥ समजलें ॥
हें कसलें पुस्तक जाळ ! । ही सुधारणा चवचाल ॥ योग्य ना " ॥
" वाचलीं । मनीं बिंबलीं । फार चांगलीं । भावगीतें हीं ॥
वाउगें न लिहिलें कांहीं ॥ यांमधें ॥ "
विनयें हें वदतां सून । तिज सासू संतापून ॥ ती म्हणे ॥
" मरतात कितिक साथीनें । तुजलाच कसें काळानें ॥ वगळिलें ॥
कां ? मुकी न केली देवें । कां डोळे केले तिरवे ॥ नाहित ॥

शिरजोर । जाहली पोर । ऊठ ! घे दोर । आण तें पाणी ॥
टाकतें तुला बांधोनी ॥ ना तरी ॥
विश्वासराव दातार ! । नागेशपंत सरदार— ॥ वकिल ते ॥
चवकशाच त्यांना फार । गुण नसतां घेती थोर (?) ॥ म्हणवुनी ॥
लांब नाक फेंदारून । देण्यांत शूर व्याख्यान (?) ॥ नेहमीं ॥
अति लावालावी करिती । आपुलें प्रस्थ माजविती ॥ युक्तिनें ॥
शिशु—मंदिर (?) बांधायाला । दोघांनीं केली गोळा ॥ वर्गणी ॥
देऊन थाप लोकाला । घातला बांध शेताला ॥ शेवटीं ॥
नाकावर यांच्या राग । लोकांना शांति, त्याग ॥ शिकविती ॥
पावलें लांब टाकीत । ते प्रतिष्ठीत ऐटींत ॥ चालती ॥
कुजलेल्या अंतःकरणीं । सभ्यता मुलामा वरुनी ॥ लाविती ॥
मधुरता वसे जिव्हाग्रीं । मारिती विषारी नांगी ॥ मागुनी ॥
दिसण्याला साधे अगदीं । लागावे बघतां नादीं ॥ भाविकें ॥
—पण तुझें त्याच दोघांनीं । जुळविलें भीड घालोनी ॥ लग्न हें ॥
हा प्रसंग आला म्हणुनी । ओघानें मी बोलूनी ॥ दाविलें ॥
हुंडाही पुरता नाहीं । मानपान झाला तोही ॥ शाब्दिक ॥
ती मनासारखी सून । यापुढें मला कोठून ?॥ लाभणें ॥
संसार । उभा जाणार । गृहीं होणार । नेहमीं तंटे ॥
कोणाच्या नांवें बोटें ॥ मोडुं मी ॥
"टिळकांचें कार्य" म्हणोनी । घेतला भाग दोघांनीं ॥ एकदां ।
उत्सवीं राबराबून । सर्वांवर करुनी ताण ॥ दाविली ॥
"त्यागाचे आम्ही मेरू । देशांतिल दुःख निवारूं" ॥ बोलले ॥
कृति नाहीं काडीमात्र । लोकांना कळलें पात्र ॥ हे किती ॥
परवां तर त्या दोघांनीं । परभारें कांहीं विकुनी ॥ धान्य तें ॥
उत्सवांतल्या पैशांत । लग्नमुंज दोन्ही बेत ॥ साधिले ॥

देश—कार्य ? म्हणती केलें । हे स्वार्थपरायण असले ॥ दांभिक ॥
परवांच्या दरबारांत । तें पुळचट राष्ट्रिय-गीत ॥ गायिलें ॥
त्यामुळें पुढें हे आले । सरकारी आतां चेले ॥ जाहले ॥
राष्ट्र-कार्य आतां कुठलें । जनतेचे अश्रूं सजले ॥ प्यावया ॥
हे म्हणे चांगले थोर (?) । दरमहा देइ सरकार ॥ वेतन ॥
लोकांतुन झाले लांब । सरकारी थोडी ऊब ॥ लागतां ॥
हे प्रजापक्ष कैवारी । आरंभीं दारोदारीं ॥ हिंडले ॥
होतां अधिकारारूढ । पैशाची यांना ओढ ॥ लागली ॥
बदलले आयत्या वेळीं । वचनेंही सर्व दिलेलीं ॥ विसरले ॥
सरकारी उचलुन बाजू । जनतेशीं आतां झुंजूं ॥ लागले ॥
कायदे नवे हुडकोनी । शक्य तों प्रजेला पिळुनी ॥ काढिती ॥
म्हणतात "करिन ती पूर्व" ! । बळि पिळितां कान अपूर्व ॥ काय तें ॥
बघती न पुरें वाचून । जनमतांस फेंटाळून ॥ लाविती ॥
व्याख्याना करिती बंदी । देशाचे हे प्रतिवादी ॥ जाहले ॥
काढून हलुंच वॉरंटें । जनहितावरीं वरवंटे ॥ फिरविती ॥
ते कमेटिचे कंदील । तें कमेटिचें रॉकेल ॥ असुनही ॥
आपुल्याच दारावरतीं । ती हवी रातभर बत्ती ॥ ग्यासची ॥
मिणिमिणी दिवे गांवांत । रस्त्यांतिल कांचगृहांत ॥ पेंगती ॥
रस्त्यांतिल त्या खळग्यांत । लागून ठेंच पडतात ॥ माणसें ॥
लक्ष कोण ? देतो तिकडे । जनता ती फत्तर धोंडे ! ॥ केवळ ॥
येण्याची अपुली वाट । ऐस पैस स्वच्छ सपाट ॥ पाहिजे ॥
आपुल्या योग्य संसारा । त्या सुधारणेचा तोरा ॥ मिरविती ॥
परकीय राजसत्तेंत । लांगूलचालनें मात ॥ करिति, हे ॥
ना एक दोन कृति असल्या । माधवें मला सांगितल्या ॥ काल, या ॥
आधींच जरी हें कळतें । तर बरें जाहलें असतें ॥ किति तरी ॥

आसुरी । वृत्ति अंतरीं । दिसे वरिवरीं ॥ देखणें रूप ॥
त्या दोघांचा संताप ॥ ये, मला ॥

---

## प्रकरण दुसरें

### " देवळांत "

आपसांत बोलत होत्या । देवळांत लीलेच्या त्या-॥ मैत्रिणी ॥
" सुकुमार मनोहर लीला । चालती बोलती वेला ॥ अनुसये ! ॥
मंदस्मित कोमल गालीं । कधिं नाहीं दुर्मुखलेली ॥ पाहिली ॥
पूर्वीची लीलाताई । अलिकडे अशी ही बाई ॥ कां बरें ! ॥
केसांना कधिं ना तेल । डोळेही गेले खोल ॥ कां बरें ! ॥
टवटवी मुखीची गेली । ते पडले खळगे गालीं ॥ कां बरें ! ॥
फाटकें वस्त्र नेसाया । ना पुरें अन्नही खाया ॥ कां बरें ! ॥
कधिं नाहीं देवा येत । नेहमींच असते आंत ॥ कां बरें ! ॥
श्रीमंती घरची असुनी । आणते हीच पण पाणी ॥ कां बरें ! " ॥
" करणार । काय ही पोर । सासुचा फार । जाच लीलेला ॥
ठावे न, कसें हें तुजला ॥ द्वारके ! ॥ "

---

## प्रकरण तिसरें

### " लीलेचें संसारचित्र ! "

शेजारीं वार्ता कळली । गांवाला सासू गेली ॥ मुलिकडे ॥
ही संधि बरी साधून । आल्या त्या आपणहून ॥ मैत्रिणी ॥

[illegible]
[illegible]. [illegible]. [illegible]. काशी



कल्याण ! अरे कल्याण ! !

आलास कसा कोठून ? ॥ यास्थळीं ॥ पान ५९ वें.

एकटीच त्या वेळेला । ती दळीत होती लीला ॥ जोंधळे ॥
घालीत घांस तो मधुनी । लागली म्हणाया गाणीं ॥ सुंदर ॥
मैत्रिणी तिच्या थबकून । क्षण दृष्टिआड होऊन ॥ ऐकती ॥

## गाणें पहिलें.

### दमयंती.

( दळण्याच्या चालीवर म्हणणें )

चालः—ने त्वरित मला परत....

" या अपरात्रीं घोर निर्जनीं रानीं । गेलांत कुठें ! सोडूनी ॥
मीं शोधावें कुठें आपणा न कळे । प्रियकरा ! काय हें केलें ॥
ही आरोळी सिंहाची ऐकून । भय पावे अंतःकरण ॥
या वृक्षांनीं आश्रय रानीं द्यावा । आमुचा मान राखावा ॥
ही एकच कीं शय्या झोंपायास । वस्त्रही एक दोघांस ॥
ही शिळाच कीं उशिसम टेकायाला । तृणशय्या झोंपायाला ॥
" आणली अशी कुदशा दुर्दैवानें । देवांस दोष ना देणें " ॥
या सुविचारें होतों आपण रानीं । दुःखांत सौख्य मानोनी ॥
मज मधुर फळें तुम्हीं आणुनीं द्यावीं । मग दोघांनीं तीं खावीं ॥
कधिं उशिर तुम्हां लागतांच येण्याला । लागावी हुरहुर मजला ॥
तों प्रेमानें आपण सन्निध यावें । हृदयाला या सुखवावें ॥
गतकाल असा, आठवतो यावेळीं । स्थिति कठिण यापुढें आली ॥
( चाल ) कां रोष मजवरी सदया ? । मी चुकलें पडतें पाया ।
द्यावया, धीर सत्वर या ! ॥
तें पुरुषांचें प्रेम चंचलच वाटे । वर सुंदर आंतुन काटे ॥
ती पुरुषांची वृत्ती केवळ भोगी । प्रेमलाभ तोंवर जागीं ॥
त्या पुरुषांच्या हृदयीं परमेश्वर तो । कठिणता या गुणें वसतो ॥

करुं काठिण्या मऊं प्रीतिनें बांधू। पुरुषार्थ उभयता साधूं॥
पति हाच असे अलंकार ललनांचा। मोलाचा सौभाग्याचा॥
सुखदुःखानें मिश्रित हा संसार। कधिं दुःख कधीं सुख फार॥
पण धीर हवा धीरच दे सुविचार। सुविचारें सुख भरपूर॥
अविचारी ते सदा दुःखपंकांत। सुविचारी आनंदांत॥
(चाल) पातिव्रत्य उज्वल राखूं। सन्मार्ग निरंतर आखूं।
सौभाग्य ललाटीं माखूं॥"
यापरी म्हणे दमयंती, ती राणी। आंसवें न आणी नयनीं॥
नलराज पुढें तिला भेटता झाला। सुख लाभे दमयंतीला॥
ते प्रगल्भ कीं विचार दमयंतीचे। स्फूर्तींचे स्त्री–हृदयींचे॥
कवि त्र्यंबक हा लिहून ठेवी कवनीं। पिलु राग करुण योजोनी॥
हा सिद्धांचा प्रसाद लाभे कविला। वांटला भगिनि–वर्गाला॥

\+ \+ \+ \+

## गाणें दुसरें.

"जुना काळ" आणि "नवा काळ"

| "जुना काळ" | "नवा काळ" |
|---|---|
| देशार्थ संगरीं लढुन ! | हे दिवस....कशाला बोला ! |
| वीरांनीं पंचप्राण ॥ वाहिले ॥ | जाणवतें ज्याचें त्याला ॥ अनुभवें ॥ |
| ऐकतां जयांचें नांव ! | सत्त्वाची झाली हानी ! |
| शत्रुला भरावें हींव ॥ भीतिनें ॥ | धर्माची झाली ग्लानी ॥ चहुंकडे ॥ |
| रण-देवी रक्तें न्हाली ! | सिंहसे प्रतापी वीर ! |
| शौर्याची शर्थच केली ॥ झुंजतां ॥ | पण आज होय धिःकार ॥ सारखा |
| स्वातंत्र्यसुखाचे भोक्ते ! | जाणीव न त्याची कोणा ! |
| जन जागोजागीं होते ॥ नांदत ॥ | सोडुनी स्वत्त्व पदव्यांना ॥भाळले॥ |
| चमकलीं। वैभवें भलीं। माय | लोपलें। तेज आंतलें। लोक हे |
| भूतलीं ॥ दिवस ते हाय !। | बळें ॥ मुखावर नकली ॥ |

| | |
|---|---|
| गेलेले येतिल काय ? ॥ | मृतकळा दिसे तरि लाली ॥ |
| पुनरपि ॥ १ ॥ | आणिती ॥ १ ॥ |

+ + +

आठवती दोन्ही काळ !
पेटतो अंतरीं जाळ ॥ सारखा ॥
हें कसलें निर्जिव जगणें !
दुर्दैव ! नको कीं बघणें ॥ घोर हें ॥
कारण । दास्यबंधन । हरी बल–धन । सत्व लय पावे ॥
घडिघडी मरण सोसावें ॥ लागतें ॥

+ + + + +

## गाणें तिसरें.

### " संन्याशाचा संसार. "

चालः— फुलें वेलीचीं.... ( या चालीसारखी )

ऐसा बाई । संन्याशि पाहिला नाहीं ॥ ध्रु० ॥
दंड, कमंडलु, सुंदर हातीं । पायिं खडावा सदा गर्जती ॥
भगवीं वस्त्रें देहावरतीं । अशा थाटांत । संन्याशी ये गांवांत ॥
दादांचा अति स्वभाव भोळा । संन्याशाला गृहीं आणिला ॥
दिला रहाया नवा बंगला । स्वागत केलें । परम भक्त दादा झाले ॥
उणें न कांहीं संन्याशाला । मधु पक्वान्नें जेवायाला ॥
सुंदर शय्या झोंपायाला । उपवर बाला । सारखी उभी सेवेला ॥
प्रथम दर्शनीं चित्त वेधलें । तिच्या स्वरूपीं लक्ष्य लागलें ॥
योगबळें तें तरि आवरिलें । कठिण अनिवार। वळाविणें इंद्रियें स्वैर॥
आंत निराळा होय प्रकार । टिकाव मन तें किति धरणार ॥
थिजलें तत्त्वज्ञान विचार । अंतर्यामीं । प्रेमबद्ध झाले स्वामी ॥

दादांनीं अति आग्रह केला। स्वामी उठले जेवायाला ॥
घेइ सुंदरी वाढायाला । लक्ष्य ना पात्रीं । पाहतांच कोमलगात्री ॥
" स्वामी ! जेवा घ्या मागूनी । नसे स्वसा मम परकी कोणी ॥
गृहास आला मान देउनी । भाग्य उदेलें "। यापरि ते दादा वदले ॥
स्वामीना त्या विस्मृति पडली । उचलुन पोळी शिरीं ठेविली ॥
क्रियाच भलती घडूं लागली । अशा तरुणाला । संन्याशी कुणिहो? केला॥
धरला स्वामींनीं एकांत । ' नारायण ' हें नांव मुखांत ॥
" मिळो सुंदरी " भाव मनांत । संन्याशाला । हा नाद कशाला असला॥
स्वामी ते अस्वस्थ पाहुनी । " मर्म " जाणलें श्रीकृष्णांनीं ॥
योग आणिला चातुर्यांनीं । संन्याशाला । ' संसारी ' बनवायाला ॥

× × × ×

पर्व साधुनी अपूर्व केलें ।
स्वामींनीं अवसान आणिलें ॥
सुभद्रेस त्या क्षणीं पळविलें ।
बलरामाला ॥ " संन्याशी " कळुनी आला " ॥ १ ॥

ती उठे संपतां दळण । मैत्रिणी पुढें येऊन ॥ बोलल्या ॥
" किति विनोद या गीतांत । माधुर्य तुझ्या म्हणण्यांत॥ किति तरी ॥
शिकलीस गडे कोठून ? । आनंद अम्हां ऐकून ॥ वाटला "
" शिवमंदिरांत सेवेला । कवि कोणी होता आला ॥ एकदां ॥
त्या वेळीं गाणीं त्यानें । आम्हांला हीं हौसेनें ॥ शिकविलीं ॥
अनुसये ! द्वारके ! बकुले ! । कुणिकडुनी येणें केलें ॥ आज हें ॥
भेटलां फार दिवसांनीं । या पुढें अशा, कडकडुनी ॥ भेट द्या " ॥
" सांगु कां ? ऐकलें गाणें । त्यामुळेंच झालें येणें ॥ आमुचें " ॥
" कांहीं तरि म्हणतां झालें । वेगळेंच कारण असलें ॥ पाहिजे " ॥
" तें तसें नव्हे गे ! लीले ! । तुजसाठीं येणें केलें ॥ केवळ ॥"

क्षण बैस सोड कामाला । स्थिति तुझी खरी आम्हांला ॥ सांग गे ॥
अंगांत तुझ्या ना शक्ती । कोपरांमधें हीं जाती ॥ कांकणें ॥
तूं स्पष्टपणानें सांग ! । हा असा नव्हे हृद्रोग ॥ चांगला ॥
शिकलेली तूं तर ताई ! । शोभे न तुला केव्हांही ॥ मौन हें ॥
मोकळें । चित्त आपुलें । आतां कर, खुळे ! । असें हें काय ॥
फोडणार नाहीं गुह्य ॥ अभय घे ॥
किति घेशिल आढेवेढे । आमुच्याकडे मन ओढे ॥ कां न गे ॥
तुज आहे सासुरवास । तूं नको कथूं आम्हांस ॥ समजलें ॥
ही सासू असली कसली । कृत्याच असे अवतरली ॥ कलियुगीं "॥
" आवरा ! । तोंड आवरा ! । विचारें जरा । पहा, वडिलांस ॥
सानांनीं देणें दोष ॥ योग्य कां ? " ॥
" बोलतेस लीले ! काय । तूं चतुर तुला हें योग्य ॥ वाटतें ॥
लागलीस ताई ! सोसूं । म्हणुनीच तुला ही सासू ॥ छळितसे ॥
हें राज्य असे गोऱ्यांचें । कायदे इथें सर्वांचे ॥ जनक, कीं ॥
अन्याय कधिं न खपणार । न्याय–मंदिराचें दार ॥ मोकळें ॥
स्वातंत्र्य हवें व्यक्तीस । हा त्यांचा तर उद्देश ॥ नेहमीं ॥
जोशांच्या नलिनीबाई । असतिल तुज लीलाताई ! ॥ माहिती ॥
जर्मनींत आल्या शिकुन । त्यांचेंच काल व्याख्यान ॥ जाहलें ॥
ऐकिलें लक्ष देऊन । त्या वदल्या संतापून ॥ हें असें– ॥
" जर्मनींत, इंग्लंडांत । किति सुधारणा आहेत ॥ जाहल्या ॥
कॉलेजें स्थापन करिती । बायकांस शिक्षण देती । इंग्रज ॥
करिती न कधीं धिःकार । ते म्हणती " स्त्री आधार ॥ जीविता " ॥
हातांत घालुनी हात । पतिसवें सुखें फिरतात ॥ बायका ॥
स्त्रीजातीचा अभिमान । त्या राष्ट्रांमध्यें दिसुन । ये खरा ॥
या अमुच्या हिंदुस्थानीं । बायका परांकित अजुनी ॥ काय हें ? ॥

स्वातंत्र्य कधीं मिळणार ! । शाहण्या कधीं होणार ! ॥ बायका ॥
निवडावा नवरा स्त्रीनें । लावावीं असलीं लग्नें ॥ यापुढें ॥
उशिरानें लग्न करावें । वा कौमार्यच राखावें ॥ योग्य हें ॥
नुकतेंच वाचलें काल । पास तें ' शारदाबील ' ॥ जाहलें ॥
पोषाकी कांहीं लोक । या समाजांत निःशंक ॥ हिंडती ॥
मरुं देत कितीही अबला । येउंदे अश्रु सरितेला ॥ पूरही ॥
पतितांना तारायाला । धैर्य ना पुरुष-वर्गाला ॥ या कधीं ॥
स्वार्थाच्या अभिमानानें । " स्पेन्सर " चीं तत्वज्ञानें ॥ सांगती ॥
त्या " विकास-वादा " वरती । चतुर हे ठराविक करिती ॥ भाषणें ॥
कुरवाळित हलके हलके । मांसाचे तोडिति लचके ॥ हलुंच हे ॥
स्वार्थाच्या बाजारांत । क्रयविक्रयही, प्रेमांत ॥ करिति हे ॥
स्फूर्तिनें मुठी वळवूनी । टेबलावरीं मारूनी ॥ हातही ॥
बोलती । सभा भरविती । स्त्रियांची स्थिती । सुधारूं म्हणती ॥
आचरणीं भलती रीती ॥ नेहमीं ॥ "
तें असो, नवा हा काळ । कां ? असले भलते हाल ॥ करुन, घ्या ॥
तूं पत्र लिही मामाला । जा खुशाल माहेराला ॥ अजुनही "॥
" हें असें कसें म्हणतां गे । कां भलतें सलतें रागें ॥ बोलतां ॥
जरि बालपणीं माहेर । आम्हांस पुढें आधार ॥ सासर ॥
जरि प्रसंग आले मोठे । तरि सासर कोणीं कोठें ॥ सोडलें ॥
अलिकडे मुली या प्रौढ । घ्यावीच जावया ओढ ॥ सासरीं ॥
दिसतसे जिला माहेर । नांदेल कशी ती पोर ॥ सासरीं ॥
मुळुं मुळूं सदा रडणार । जन्माचें ती करणार ॥ तें रडे ॥
सासर हें पंचप्राण । किंबहुना अमुचें स्थान ॥ मुक्तिचें ॥
इतिहासपुराणें वाचा । लावा मन त्यांतिल खोचा ॥ ओळखा ॥
गृह-शिक्षण संपादून । झाल्या त्या विद्या, ज्ञान ॥ मिळवित्या ॥

हा काळ असे 'फॅशन'चा । अंधानुकरण करण्याचा ॥ नेहमीं ॥
स्वातंत्र्य स्त्रियांना कसलें ! । आहेच दिलेलें सगळें ॥ धार्मिक ॥
पण नको अम्हां तें झालें । पोषाखी चंचल असलें ॥ पाहिजे ॥
पाऊल सदा बाहेर । स्वातंत्र्य असें भरपूर ॥ पाहिजे ॥
बारिकशी कुंकुम टिकली । शोभेला केवळ भालीं ॥ पाहिजे ॥
अंबाडा बुचडा छान । वा, चक्री वेणी खुलुन ॥ पाहिजे ॥
सुंदरशी जिलबी वेणी । गजराहि कळ्यांचा वरुनी ॥ पाहिजे ॥
आकडा सदा केंसांत । आंगठी सदा बोटांत ॥ पाहिजे ॥
अंगांत पोलकें तुस्त । ती मोहनमाळ गळ्यांत ॥ पाहिजे ॥
झिरझिरीत नेसायाला । पातळ तें मिरवायाला ॥ पाहिजे ॥
हातांत धराया छत्री । पुरुषांची ओळख मैत्री ॥ पाहिजे ॥
पायांत पुणेरी जोडा । मुखिं विडा रंगला थोडा ॥ पाहिजे ॥
गर्दीतुन मुरडित नाक । गंधर्वी नाजुक झोंक ॥ पाहिजे ॥
नाटकें, सिनेमा, खेळ । फिरण्याला सायंकाळ ॥ पाहिजे ॥
नाटकी चालिचें गाणें । व्याख्यानलाभ नेमानें ॥ पाहिजे ॥
पाहिजे । खरें ज्ञान जें । कुणि न त्या भजे । सर्व थोतांड ॥
माजलें स्त्रियांचें बंड ॥ अलिकडे ॥
तें तऱ्हेतऱ्हेचें जीग । ठेवाया लेदर ब्याग ॥ पाहिजे ॥
हातांत सदोदित पैसा । बाहेर पती तो दिवसा ॥ पाहिजे ॥
नवरा तर व्हावा दास । आयतेंच जेवायास ॥ पाहिजे ॥
गुलुगुलू पातिशिं बोलाया । फिशिफिशी मधुन हांसाया ॥ पाहिजे ॥
'गुड्मॉर्निंग्' 'गुड् नाईट' । स्वागता इंग्रजी थाट ॥ पाहिजे ॥
'माय डिअर' असा सन्मान । त्या 'लव्ह लेटरां' मधुन ॥ पाहिजे ॥
'मिस्' 'मिसेस' सन्मानार्थी । नेहमींच नांवाआधीं ॥ पाहिजे ॥
वर्षांतुन सतरा वेळां । जावयास माहेराला ॥ पाहिजे ॥

चुरचुरीत बोलायाला । मोठेपण मिरवायाला ।। पाहिजे ।।
द्यावया शीघ्र व्याख्यान (?) । घ्यावयास 'सबला' म्हणुन ।। पाहिजे ।।
पाहिजे । खरें ज्ञान जें । कुणि न त्या भजे । सर्व थोतांड ।।
माजलें स्त्रियांचें बंड ।। अलिकडे ।।

जें वाढवील शीलाला । जागवील स्त्री–भावाला ।। नेहमीं ।।
स्त्रीपणा पणा लावील । राखुनी स्त्रीत्व, उजळील ।। सद्गुणा ।।
पावित्र्य जयाचा प्राण । नमवील जगाची मान ।। ज्ञान जें ।।
तें ज्ञान करिल कल्याण । त्याचें तर जन्मस्थान ।। भारतीं ।।
यापुढें । करा एवढें । खरे घ्या धडे । आर्य संस्कृतिचे ।।
देशाचें स्त्री जातीचें ।। हित तरी ।।"

" आहेसच तूं शिकलेली । तुजपुढें आमुचीं कसलीं ।। भाषणें ।।
ही तुझी दशा पाहून । आम्हीं तरि झालों खिन्न ।। अंतरीं ।।
गूढांतिल गूढ असेल । राहुंदे, कसें कथशील ।। तूं तरी ।।
सासरीं । अशा तिळभरीं । अम्हांला तरी । राहणें म्हणजे ।।
वाटलेंच असतें ओझें ।। नेहमीं " ।।

" त्राग्यानें स्वच्छंदानें । संसारीं अति लोभानें ।। वागतां ।।
सुख, समाधान कुठलें तें । मिळणारें तेंही होतें ।। पारखें ।।
कष्टाविण सुख ना मिळतें । तें त्यांतच लाभत असतें ।। हळुहळूं ।।
हे असले दिन जातील । ते भाग्याचे येतील ।। यापुढें ।।
राखून मनें दोघांचीं । मी वाहिन संसाराची ।। काळजी ।।
त्यांच्यास्तव सोशिन कष्ट । सांगतें म्हणूनी स्पष्ट ।। हसु नका ।।
घटकेच्या सासूबाई ।। संसार आमुचा बाई ! ।। वाढता ।।
पति हाच स्त्रियांचा देव । पति हाच स्त्रियांचा जीव ।। समजलां ! ।।
सर्वांच्या आशिर्वादें । मी असे सदा आनंदें ।। या घरीं " ।।

" नवऱ्यास मानसी देव । दिसतो अति भोळा भाव ।। हा तुझा ।।

दोन हात डोळे दोन । माणसाप्रमाणें दोन ॥ पायही ॥
सुखदुःखांचे आघात । आहेत त्यांसही होत ॥ प्रत्यहीं ॥
तो म्हणसी 'देव' कसें हें । माणसाप्रमाणें आहे ॥ माणुस ॥
देवाची पदवी देतां । लागले करूं हे सत्ता ॥ स्त्रीवर ॥
हे देव, न नंदी-बैल । या समाजांत बेताल ॥ वागती" ॥
"बोलतां तुम्ही चुकलात । उपमाही योग्य न दिसत ॥ या स्थळीं ॥
धनि जसे तयां शिकवील । ते तसेच नंदी बैल ॥ वागती ॥
हुकुमाचे ताबेदार ! । ते कुणा काय करणार ? ॥ बापुडे ॥
'वळु'ची जर उपमा द्याल । आपणांसही येईल ॥ कमिपणा ॥
जर म्हणणें 'नंदि' असेल । उपमा क्षण योग्य दिसेल ॥ ती अशी ॥
'हे नंदि शंकरापुढचे' । वंदनीय, आधीं यांचें ॥ दर्शन ॥
एखाद्या दोषास्तव कां । ललनांनीं द्यावा ठपका ॥ प्रियकरा ॥
सारखे न सगळे पुरुष । असणारच कांहीं दोष ॥ सद्‌गुण ॥
त्यांतून मला गुणवंत । शिलवंत पति आहेत ॥ लाभले ॥
कां ? म्हणूं नये मी देव । "सद्‌गुणा भजे सद्‌भाव ॥ आदरें ॥"
पुरुषांना नांवें देतों । पण आम्हीं इकडे चुकतों ॥ किति तरी ॥
देईल पती अधिकार । स्त्री नीट करूं संसार ॥ लागतां ॥
पात्रता हवी अंगांत । स्वातंत्र्य मागतां देत ॥ ना कुणी ॥
हें आहे मिळवायाचें । त्या नंतर जिरवायाचें ॥ कठिण कीं ॥
चाल रीत सोडुन सगळी । भलभलतीं करितां असलीं ॥ भाषणें ॥
इंग्रजींत बसणें, उठणें । इंग्रजींत अंतःकरणें ॥ वाढलीं ॥
अन्नासम बनतो पिंड । त्यामुळें तुम्हां पाखांड ॥ आवडे ॥
आपुली । संस्कृती भली । परी सोडिली । तुम्ही सर्वांनीं ॥
दुर्दैव ! सुशिक्षित असुनी ॥ बहकलां ॥

---

# प्रकरण चवथें

## बालपणाचा थोडा इतिहास !

माहेर तिचें धौमांत । श्रीमंत बाप कुलवंत ।। सद्‌गुणी ।।
मन होय सुसंस्कृत जेणें । तें वळण तिच्या बापानें ।। लाविलें ।।
मूळचीच होती चतुर । त्यामधें उच्च संस्कार ।। लाभतां ।।
ती शिके मनापासोनी । इंग्रजी मराठी आणी ।। संस्कृत ।।
जें शोभे मातृपदाला । गृहशिक्षण तें दे तिजला ।। माउली ।।
जरि बाला ती शिकलेली । विनयानें लवली खुलली ।। त्यामुळें ।।
कधिं डौल तिनें ना केला । तरि तिच्या न सौंदर्याला ।।कधिं उणें ।।
जातिवंत सौंदर्याला । शृंगार न खुलवायाला ।। लागती ।।
रसिकता तिच्या हृदयांत । मूळचीच आवाजांत ।। मधुरता ।।
भाव-बद्ध-अंतःकरणें । श्रीकृष्णा पुढती गाणें ।। ती म्हणे ।।
पुष्पांच्या गुंफुनि माळा । करि भावें गोपालाला ।। अर्पण ।।
क्षणमात्र जगा विसरूनी । हावभाव सारे करुनी ।। दाखवी ।।
त्या प्रसंगास वाटे कीं । अवतरली आहे लोकीं ।। राधिका ।।
बागेचा तिजला नाद । नेहमीं तिला आनंद ।। त्यामधें ।।
मोठ्यानें वारा आला । जुइचा तो मांडव पडला ।। एकदां ।।
तों बालमित्र यशवंत । सांवरिला त्यानें हात ।। देउनी ।।
ठेविलें नांव तें ' यमुना ' । एकली मायबापांना ।। पोर ती ।।
कठिण काळ मोठा आला । स्थिरता न कधीं सौख्याला ।।या जगीं।।
पसरला प्लेग गांवांत । मातेचा झाला अंत ।। त्यामधें ।।
लोटले न चारहि दिवस । प्लेगानें तों बापास ।। गांठलें ।।
जाहली पोरकी बाला । मामाविण कोणी नुरला ।। जवळिचा ।।

मामांचे होते स्नेही । श्रम लग्नास्तव त्यांनींही ॥ घेउनी– ॥
जमविलें-। लग्न, चांगलें । तिला स्थळ मिळे । कृपा देवाची ॥
गृहदशापरी सासूची ॥ लागली ॥

---

## प्रकरण पांचवें

### कलहाच्या ठिणग्या.

दुर्गेस संगें घेऊन । सासू ती गांवाहून ॥ परत ये ॥
नांवासम दुर्गा होती । "दुर्गेच" नवीं आली ती ॥ घेउनी ॥
आईच नीच अत्यंत । संगती मुलीची त्यांत ॥ लाभली ॥
आधींच उन्हाळा प्रखर । उसळावा त्यांतच कहर ॥ आगिचा ॥
साह्याला यावा वात । मग विलंब कितिसा अंत ॥ व्हावया ॥
त्याप्रमाणेंच ये घडुनी । लीलेस मायलेकींनीं ॥ घेरिलें ॥
शाहणी देखणी लीला । पण बघवेना दुर्गेला ॥ चांगलें ॥
बोले न सरळ शब्दांनीं । आठ्यांच कपाळावरुनी ॥ नेहमीं ॥
घालून आळ चोरीचा । आरंभी छळ लीलेचा ॥ मत्सरें ॥
'ही सवाष्ण आपण विधवा'। मनिं असें म्हणूनी हेवा ॥करि तिचा॥
कांहीं तरि करुनी ढंग । निष्कारण काढी राग ॥ तिजवरी ॥
सुविचारी लीला म्हणुनी । त्यांतही सौख्य मानूनी ॥ दिन क्रमें ॥
करि काम लक्ष देऊनी । आंसवें विवेकें नयनीं ॥ रोधुनी ॥
कधि आलें जर कळवळुन । एकांतीं अंतःकरण ॥ करि खुलें ॥
दृष्टिस तें पडतां चुकुनी । बोलावें त्या दोघींनीं ॥ टाकुनी ॥
गृह नव्हे कसाईखाना ! । वाटणार नाहीं कोणा ? ॥ बघुनि तें ॥

तो बरा कसाईखाना । बंदी कीं दुःखाश्रूंना ॥ या स्थलीं ॥
त्या स्थलीं मरण तात्काळ ! । दुःख नित्य मरणांतील ॥ या स्थलीं ॥
सरकारी बंधन त्याला । याला नच, दाहि दिशेला ! ॥ मोकळा ॥
अन्याय ! । किती हा, हाय ! । करावें काय ? । पोळतें हृदय ॥
योजील कोण ? सदुपाय ॥ यावरीं ॥

---

# प्रकरण सहावें.

## " सुख आणि दुःख "

आसाया आयुष्यास । तो एक अमंगल दिवस ॥ उगवला ॥
कामानें ती दमलेली । भिंतीस टेकुनी बसली ॥ क्षणभर ॥
तों तिला लागली डुलकी । त्यांमधें दृश्य अवलोकी ॥ सुंदर ॥
पति पुण्यांत कॉलेजांत । होता तो उत्तम घेत ॥ शिक्षण ॥
स्वप्नांत तिच्या ये गांवा । जो आयुष्यांतिल ठेवा ॥ मंगल ॥
दारांत पडे पाऊल । प्रेमाचें गालीं फूल ॥ विकसलें ॥
मंदस्मित खुललें त्यांत । चंद्रकोर जशि गगनांत ॥ चवथिची ॥
प्रेमाच्या अंतःकरणीं । लज्जेची नाजुक राणी ॥ हांसली ॥
मृदुगालीं सौंदर्याचें । प्रतिबिंब नव्या प्रेमाचें ॥ विलसलें ॥
पतिदृष्टिरूप तो भ्रमर । भावाचीं गाणीं मधुर ॥ गात ये ॥
तों तिची मुखश्री खुलली । जशि संध्या सायंकाळीं ॥ सुंदर ॥
क्षण एक असा निमिषाचा । सम्मेलन सुखसमयाचा ॥ लाभतां ॥
हृदयास हृदय बिलगूनी । लय पावे नदि उसळूनी ॥ सागरीं ।
" सोडून तुझा करपाश । मज हवें उद्यां गांवास ॥ जावया ॥
तव विरह उद्यांपासून । आतांच चित्त पण खिन्न ॥ होय हें ॥

तव सन्निध मी या वेळीं । पण पुण्यांत सायंकाळीं ॥ मी उद्यां ॥
उन्मादभरें उसळून। ज्या सुखास कवटाळून ॥ मन रमें ॥
वाढवी तेंच विरहाला । क्षण सुखाचेच दुःखाला ॥ कारण ॥
तूं अशी आज मजजवळ । मजपुढती भावी काळ ॥ तो उभा ॥
सुख आहे सध्यां मिळत । नाहीं तें शांती देत ॥ त्यामुळें ॥
तें असो, तुझ्यासाठीं मी । आणली आंगठी नामी ॥ ही पहा ॥
देतां मी आनंदानें । पाहतेस संकोचानें ॥ कां अशी ? ॥
करुं, न दे स्मरण लज्जेचें । हें असें खऱ्या प्रेमाचें ॥ लक्षण ॥
लीले ! कर इकडे बोट । सांभाळ अतां ही नीट ॥ लाडके ! ॥
स्मृति होइल त्या त्या वेळीं । ही बघशिल ज्या ज्या वेळीं ॥ आंगठी"॥
आंगठी खुले हातांत । नवलाई नवलाईंत ॥ जन्मली ॥
प्रेमाची होतां वृष्टी । लीलेची अंतःसृष्टी ॥ टवटवे ॥
किति विचार नाना आले । ममतेचे अश्रू गळले ॥ खळखळा ॥
नवलाई नेत्रावरतीं । प्रेमळता प्रेमावरतीं ॥ पसरली ॥
भक्तिरूप सुंदर वेल । प्रेमाचें आलें फूल ॥ तीवर ॥
केसर जणुं रोमांचच ते । अश्रु–बिंदु गळलेले ते ॥ मधु जसे ॥
क्षणभरीं । रमे अंतरीं । अरेरे !!! परी । होय ती जागी ॥
मानें म्हणे " किती हतभागी ॥ मी असे " ॥

× × ×

बोटास नखुरडें झालें । होतें तें सुजलें कुठलें ? ॥ औषध ॥
भूमीवर पडला हात । जड झाला तरि स्वप्नांत ॥ ना कळे ॥
ती बघे आंगठी कुठली । थंडीनें बोटें झालीं ॥ वांकडीं ॥
त्यानंतर ती त्या वेळीं । चिंतातुर रात्रीं झाली ॥ अंतरीं ॥
अलिकडे तिला ना झोंप । जाळाया अंतस्ताप ॥ लागला ॥
अल्पशीच उरली रात्र । जाग्रणामुळें अति नेत्र ॥ ताठले ॥

थोडीशी मधुनी मधुनी । हळुं हळूं लागली ग्लानी ॥ यावया ॥
जरि डुलक्या होती घेत । मनिं विचार होते येत ॥ किति तरी ॥
" कधिं स्वप्न खरें ठरणार ! । येणें कधिं तें होणार ! ॥ तिकडचें ॥
करुं काय ? कुणाला सांगूं । यातना किति या भोगूं ॥ यापुढें " ॥
यापरी । म्हणे अंतरीं । लोचनांतरीं । नीज तों आली ॥
स्वप्नांच्या राज्यीं शिरली ॥ बालिका. ॥

---

# प्रकरण सातवें.

## " निराशेंत निराशा ! "

स्वप्नांतिल तो संसार ! । जें सदा मनीं, दिसणार ॥ तें तिथें ॥
स्वप्नांतच ती त्या वेळीं । देवाच्या भावें गेली ॥ दर्शना ॥
एकटीच गाभाऱ्यांत । करि तेव्हां एकांतांत ॥ नवस ती ॥
" जर उद्यां नाथ येतील । शंकरा ! तुला मी बेल ॥ वाहिन ॥
' नक्षत्र-संभवाहि ' काव्य । ' भिल्लराजस्तोत्राहि ' रम्य ॥ वाचिन ॥
तीं ' फुलें कण्हेरीचीं हीं ' । ' भाव गीत ' भावें तेंही ॥ वाचिन ॥
लघुरुद्र सुखें करवीन । तीं ' बिल्व-दलेंही ' तीन ॥ वाचिन " ॥
ते स्वता तुझे सद्भक्त । नेहमीं तुझे गातात ॥ सद्गुण ॥
जगदीशा ! त्यांनीं मजला ! । लाविलें तुझ्या भक्तीला ॥ अलिकडे ॥
पण दुर्दैवी मी म्हणुनी । सेवेचा योग न जुळुनी ॥ ये अतां ॥
दर्शनही न घडे देवा ! । दुःख फार माझ्या जीवा ॥ वाटतें ॥
यावेळीं मी तर म्हणतें । मनिं तुझ्याच दर्शन होतें ॥ घ्यायचें ॥
मज कोण ? तुझ्यावांचूनी । सोडिलें आइबापांनीं ॥ शिशुपणीं ॥
ना बंधु कुणी आधारा । अंतरलें मी माहेरा ॥ प्रभुवरा ! ॥

मामा जरि मजला आहे । किति झालें तरि नातें हें ॥ दूरचें ॥
मुलिस कीं हवी माताच । हित-गुजें सर्व तिज साच ॥ समजतीं ॥
हृदयींचे धागेदोरे । उकलते तीच सुविचारें ॥ अनुभवें ॥
आइचा शब्द—मायेचा । हृदयाच्या हृदया वाचा ॥ फुटवितो ॥
मातृहृदयसुख ज्या मिळतें । 'धन्य धन्य' मी त्या म्हणतें ॥ बालिका ॥
जगदीशा ! दीनदयाळा ! । अंतरलें त्या सौख्याला ॥ मी पण ॥
या आल्यापासुन वन्सं । फार फार सासुरवास ॥ होतसे ॥
तूं मायबाप कैवारी । दुःखें मी तुजला सारीं ॥ सांगतें ॥
ही पहा ! काढिली चोळी । डागुनी जाहली काळी ॥ पाठही ॥
या दिला जिभेला डाग । ठेचलींत बोटें, अंग ॥ तुडविलें ॥
तुज दया कधीं येणार ! । हा "लीलेचा संसार" ! ॥ पाहुनी ॥
हाच काय ! समजूं शकुन । पुष्प कीं किरीटावरुन ॥ तें गळे ॥
गळलें तरि सोन्याचें तें । मिळणार पुन्हांही त्यातें ॥ आश्रय ॥
होणार न तें निर्माल्य ! । पण दृश्यावरुनी काय ? ॥ समजुं, या ॥
दर्शन तव नित्य घडावें । कर इतकें तरि, मी भावें ॥ वंदितें ॥
आसरा । तूंच दे खरा । तरी प्रभु-वरा ! । होय कल्याण ॥
कीं दुःख न माझें अजुन ॥ संपलें ॥ "

× ×

वाती त्या सारायाला । गाभाऱ्यामध्यें आला ॥ गुरव तों ॥
लीलेचे दिपले डोळे । पाहतां प्रकाशित सगळे ॥ ते दिवे ॥
ढोलावर दरवाज्यांत । तों कुणी थाप जोरांत ॥ मारिली ॥
त्यामुळें । चित्त दचकलें । स्वप्न संपलें । उघडि ती नेत्र ॥
हळहळे स्वप्निचें चित्र ॥ सरकतां ॥

# प्रकरण आठवें.

## " आगीच्या भयंकर ज्वाळा ! "

ती बघे दिवे तों कुठले । मुखिं किरणांचें तें जाळें ॥ पसरलें ॥
त्यामुळेंच डोळे दिपले । घटि-यंत्रीं ठोके पडले ॥ आठ तों ॥
अंगांत तिच्या ये कसर । तिज होय उठाया उशिर ॥ त्यामुळें ॥
ती नणंद रागावूनी । दारावर बाहेरूनी ॥ लाथ दे ॥
लाथांच्या भडिमारानें । कडकडे दार जोरानें ॥ उघडलें ॥
ती तदा ऐटिनें आंत । लीलेला धिःकारीत ॥ हंसत ये ॥
" उघडिलें कसें मीं दार । काय हो ! तुम्ही करणार ॥ मजपुढें ॥
वायुनें नकाशा हलला। भूकंप म्हणुन कधिं झाला ॥ काय हो ! " ॥
" काढिली कडी नसती का । जर आपण असत्या हांका ॥मारिल्या॥"
" नांवानें तुमच्या हांका । मारितें नसे कळलें कां ॥ अजुनही " ॥
" हें काय बोलणें असलें । मी काय असें हो ! केलें ॥ आपुलें " ॥
" जर एक शब्द बोलाल । जीवितास मुकुनी जाल ॥ समजला ! " ॥
" भय मला घालतां काय । मी तशी न केवळ गाय ॥ बांधली "॥
" वैनी ही खिडकिंत बसते । येणाऱ्या लोकां बघते ॥ टकमका ॥
दिसण्याला अगदीं भोळी । वाटावें जणुं अवतरली ॥ देवता ॥
परवांतर....तें राहूंदे । करुं उघड कशाला शब्दें ॥ आज, मी ॥
आईस हाक मारूनी । सांगतें असें जुळवूनी ॥ दमधरा "॥
" या शिरीं । वीज सत्वरीं । पडूंदे परी । वन्सं हो ! भलतें ॥
कां ? वदतां सोसेना तें ॥ मजतरी ॥
हें पवित्र असतां शील । कां असे निरर्थक आळ ॥ घालितां ॥
आहे तरि काय मनांत । किति सोसूं आज शिकस्त ॥ जाहली "॥

४०२.१



" जा कशा करुनी काळें । माहेरीं जीवित उरलें ॥ घालवा "॥
" माहेर ! ! मला माहेर ! ! । पुन्हां उच्चार । नका करुं असला ॥
अपराध असा मीं केला ॥ कोणता ॥
माहेर जरी मज असतें । धाकानें गेलें नसतें ॥ तरिहि मी ॥
या घरांत नांदायाला । शुभ-कालीं ज्यांनीं मजला ॥ अर्पिली ॥
ती काय ! परत नेण्यास ! । जड नव्हतें मी मामांस ॥ जाहलें ॥
विनवितें तुम्हाला बाई ! । बोला न अमंगळ कांहीं ॥ या घरीं ॥
माहेर तुम्हां प्रिय फार । वासना तशीं मिळणार ॥ तीं फळें ॥
नशिबांतच नाहीं तुमच्या । हा हेवा कां दुसऱ्याचा ॥ मत्सरें ॥
आवरा यापुढें जीभ । द्वेषानें लाभे लाभ ॥ कोणता ॥
दुसऱ्याचें काळें करितां । आपुल्याच आधीं हातां ॥ घाण ती ॥
भलभलतें बोलायाला । हें तुमचें योग्य तुम्हाला ॥ वाटतें ॥
कधिं न कळे हें शस्त्राला । कापतों कसें दुसऱ्याला ॥ आपण ॥
हें मनीं । तुम्ही जाणुनी । द्वेष या क्षणीं । मनांतिल काढा ॥
नांदत्या घरीं हा तेढा ॥ योग्य ना "॥
ऐकले शब्द सासूनें । आली ती संतापानें ॥ उसळुनी ॥
जी केरसुणी हातांत । पाठीवर ती जोरांत ॥ मारिली ॥
लाथेचा बसतां मार । ती पडे काय करणार ? ॥ बापुडी ॥
दाबतां गाल रागांत । नख लागे येई रक्त ॥ त्यांतुनी ॥
रागानें फिरवित डोळे । त्या सुनेस सासू बोले ॥ ओढुनी ॥
" अवदसे ! ऊठ येथूनी ! । कर काळें....दृष्टीपुढुनी ॥ दूर हो "॥
" पसरतें–। पदर, जोडतें–। हात, पण न तें ॥ अशुभवच बोला ॥
कां मजवर इतक्या झाला ॥ निष्ठुर " ॥
पायावर शिर ठेवून । सासूला विनयें सून ॥ ती म्हणे ॥
" मज नका नका मारूं हो ! । सांभाळुन मजला घ्याहो ! ॥ या घरीं ॥

केलांत असा धिःकार । तर कुठें बरें जाणार ! ।। दीन मी ।।
आभाळ जरी कोसळलें । तरि इथेंच जगलें, मेलें ।। पाहिजे ।।
माहेरीं जन्मा आलें । मी तेथें मोठी झालें ।। खेळलें ।।
तरि नवा लग्न–संबंध । त्या मधुर ममत्वां बांध ।। घालतो ।।
सांगतो तत्व तो हेंच । कीं 'तुझा जन्म दुसराच ।। सासरीं ' ।।
सर्वस्व असे कांहीं जें । तें आहे सारें माझें ।। याइथें ।।
मेलें तर येथुन सुटलें ! । संबंध इथें मम सगळे ।। दृढतर ।।
विनति ही– । असे, या गृहीं । करा कायही ।। बरें वाईट ।।
पण इथें लागुंदे वाट ।। एकदां " ।५

---

# प्रकरण नववें.

## " प्रकाश कीं अंधार ! "

तों वृद्ध सासरा आला । ऐकून गृहीं झालेला ।। गलबला ।।
ती उठे सून विनयानें । तें मामंजींचें येणें ।। पाहतां ।।
टाकून अंग भूवरतीं । रडुं मोठ्यानें सासू ती ।। लागली ।।
" ही पहा ! आपली सून । अंगावर ये चालून ।। बोलतां ।।
हें चित्र पहा प्रत्यक्ष । प्रत्यक्षा नलगे साक्ष ।। द्यावया ।।
आपणांस बघतां उठली । माझी तर आहे केली ।। खातरी ।।
दुर्गेनें मज सोडविली । करुं कसें ? उरावर बसली ।। सून ही ।।
दुर्गेला आणी मजला । या सूनबाइच्या लीला ।। माहिती ।।
पाहतां काय ' आ ' करुन । या पुढें जरा खोऊन ।। धोतर ।।
शेंडीला बांधा गांठ । या असे सुनेशीं गांठ ।। समजलां ।।
ती खालीं ठेवा माळ । सौख्याचा झाला माळ ।। तिजमुळें ।।

चोप द्या । पिटाळून द्या । जरा लक्ष द्या ॥ आजपासून ॥
ही असे मुळावर सून ॥ आपल्या ॥
जाऊन विचारा त्यांना । समजेतें रंगुनानांना ॥ ज्योतिष ”
“ गंधही न त्या विद्येचा । धंदा तो आहे त्यांचा ॥ वैद्यकी ॥
त्यांतही न शिकलेले ते । ‘ हिंगाष्टक ’ करितां येतें ॥ केवळ ॥
निर्वृक्ष अशा देशांत । एरंड द्रुम ठरतात ॥ श्रेष्ठ कीं ॥
ते वैद्य आडनांवाचे । दर्शनें प्राण रोग्याचे ॥ जायचे ॥
गुटिकेनें त्यांच्या सहज । तें मरण उद्यांचें आज ॥ यायचें ॥
‘ शक्तिपाक ’ त्यांचा घेतां । शक्ति ‘ पाक ’ बघतां बघतां ॥ व्हायची ॥
करुं नको पुन्हां उच्चार ! । जाणतों प्रतापी थोर (?) ॥ वैद्य ते ॥
तूं मुळावरीं सर्वांच्या । प्रत्यक्ष येतसे अमुच्या ॥ अनुभवां ” ॥
“ आला तरि काय पिऊन ! । वेगळें दिसे अवसान ! ॥ आजचें ॥
हा अतां पुसावा घाम । रागावा मग, आराम ॥ घ्या जरा ॥
कासोटा बांधा सुटला । सरसावुन भांडायाला ॥ या मग ” ॥
“ बडबड तूं किति करतेस । अति खट्याळ तूं आहेस ॥ शांत हो ! ॥
आणलीस मजला लाज । त्रासलों फार मी आज । तुज असे ॥
किति घेऊं मी ऐकून । फुटले हे माझे कान ॥ काय हें ॥
जरि कशिही असली सून । गृहिं हवीच सांभाळून ॥ घ्यावया ॥
त्यांतुन ही निरअपराधी । हवि सांभाळुन हिज आधीं ॥ घ्यावया ॥
निष्कारण सासुरवास । अविचारें कां करितेस ॥ दांडगे ! ” ॥
“ हें काय बोलणें असलें ! । मीं कुभांड नाहीं रचिलें ॥ हिजवरीं ॥
बोलतां हिच्या बाजूनें । राहेना वजन अशानें ॥ सासुचें ” ॥
“ जर असेल तर राहील ! । सन्मान कोण देईल ॥ दुर्गुणा ” ॥
“ चढविलेंत आपण हिजला । बोलते म्हणुन सासूला ॥ टाकुनी ” ॥
“ टाकून, तूंच, वदतेस ! सांगेल अशा वेळेस ॥ कुणिहि तें ॥

आजचा तुझा अपराध । चौथ्यांदा करुं तरि बोध ॥ मी किती ॥
काढतों येथुनी पाय । लोकां तरि सांगुन काय ॥ लाभ तो ॥
ना कधीं सुखाचें नांव । आजच्या प्रसंगें जीव ॥ त्रासला ॥
जावेंच उद्यां वाडीला ॥ मीं विचार होता केला । हा मनीं ॥
मम तेथें आहे भागिनी ॥ घेईल मनापासोनी ॥ ठेउनी ॥
पण निश्चय आतां ठरला । या क्षणीं पहा वाडीला ॥ चाललों ॥
या असल्या म्हारवड्यांत । पाणीही नाहीं पीत ॥ मी अतां " ॥
" बाबा ! व्हा थोडे शांत । या, जाउं नका तावांत ॥ आपण " ॥
" कां बरें ? असा अपमान । राहील कोण ? सोसून ॥ या घरीं ॥
केला जो आहे बेत । पडणार न कधिंही त्यांत ॥ अंतर ॥
मी पुढें पुन्हां येईन । वागल आजपासून ॥ जर भली ॥
या घरीं । अतां क्षणभरी । शांति अंतरीं । लाभणें कठिण " ॥
विष्णुपंत हें बोलून ॥ चालले ! ॥

---

# प्रकरण दहावें.

## " गडगडाट आणि विद्युत्पात ! "

" दुर्दैवरूप कूपांत । अत्यंत दिवस दुःखांत ॥ कंठिते ॥
'नवजीवन' देउन मजला । करिशिल कां ! दीन दयाळा ! ॥ रक्षण ॥
अघटीत तुझी ही लीला । अग्नींत महानंदेला ॥ तारिलें ॥
मामंजी त्रासुन गेले । माझ्या न बाजुचें उरलें ॥ कुणि इथें ॥
यापुढचे दिन अति कठिण ! । धडधडतें अंतःकरण ॥ करुं कसें " ॥
यापरी म्हणे ती सून । तों सासू संतापून ॥ ये पुन्हां ॥

" बसलीस अवदसे ! ऊठ ! । आणतें कोरडा पाठ ॥ फोडतें ॥
केलाच असे निर्धार ! । संसार करुं न देणार ! ॥ मी तुला ॥
त्यांच्या तूं मर्जीमधली । म्हणुनी कीं त्यांनीं केली ॥ स्तुति तुझी ॥
पण आतां या वेळेस । तावडींत सांपडलीस ॥ चांगली ॥
परवांसम दम धर करितें । आणतें उलथणें देतें ॥ डागण्या ॥
येणार न धावुन कोणी । तुज जरी जिती मारूनी ॥ टाकली ॥
मी तुला आजपासून । तळघरामधें कोंडून ॥ ठेवितें ॥
चल, ऊठ ! नाहिं ऐकत कां । देणार न चालूं हेका ॥ मी तुझा ॥
जोंवर मी आहे लांब । तोंवरीच कांहीं आब ॥ राख तूं ॥
तुडवीत तुला लाथेनें । ओढून अतां मज नेणें ॥ भाग कीं ॥ "
यापरी वदुन सासूनें । गरगरा नेत्र रागानें ॥ फिरविले ॥
लीलेवर ये चालूनी । वीज कीं जणूं कडकडुनी ॥ कोसळे ॥
काळीज हले लीलेचें । विक्राळ रूप सासूचें ॥ पाहतां ॥
ये तिला घाम दरदरुनी । रोमांच उभे राहूनी ॥ तनुवरीं ॥
संचरे कंप अंगांत । ' होणारच वज्राघात ' ॥ मनिं म्हणे ॥
"कुणि आहे कां बाहेर.... ! "। " मी आहे वैनी ! फार ॥ बोलता ? ॥
वाढवूं विषय बघतां कां ?। भय कसलें? आम्ही लोकां ॥ सांगु कीं ॥
किति झालें तरि सासू ही । धिःकारुन वदणें कांहीं ॥ योग्य ना ॥ "
" वन्सं ! व्हा दूर, कशाला । माझ्याशीं झोंबायाला ॥ लागला ।
कां ? धरिता सोडा हात । हें काय ? कुठें ना जात ॥ पळुन मी " ॥
" गेलांत तरी चालेल । ती माझी मोहनमाळ ॥ द्या कशी ॥ "
"कधिं दिलीत हो ! मजजवळ । माझेवर नसता आळ ॥ घालिता " ॥
" जर तुम्हां दिली मी असती । मागितली तर मी नसती ॥ चुकुनही ॥
घेतलीत ती चोरून । केव्हांच ट्रंक उघडून ॥ हळुंच ती ॥
तुम्हि सवाष्ण घालानाका । गप बसलें म्हणुनी, तें कां ? ॥ विसरला ॥

शिकलांत कधीं हो ! असलें । एकेक नवीनच आलें ॥ कळुन हें ॥
रडुं नका पुरें कीं आतां । हे ढंग कशाला करितां ॥ मजपुढें " ॥
"करुं तरी काय मी वन्सं । घ्या प्राण गळ्याला फास ॥ अडकवा ॥
छळवाद पुरे हा झाला । मी पितें विषाचा पेला ॥ आणवा ॥
झाल्यावर माझा अंत ! । होतिलना ? डोळे शांत ॥ मग तरी " ॥
"आहात शाहण्या, कांहीं— । तारणें, मारणें नाहीं ॥ हातचें ॥
या आंत बडबडा मग कीं । करुं बघतां छीः थूः लोकीं ॥ कां वृथा "॥
"बघतेस काय ! तूं दुर्गे ! । ओढ ओढ तिजला मागें ॥ सत्वर ॥
गांवचे लोक फाजील । बाजुनें तिच्या वदतील ॥ आपणां ॥
फावेल चांगलें त्यांस । आधींच सदा आम्हांस ॥ निंदिती ॥
अनमान नको धर पदर । कमरेंत तिच्या तूं मार ॥ लाथही " ॥
करकरा दांत चावीत । बोलुन त्या आवेशांत ॥ सासुनें— ॥
मारिला । विळा पोरिला । शिरीं लागला । घाव जोरानें ॥
हंबरडा क्षणिं गाईनें ॥ फोडिला ॥
" मेले गे आई ! आई !! । करुं कसें न आतां होई ॥ सोसणें " ॥
ऐकतांच ती किंकाळी । क्षणिं आली आळीमधली ॥ मंडळी ॥
त्यांनाही गहिंवर आला । पाहतांच त्या दृश्याला ॥ भीषण ॥
तात्काळ जखम बांधोन । लीलेस धीर देऊन ॥ बोलले ॥
" हें काय म्हाळसाबाई ! ॥ आपणांस शोभत नाहीं ॥ कृत्य हें ॥
आपणही होतां सून । त्या प्रसंगास उमगून ॥ कां ? अशा ॥
प्रत्येक बायको सून—। असते, हें नाहीं कोण ? ॥ म्हणुं शके ॥
'पुढच्यास लागतां ठेच । मागचा शहाणा,' जाच ॥ कां करा ॥
जन्मूच नये कां मुलिंनीं । जन्मलेंच ! जावें मरुनी ॥ त्याक्षणीं ॥
हेंच काय ? म्हणणें अपुलें । अपुल्याहि मुलीचें झालें ॥ लग्न तें ॥
दैवाचा नसता रोष । ती असती यावेळेस ॥ सासरीं ॥



तात्काळ जखम बांधून । लीलेस धीर देऊन ॥ बोलले—॥
“ हें काय ? म्हाळसाबाई ! । आपणांस शोभत नाहीं ॥ कृत्य हें ॥ ” पान २६.

जर असता तिजला जाच । नसता कां पडला पेंच ॥ आपणां ॥
परकुळीं । पोर आपुली । जणूं हृत्कळी । देति जे कोणी ॥
जाळाया का ! आतोनी ॥ इंगळ ॥
घ्या मागें हात, कशाला । चालून सुनेवर आला ॥ आणखी ॥
आहांत कुठें ? व्हा दूर ! । गाजवूं नका अधिकार ! ॥ हा असा ॥
परदेशीं आहे पोर । लागला करूं धिःक्कार ॥ म्हणुन कां ॥
लाउनी न देऊं हात । असतांना लोक जिवंत ॥ हे अम्ही ॥
चालवा अम्हांवर काठी । सोसूं या पोरीसाठीं ॥ मार हा ॥
विष्णुपंत येथें असते । पाहवलें त्यांना नसतें ॥ दृश्य हें ॥
पाहतेस उघड्या नयनीं । दुर्गे ! तूं उभि राहूनी ॥ काय हें ॥
आईस आपुल्या सांग । उपयोगी ना अतिराग । हा असा ॥
दुर्दैवें असलें फूल । सांपडलें या प्रतिकूल ॥ स्थितिमधें ॥
किति बरें त्रास सोसेल । करपली पहा ही वेल ॥ कोंवळी ॥
साधून असें हें वैर ! । कोणता स्वर्ग मिळणार ! ॥ तो तुम्हां ॥
लाभली । सून चांगली । तुम्ही भाजिली ॥ हिला पण छळुनी ॥
निष्ठुरता अंतःकरणीं ॥ काय ही " ॥
" हे तुम्ही शुंभ जमलांत । येई न कसें लक्षांत ॥ एवढें ॥
वेड का ! लागलें मजला । या सुनेस मारायाला ॥ कायहो ! ॥
माझ्याशीं भांडायाला । वकिलपत्र घेउन आला ॥ का ? तिचें ॥
बायका सुधारा तुमच्या । या करावया मग अमुच्या ॥ चौकशा ॥
लागला नाक फुगवून । बोलाया पिंजारून ॥ त्या मिशा ॥
पण माझ्यापुढती तुमचें । कांहींही चालायाचें ॥ नाहिं हो ! ॥
सांगतें सरळ शब्दांनीं । आलेल्या या पायांनीं ॥ परत जा ॥
अवदसाच आहे असली । घडपडे कधीं ना बसली ॥ स्वस्थही ॥
सोडून कामकाजास । कां मरावया गेलीस ॥ तूं तिथें ॥

हे तुझे पुरेतच नखरे । मी लग्न मुलाचें दुसरें ॥ करिन कीं ॥
कमि काय असे शिकलेला । मिळतील हजारों त्याला ॥ बायका ॥
किति घरांत होती शांती । पण तुझीच साडेसाती ॥ लागली ॥
हिंडणें । उलट बोलणें । तुला याविणें । सुचेना कांहीं ॥
वैरीण, कशाची बाई ॥ सून तूं ” ॥

---

# प्रकरण अकरावें.

## लीलेचें संसार–चित्र.

सासूला समजाऊन । चालली खिन्न होऊन ॥ मंडळी ॥
उपदेश जनीं जो केला । तो सासूच्या हृदयाला ॥ झोंबला ॥
रागानें गेली आंत । आपल्या कामकाजांत ॥ गुंतली ॥
ती कण्हे सारखी पोर । लागल्या व्हावया फार ॥ वेदना ॥
भडकली क्षुधा पोटांत । माध्यान्ह काळ अत्यंत ॥ कठिण कीं ॥
दुःखाश्रुबिंदु डोळ्यांत । डोकींतुन येई रक्त ॥ झिरपुनी ॥
जेवली मंडळी सर्व । सासूस वाटलें पर्व ॥ साधलें ॥
जेउनी ढेकरा देत । दुर्गा ती माजघरांत ॥ झोपली ॥
माधव तर पोरच, गेला–। तो निमुटपणें शाळेला ॥ सत्वरें ॥
“ मिळतिल का ? तुकडे चार । जठराग्नी माझा प्रखर ॥ पेटला ॥
काय घालुं, या पोटांत । ढेकुळही नाहीं दिसत ॥ करुं कसें ।
ठोकळ्यांतली वाळूही । यावेळीं येथें नाहीं ॥ करुं कसें ॥
त्या सोप्यांतिल केरांत । शेंगांचीं जीं आहेत ॥ टरफलें ॥
जर दिलीं कुणीं आणुन तीं । पोटांत कोंबलीं असतीं ॥ मी सुखें ॥
लागली तृषा अत्यंत । हे पिउन अश्रु करुं शांत ॥ काय मी ॥

मीं तसेंहि असतें केलें । पण गाळुन गाळुन सरले ॥ करुं कसें ॥
बांधिली जखम लोकांनीं । फडकीं हीं ओलीं करुनी ॥ जी मवां ।
तीं सर्व हळुंच सोडूनी । प्यालें जळ असतें पिळुनी ॥ त्यांतलें ॥
पण तींही वाळुन गेलीं । नांवाला केवळ ओलीं ॥ राहिलीं ॥
त्यांचाही बोळा करुनी । गारवा, यावया वदनीं ॥ घालुं कां? ॥
पण सोडतांच गांठीला । सुरवात होय आगीला ॥ करुं कसें ! ॥
खळग्यांत अंगणांतिल तें । प्यावया पाणि मज दिसतें ॥ सांठलें ॥
पण गुलाम मी झालेली । जावया तिथेंही कुठली ॥ हिम्मत ॥
जर धैर्य गेलें तेथें । फोडतील माझें माथें ॥ आणखी ॥
सोसलें तथापी असतें । तात्काळ तिथें जर येतें ॥ मरण तें ॥
जरि कितिही रडलें रडलें । सारखे चोळुनी डोळे ॥ घेतले ॥
होणार काय हातून! । पशुतुल्य परस्वाधीन ! ॥ मी असे ॥
वाऱ्यानें धूळ उडाली । ती पडे भूमिवर सगळी ॥ तरि पुन्हां ॥
हा 'सासुरवासच' असला । जाळतो जित्या देहाला ॥ हळुं हळूं ॥
हा मृत्युहूनही घोर ! । यातना भयंकर फार ॥ करि सदा ॥
मृत्यो! तूं फार दयाळू । पाहतोस देहा जाळूं ॥ एकदां" ॥
यापरी बोलुनी पडली । धरणीवर कळवळलेली ॥ ती मृगी ॥
तडफडे। जीव, चहुंकडे–। बघूनी रडे । होय दुःखाचें ॥
'संसारचित्र' लीलेचें ॥ एक हें ॥

---

# प्रकरण बारावें.

## "प्रसन्नतेच्या पोटीं विषण्णता" !

रविकिरणें अस्ता गेलीं । क्षण उदासीनता आली ॥ चहुंकडे ॥
नक्षत्रें डोकावूनी । आकाश–गवाक्षांमधुनी ॥ पाहती ॥

अंधार तिच्या खोलींत । बाहेर दिवे दिसतात ॥ चहुंकडे ॥
आनंद भरे बाहेर । अंतरीं तिच्या अंधार ॥ पसरला ॥
शशिकिरण झरोक्यांमधुनीं । त्या अंधारांत खुलूनी ॥ ये पण ॥
तें किरण तिच्या आशेचें । उदयाचें कीं अस्ताचें ॥ ना कळे ॥
तेवढाच तो आधार । त्या तसल्या जीवा धीर ॥ द्यावया ॥
शशिबिम्ब फांकलें गालीं । अश्रूंची सुंदर खुलली ॥ मौक्तिकें ॥
सुकलेल्या गालावरतीं । नांदाया आत्मिक शक्ती ॥ लागली ॥
ती होती गुदमरलेली । वाऱ्याची शीतल आली ॥ झुळुक तों ॥
संत्रस्त जाहल्या जीवा । आशेचा ये ओलावा ॥ क्षणिकसा ॥
त्यामुळें उठे उत्साहें । ये किरण मुखीं ती पाहे ॥ त्याकडे ॥
" अंधार इथें हा घोर । आलास म्हणुन का ! धीर ॥ द्यावया ॥
किति वेळ टिकूं शकणार । जरि दिलास तूं आधार ॥ या स्थळीं ॥
स्त्री-हृदय उभें बाहेर । निष्कारण दावेदार ॥ होउनी ॥
तें म्हणतें ' सासुरवास । लावणार भोगायास ॥ मी तुला ॥
हें मंगलसूत्र कशाचें । दावेंच तुझ्या मरणाचें ॥ बांधिलें ॥
मृत्यु तो तुझ्या वांट्याला । लागणार तूं मार्गाला ॥ हळुहळू ' ॥
बंधो ! तूं फारच भोळा । स्त्री--हृदयबुद्धिची लीला ॥ नेणसी ॥
मज आहे सासुरवास । येइल का ? चुकवायास ॥ कायरे ! ॥
कां मधेंच तूं हलतोस । बघवेना ? सासुरवास ॥ घोर हा ॥
म्हणुन काय तूं हलतोस । समजावें या वेळेस ॥ काय मीं ॥
करिशिल का ! माझें काम । घाई न जरा आराम ॥ घे बरें ! ॥
मरणोन्मुख झाली लीला । हें पुण्यास सांगायाला ॥ जा उद्यां ॥
तूं प्रवेश कर बेतानें । शहरांतिल वातावरणें ॥ जाणुनी ॥
हलकेंच जाउनी आंत । सांग तूं सर्व कानांत ॥ ' इकडचे ' ॥
असतील गाढ झोपेंत । किंवा त्या अभ्यासांत ॥ गुंतले ॥

तर नको जाउं त्या वेळीं । थोरांची मर्जी जपली ॥ पाहिजे ॥
स्वारीस नाद काव्याचा । आणखी लेख लिहिण्याचा ॥ नेहमीं ॥
असतिल जर कांहीं लिहित । तर खुशाल जा तूं आंत ॥ स्वागतां ॥
नाविन्य लागतें कविंना । काव्य—लेख रंगवितांना ॥ नेहमीं ॥
पाहतांच तूं आलेल्ला । वळवितील ते प्रतिभेला ॥ तुजकडे ॥
त्यामुळें तुला चिरकाल ! । काव्यांत पहा ! लाभेल ॥ स्थान, तें ॥
विघ्नें न मुळीं येणार । वाढता तुझा भरपूर ॥ काळ हा ॥
हो ! बरी आठवण झाली । आलेलीं पत्रें पहिलीं ॥ पाहुंया ॥
माझ्यावर लिहिल्या कविता । रमविती किती या चित्ता ॥ वाचिता" ॥
हें वदुन, तिनें त्यावेळीं । पत्रें त्या ट्रंकेमधलीं ॥ काढिलीं ॥
आनंदें वाचूं लागे । प्रेमाचें झालें जागे ॥ हृदय, तों ॥
ते प्रसंगही आठवले । विरहानें व्याकुल झालें ॥ मन तिचें ॥

( पत्र पहिलें )

श्रीशिवप्रसन्न ! पुणें, पेठ सदाशिव

लाडके सरले !

तुला माझे अनेक आ. काव्यमय कोमल कल्पनांच्या—सृष्टींत प्रतिभेच्या—चंद्रिकेंत तुझ्या सुंदर मुखचंद्राला पाहतांच प्राणेश्वरी ! माझ्या हृदय—सागरास प्रेमानें भरती आली आहे. उसळणाऱ्या स्वैर लाटांना तुझ्या प्रेमाचा शीतल वारा स्पर्शतांच अहाहा ! उठणारे प्रेमविषयक मनोभाव कोणत्या शब्दांनीं व्यक्त करूं ? पत्रासोबत कविता पाठविल्या आहेत ! राणीसाहेब स्वीकार करतीलना !

तुझा, लीला—रमण, कमलाकर.

राग:—बिहाग

ये ये तूं प्रेम सखे ! त्वरित या स्थळीं ।
भेटीची तळमळ मज फार लागली ॥ ध्रु० ॥

प्रेम तुझें लावि पिसें ।
क्षणहि मना चैन नसे ।
शब्दें करुं व्यक्त कसें ! ।
स्वगतास मी तुझ्या उतावळा असे ॥ १ ॥

रागः—मालकंस

खिन्न मना प्रेम हेंचि होय जीवन ॥ ध्रु० ॥
सहवासें तव कळलें ।
संसारीं मन रमलें ।
काव्य मला आठवलें ।
केलें तुज भाव–बद्ध–काव्य अर्पण ! ॥ २ ॥

रागः—बागेश्री.

विरह तुझा देइ मला नित्य जागृती ।
विरह तुझा देईना पडुन विस्मृती ॥ ध्रु० ॥
तुजकडेच मन वळलें ।
विरहाकुल अति झालें ।
विरहानें दाखविलें– ।
प्राणसखे ! प्रेमाचें स्थान संप्रती ॥ ३ ॥

—तुझा, 'लीला–रमण,' कमलाकर.

## ( पत्र दुसरें )

॥ श्रीशिवप्रसन्न ॥ पुणें "लॉ कॉलेज"

लाडके सरले !

तुला माझे अ. आ. या वेळीं कॉलेजचें रमणीय वातावरण मनाला उल्हसीत करीत असतां तुझ्या प्रेमाची गोड आठवण सारखी हुरहूर लावीत आहे ! माझ्या मनास्थितीशीं किंचित् जुळणारें वर्णन, टिळकांच्या " ममत्वाचें खालती आलवाल । वरुन विरहाचें ऊनही

विलोल ॥ या कवितेंत सांपडेल ! या पत्रासोबत कविता पाठवीत आहे. काव्यमय पत्रास गद्य मजकुराची जोड देणें म्हणजे ' पैठणीस ठिगळ ' जोडण्यासारखेंच होणार ! प्रेममय दृष्टीला निदान मला तरी तें ठिगळ सुंदरच दिसेल. तथापि एवढें खरें कीं, माझे लाडके ! ठिगळांची पैठणी होतां कामा नये ! असो; नेहमीं कवितेंतच पत्रें पाठवितों म्हणून तुला राग नाहींना येणार ! आला तरी तो रागच अनुराग वाढवीत आहे. अनुरागावांचून प्रेम-पराग सुंदर दिसत नाहींत. होयना !

तुझा—लीला-रमण, कमलाकर.

## " मानवी-जीवित "

चालः—" यापरी असे जीवन....या चालीसारखी

निःसार असे संसार । सखे ! पण आम्हां कधिं कळणार ॥ध्रु०॥

पहा ! या श्रावण मासांतलें ।
रविचें किरण कसें कोवळें ।
ढगांतुन खुलें क्षणीं मावळें ।
तसा असे संसार, मनीं पण केंव्हां हें ठसणार ! ॥ १ ॥
काल, जीं मंगळागौरिस फुलें ।
वाहिलिस प्रेमानें प्रेमळे ! ।
सकाळीं पहा ! पुन्हां चांगलें ।
सुकलेलीं तुज दिसतिल सगळीं पुष्पें तीं सुकुमार ! ॥ २ ॥
अधर तव रति-क्रीडा-केतन ।
गालिचें सुंदर नाजुकपण ।
सुबक तव देहाची ठेवण ।
तारुण्याचा बहर अरेरे !!! कालें ओसरणार ! ॥ ३ ॥
क्षणाचा नसे भरंवसा मुळीं ।
सुखाची असे कल्पना खुळी ।
जशी कीं वृक्षाची साउली ।

पांथस्थाला सांग ! कितीशी विश्रांती देणार ! ॥ ४ ॥
सखे ! तूं तिथें आणि मी इथें ।
पडदा विरहाचा त्यांमधें ।
विचारें पहा, नीट तूं सुधे !
कुणास ठाउक भविष्यकालीं काय काय होणार ! ॥ ५ ॥

—तुझा
" लीला–रमण,–कमलाकर "

× × ×

" पाठविलीं पत्रें तीन । तरि उत्तर नाहीं अजुन ॥ कां बरें ! ॥
कल्याण पुण्यांतिल दीर । फोडतो पत्रव्यवहार ॥ काय कीं ॥
या दीड दोन महिन्यांत । ' तिकडचें ' न कळलें वृत्त ॥ तें कसें ॥
ती जवळ परिक्षा आली । अभ्यासीं स्वारी रमली ॥ काय कीं ॥
काव्याचा नाद सदैव । कीं त्यांतच रमला जीव ॥ ना कळे "
कितितरी मनाशीं बोले । मन, मनाशींच कीं रमलें ॥ तें तिचें ॥
वाचतां वाचतां निजली । हातांतिल पत्रें गळलीं ॥ तीं उरीं ॥
त्याक्षणीं । दुःख विसरुनी । रमे गुंतुनीं–॥ स्वप्न–सौख्यांत ॥
हा 'सासुरवास' जगांत ॥ कितितरी ! ॥

---

# प्रकरण तेरावें

## " ध्यानीं तें मनीं "

घेऊन पत्र हातांत । तों येता झाला दूत– ॥ द्यावया ॥
" कोठें त्या लीलाबाई ! " । सत्त्वरें पत्र ती जाई ॥ घ्यावया ॥
फोडिलें पत्र वाचाया । शब्दांत दिसे त्या माया ॥ साठली ॥
खुदकन् ती हंसली तेव्हां । नवलाई वाटुन जीवा ॥ लाजली ॥

" जणुं मोत्यांचे हे दाणे । काढिलींत कौशल्यानें ॥ अक्षरें ॥
किति योजकता शब्दांत । किति अलंकार भाषेंत ॥ विखुरले ॥
किति भाषा आहे मधुर । लिहिणेंही पद्धतशीर ॥ कितितरी ॥
मनिं परस्परीं जाणावें । केलें त्या ' सरला ' नांवें ॥ स्वागत ॥
येणार उद्यांला स्वारी । राहीन उभी मी दारीं ॥ स्वागतां ॥
चुकचुकली वरती पाल । ' सत्य सत्य ' होतिल बोल ॥ काय हे ॥
गालांत अहा ! हंसतील । रोखून सुखें बघतील ॥ मजकडे ॥
त्यावेळीं आनंदून । जाईन लाजलाजून ॥ आंत मी ॥
अमृताची केवळ वृष्टी । स्वारीची आहे दृष्टी ॥ मोहक ॥
तरतरी अती अंगांत । स्वारिची शिस्त नेमस्त ॥ नेहमीं ॥
येतिल कीं सासूबाई । लपवावें करुनी घाई ॥ पत्र हें ॥
हें पत्र जपुन ठेवावें । वाचावें मन रमवावें ॥ प्रतिदिनीं "
तों पत्रच खालीं पडलें । आणि उचलायाला सजले ॥ कर, तिचे ॥
' हें पत्र खरें कीं स्वप्न ' । हा विचार येतां नयन ॥ उघडि ती ॥
त्याक्षणीं । स्वप्न संपुनी । तिच्या लोचनीं ॥ जागृती आली ॥
दृश्यें तीं स्वप्नांमधलीं ॥ लोपलीं ॥

## प्रकरण चवदावें.

### " भयंकर दृश्य "!

ते प्रेम, हर्ष, उन्माद । कुठले मग? डसला खेद ॥ अंतरीं ॥
ना पत्र, पोष्टमन कोणी । भव्य नाग आढ्यांमधुनीं ॥ चुकचुके ॥
फूस्कारी वारंवार । विक्राळ जिभा बाहेर ॥ काढुनी ॥
शशिकिरणहि कोठें गेलें । काळीज तिचें धडधडलें ॥ ती म्हणे-॥

"सर्पराज! वंदन तुजला। आहेस कुठें? ध्वनि कळला ॥ मज, तुझा॥
ये बाबा! ये ये खालीं। पायाला या वेटोळी ॥ घाल तूं ॥
कर असा दंश कडकडुनी। क्षणिं जावा देहामधुनीं ॥ प्राण या ॥
ही आली असती लीला। तव मुखामधें देण्याला ॥ हात हा ॥
अंधार इथें पण दाट। होणार कशी रे! भेट ॥ आपुली ॥
आठवली युक्ती मजला। 'आ' करितें वरुनी गरळा ॥ टाक तूं ॥
'अपराधावांचुन दंश। करुं कसा, होय दोषास ॥ पात्र मी' ॥
हा विचार तव मनिं आला। म्हणुन काय या वेळेला ॥ स्वस्थ तूं॥
सर्पजात म्हणती नीच। नीतिचा धर्म आहेच ॥ तींतही ॥
हें पहा मला कर दंश। हा चुकेल सासुरवास ॥ त्यामुळें ॥
लागेल तुला पुण्याई। जाचांतुन सोडिव, येई ॥ सत्वरें ॥
हा ताप तुझा सोसेन। सोडीन सुखानें प्राण ॥ यास्थलीं ॥
मी उठतें अदमासानें। फिरवितें हात जोरानें ॥ सारखे ॥
हाताचा होतां स्पर्श। आपणहुन करशिल दंश ॥ मग तरी" ॥
उठलेली वैतागून। ती पडे तोल जाऊन ॥ त्याक्षणीं ॥
शिरिं घुसे खिळा दाराचा। खालती सडा रक्ताचा ॥ जाहला ॥
आधींच जखम डोकीला। तिजवरीच पडला घाला ॥ हा पुन्हां ॥
रक्ताची उसळे धार। ये, घेरी झाली पोर ॥ घाबरी ॥
रक्तानें छाती भिजली। बघवेना तिज त्यावेळीं ॥ दृश्य तें ॥
ती मनीं। विकल होउनी। बांधि भिजवुनी ॥ चिंधि, रक्तांत ॥

दुर्दैव
बघाया
अंत ॥
लागलें ॥

---

# प्रकरण पंधरावें.

## दुर्विचारांचें महायुद्ध !

" ही केव्हां पोर टळेल । दुर्गे ! मीं केले हाल ॥ यास्तव ॥
घातलें तिखट डोळ्यांत । मी हिच्या घाव डोकींत ॥ कितितरी ॥
ठेंचिलीं हिचीं मीं बोटें । " चोरटी " म्हणूनी खोटें ॥ उठविलें ॥
जें कुजकें, उष्टें अन्न । पानांत हिच्या वाढून ॥ ठेविलें ॥
एक वेळ जेवायाला । सर्वकाळ मीं कामाला ॥ लाविलें ॥
किति सांगू, सांगत बसलें– । तर संपणार ना, केलें ॥ मीं असें ॥
निर्लज्ज, धीट पण पोर । काढी न मुखाबाहेर ॥ शब्दही " ॥
"आई ! पण इतक्यांमधुनी । ही टिकून राहे अजुनी ॥ नवल हें ॥
परवांच हिच्या बाजूनें । बाबाही अभिमानानें ॥ बोलले ॥
आल्यावर नवऱ्यालाही । बिघडवील आई ! कांहीं ॥ नेम ना ॥
केलेला सासुर–वास । सांगेल फुगवुनी त्यास ॥ ही वथा ॥
टाकून अम्हां बोलेल । कैवार हिचा घेईल ॥ तो सदा ॥
तात्पर्य हिचा अधिकार । या घरीं सुरू होणार ॥ दिसतसे " ॥
" दुर्गे ! तें नांव कशाला । दोघांना मी घाण्याला ॥ जुंपिन ॥
या घरीं हिचा अधिकार । तिळमात्र कधिं न देणार ॥ चालुनी "॥
" आई ! पण या योगानें । होतील नित्य जोरानें ॥ भांडणें ॥
दादाही तापट फार । मजलातर ना देणार ॥ बोलुनी " ॥
" कां ? डोळे भरले हे गे ! । रडुं नकोस आवर दुर्गे ! ॥ हुंदका ॥
कळत काय ! नाहीं मजला । सर्वांच्या ही दुःखाला ॥ कारण ॥
काटाच हिचा उपटूंया ॥ हिजलाच जगांतुन करुंया ॥ नाहिंशी ॥
कां ? करुनी घेशी त्रास । सांगतें एक, हीं पूस ॥ आंसवें ॥

तोंडांत घालुनी बोळा । बांधून दगड पाठीला ॥ थोरला ॥
मोटळी करुन उचलूंया । त्या तळ्यांमधें लोटूंया ॥ युक्तिनें ॥
म्हणजे न कुणा कळणार ! । वर नाहीं तें येणार ॥ प्रेतही ॥
साधेल प्रसंगीं त्या जें । रात्रीं ती निजली म्हणजे ॥ करुं उद्यां ॥
साह्याला त्यावेळेला । त्या जया मोलकरिणीला ॥ आणुंया ॥
मारावी कशि लीलेला । हें तिनेंच परवां मजला ॥ सुचविलें ॥
ती इतकें सुद्धां वदली । 'द्या आज्ञा क्षणिं खांडोळी ॥ करिन, मी ' ॥
ती निपुण अशा कार्यांत । बोभाटा होउं न देत ॥ अल्पही ॥
गांवाला गेली आहे । येणार उद्यांला मज हें ॥ समजलें ॥
आपलें– । कार्य साधलें– । समज, वाजले– ॥ दोन, झोंपूंया ॥
लागली गस्त हिंडाया ॥ ऐकगे ! " ॥

---

## प्रकरण सोळावें.

### " दुर्दैवाची कामगिरी अरेरे ! ! ! "

सासू ती बोलत होती । अपरात्रीं हळु एकांतीं ॥ मुलिसवें ॥
लीलेच्या आलें कानीं । सावध ती अंतःकरणीं ॥ जाहली ॥
क्षणिं थरथर् कांपे देह । तें स्मशानतुल्यच गेह ॥ तिज गमे ।
" निमिषही न येथें बसतां । बाहेर पडावें आतां ॥ सत्वर ॥
यांचा तर निश्चय ठरला । देणार उद्यां रातीला ॥ मज दगा ॥
किति निष्ठुरता हृदयांत । जाचाचा झाला अंत ॥ यापुढें ॥
तें मरण उद्यां येणार ! । या घटकेलाच तयार ॥ मीतरी ॥
मी अपुल्या हातें मरतें । मन परिस्थितीनें करितें ॥ कठिण हें ॥
संसारा ! आतां येतें । दे निरोप तुटलें नातें ॥ जन्मि या ॥

हा काल ! । पहा ! विक्राळ ! । लोचनें लाल । मजकडे पाही ॥
म्हणतसे " मृत्युच्या गेहीं– ॥ चल मुली ! " ॥

× × ×

मंडळी घरीं निजलेली । रातही उलटुनी गेली ॥ बरिचशी ॥
कायसें ठेवुनी लिहुन । निर्धार मनाचा करुन ॥ ती उठे ॥
दुर्दैवच साह्या आलें । मार्गांतिल बंधन झालें ॥ मोकळें ॥
हलकेंच उघडिलें दार । लागे न वेळ बाहेर ॥ जावया ॥
मिणिमिणी ज्योत पणतींत । होती ती डुलक्या घेत ॥ सारखी ॥
जरि प्रकाश होता सान । बालेचें अंतःकरण ॥ वेधिलें ॥
' संप्रती । सर्व झोंपती । हीच सोबती । प्रसंगीं होय ' ॥
बोलून असे ती हृदय ॥ करि खुलें ॥

× × ×

पदरानें अश्रू पुसुनी । ज्योतीला त्या वंदूनी ॥ क्षण उभी ॥
त्या स्नेह–युक्त वातीला । भाव सर्व हृदयामधला ॥ जणुं कळे ॥
वाऱ्याचा तों ये झोत । ती विझतां विझतां वात ॥ वांचली ॥
मार्गांतच तुलशीदेवी । ती मस्तक भावें लववी ॥ तिजपुढें ॥
" तुलशीला माझ्या पाणी– । घालील कोण ? " तो नयनीं ॥ जल भरे ॥
ज्या मनीं । तर्क वाढुनी । होय तो धनी । तिथें तो जीव ॥
कथि जडाजडा निज भाव ॥ सकलही ॥

× × ×

" त्या भयाण ओसाडींत । दिसतसे विहिर अत्यंत ॥ जी जुनी ॥
त्या स्थलींच जावें सरळ । निर्विघ्नपणें साधेल ॥ कार्य हें ॥
जाचाला कंटाळून । आली ती मजसम सून ॥ जणुं तिथें ॥
जग तिचें तेवढ्या जागीं । नित्याचे दिन हतभागी ॥ कंठिते ॥
मज बरी दिसे मैत्रीण । घेईल जवळ ओढून ॥ तीतरी ॥

चारिचा जाहला गजर । आतां न करावा उशिर ॥ निमिषही " ॥
यापरीं । म्हणे अंतरीं । निघे सत्वरीं । होय अति धीट ॥
काळानें तिजला वाट ॥ दाविली ॥

× × ×

रानांत भालु आरडती । पिंगळे तशीं घुबडें तीं ॥ भीषण ॥
ते दिवस अश्विनामधले । रान सर्व होतें भिजलें ॥ दंहिवरें ॥
घन–माला झाल्या मलुल । त्या वर्षा–कालीं खेळ ॥ खेळुनी ॥
थंडिला होय सुरुवात । गारगार वाहे वात ॥ सारखा ॥
चांदणेंहि मावळलेलें । भीषणता अधिकच खेळे ॥ चहुंकडे ॥
हा नको प्रसंगच बघणें । जणुं नेत्र म्हणुन रजनीनें ॥ झाकले ॥
ती पाहे डोकावूनी । त्या जळीं नेत्र रोखूनी ॥ निर्भयें ॥
क्षण चित्त तिचें तों भ्यालें । तिज दृश्य भयंकर दिसलें ॥ कायसें ॥
तो तसाच कीं देखावा । मरणाला सुद्धां व्हावा ॥ भयदसा ॥
मरणांतिल प्याली जहर । त्यामुळें धीट ही पोर ॥ जाहली ॥
करि हास्य दिसे भीषणसें । रम्यत्व फुलांचें जैसें ॥ तें शवीं ॥
वर मान तिनें जों केली । खळकन् तों वरुनी गळली ॥ चांदणी ॥
तें दृश्य भयंकर बघुन । काळाचें अंतःकरण ॥ दचकलें ॥
' करण्यांत वेळ ना लाभ । प्राणनाथ! येतें लोभ–॥ राहुद्यां ॥
हा ऋणानुबंधच अमुचा–। अल्पकाळ, या जन्मींचा ॥ दिसतसे ॥
चांदणी नभीं होऊन । आपलें सुखें घेईन ॥ दर्शन ' ॥
बोलून असें त्यावेळीं । कांठावर लीला आली, ॥ क्षणिं तिनें–॥
सोडले मोकळे केस । माखलें कुंकु, पदरास ॥ खोविलें ॥
देवाचें करुनी स्मरण । नेत्र ते तिनें झाकून ॥ हाय रे !–॥
घेतली । उडी त्या जळीं । चुके ना मुळीं । नशिबिं जें लिहिलें ॥
मानवी प्रयत्नहि दुबळे ॥ त्यापुढें ॥

क्र. ता.

उसळलें क्षणीं जल, वरती । पोटांत दिव्य [illegible] तो ।। ध्यानस्थ ।।
विहरींत होय आवाज । "हें दृश्य पहा !" तो [illegible] ।। म्हणतसे ।।
तरुपानें सळसळलेलीं । पाण्यावर गळती झाली ।। भरभरा ।।
तें दृश्य बघुन तरुवेली । कंपायमान त्यावेळीं ।। जाहल्या ।।
वाहून वात जोरांत । "उद्धरून आहे नेत" ।। जणुं म्हणे ।।
तो निसर्ग रडला, हंसला । कारण तें त्याचें त्याला ।। माहिती ।।
लांवुनी । तोंच धावुनी । तरुण ये कुणी । बघे वाकून ।।
आला हा कुठला कोण? ।। नाकळे ।।

---

# प्रकरण सतरावें.

## "इकडे"

नित्याच्या अभ्यासाला । तों इकडे उठता झाला ।। माधव ।।
सहज जों बघे बाहेर । तों पुढचें दिसलें दार ।। मोकळें ।।
दचकलें तयाचें चित्त । राहिला उभा सोप्यांत ।। भीतिनें ।।
कळवून हळुंच आईला । चाहूल घ्यावया आला ।। आंगणीं ।।
म्हाळसाकाकु तों उठल्या । चुलिपाशीं आधीं गेल्या ।। लगबगा ।।
"पेवांतिल धान्यें विकुनी । मी पैसे येथें पुरुनी ।। ठेविलें ।।
आहेत सर्व आहेत । पाहतां जीव जीवांत ।। ये अतां ।।
श्रीहरी! तूंच कैवारी । ये पदोपदीं संसारीं ।। अनुभवा" ।।
यापरी मनाशीं वदल्या । बडवून उर, आरडल्या ।। त्या बळें ।।
तो दिवा रात्रभर होता । क्षणिं विझे, त्यांतलें सरतां ।। तेल तें ।।
चालतांच अंधारांत । सडकून कपाळा भिंत ।। लागली ।।
आदळल्या खांबावरतीं । मारितां हाक दुर्गा ती ।। ना उठे ।।

कोनाडा तों सांपडला । बोलल्या "श्री हरी मजला ॥ पावला "
पेटीस्तव कोनाड्यांत । आनंदें त्यांनीं हात ॥ घातला ॥
तों काळा विंचू डसला । दुर्दैव! दंश नाकाला ॥ करि पुन्हां ॥
हें असें कसें हो! घडलें? । समजेना! पण तें झालें ॥ हें खरें ॥
आलेलें पडसें आधीं । उत्पन्न त्यामधें व्याधी ॥ नविन ही ॥
ये सूज नाक गळुं लागे । करणार काय? जरि रागें ॥ खवळल्या ॥
धैर्यानें त्याही स्थितिंत । त्या होत्या अंधारांत ॥ चालत ॥
आपटल्या फरशीवरतीं । काकूंची पुरती फजिती ॥ जाहली ॥
आल्या मग माजघरांत । "दुर्गाई" ती वाटेंत ॥ लागली ॥
त्यावेळीं अंधारांत । काकुंनीं तिला शिस्तींत ॥ तुडविली ॥
रागाचा वचपा सगळा । काढाया नाहीं केला ॥ आळस ॥
ती रडत रडत ओरडली । काकूंनीं मग किंकाळी ॥ फोडिली ॥
अंगणांत माधव भ्याला । मनिं म्हणे "कुणितरी घाला—॥ घातला "।
बोलल्या काकु जोरांत । "किति दुर्गे! निर्दय चित्त ॥ हें तुझें ॥
माधवा! आधि ये आंत । दाखीव दिवा रे! त्वरित ॥ भिउं नको ॥
"पण आई....!" "रे! चांडाळा!। वदु नको अशा वेळेला ॥ ये पुढें !!
माधव तो आला आंत । सर्वांच्या ये लक्षांत ॥ स्थिति खरी ॥
उतरिला विंचू तत्काळ । "विष-हारी" मधुनें तेल ॥ चोळिलें ॥
"या एका पेटीस्तव कीं । माझी ही फजिती इतकी ॥ नवल कीं ॥
मी उश्याशीच ठेवीन "। काकुंनीं असें बोलून ॥ दाविलें ॥
"चोर ये पायथ्यापाशीं । दाद ना तुम्हां कोणाशीं " ॥ मधु म्हणे ॥
"हो! खरेंच चल बाहेर । कुणि बरें? उघडिलें दार ॥ नाकळे " ॥
"हा इतका दंगा झाला । पण नसे दाद वैनीला ॥ आमुच्या " ॥
"ती तशीच आहे दुर्गे! । तिज उगीच नाहीं रागें ॥ वदत मी " ॥
"हें काय? कुणिकडे गेली । वैनीची दिसते खोली ॥ मोकळी " ॥

"आहेच तशी ही पोर । येउंदे अतां; घेणार ॥ ना घरीं ॥
वाकडें हिचें पाऊल । झाली गे! बालंबाल ॥ खातरी" ॥
"पटलेंना ? आतां! तुजला । वाटलें न त्या वेळेला ॥ तुज खरें" ॥
"ही सून असे शिकलेली । म्हणतात हिला तर सगळी ॥ चांगली ॥
या, पहा म्हणावें आतां । निष्कारण दूषण देता ॥ सासुला" ॥
"हें पहा? पत्र सांपडलें । आई! गे आहे लिहिलें ॥ वैनिनें" ॥
"वाच वाच ऐकूंतरि तें । काय काय! कोणा लिहितें ॥ समजुदे" ॥

## ( लीलेचें पत्र )

**श्रीकृष्णप्रसन्न !**

"यापुढें या घरांत या असल्या सासुरवासांत राहणें अगदीं अशक्य झालें. प्रकृतीनें व मनानें मी अत्यंत अत्यवस्थ असतां रात्रीं आपलें सर्व बोलणें (कारस्थान) ऐकिलें. कांहीं सुचेना "काय करूं व काय न करूं" असें झालें. भडकलेल्या डोक्यांतून एकाच विचारानें एकदम उचल खाल्ली. त्यासरशीं मी घराबाहेर पडलें. जगाचा व माझा संबंध तुटला, माझें दर्शन—या मृत देहाचें—आपणांस न होवो. यापुढें तरी "सासुरवास"—नव्या सुनेस करूं नका! माझ्या "आत्माहुतीनें" जुलमी सासवांचे डोळे उघडतील काय ? मी करितें हें "चांगलें कीं वाईट" त्या न्यायी परमेश्वरासच माहिती."

ता० कः—घरोघरीं 'लीलेचा संसार' हा विचाराचा विषय होऊन बसणार आहे. अधिक लिहवत नाहीं. अंतःकरणांतून उमाळा आला म्हणूनच हें पत्र लिहिलें...... !

—अखंड सौ० लीला.

"माधवा ! ऐक, रे ! ऐक । कशि आहे मजला धाक ॥ घालते ॥
ही आहे फार लबाड । पत्र तें अगोदर फाड ॥ जाळही ॥
ही खोटें नाटें लिहिते । निष्कारण मजला देते ॥ दूषण ॥
सुविचारी तूं आहेस । सांगरे! मजकडे दोष ॥ कोणता ॥
मी कशी हिला मारीन! । कितिदा तरि सांभाळून ॥ घेतलें ॥
अपवाद मला येणार । लोकांस खरें कळणार? ॥ तें कधीं" ॥

" पण कुठें असावी मेली । घर सोडुन केव्हां गेली ॥ नाकळे " ॥
" तें उजाडतां समजेल । गांवांत सर्व होईल ॥ गलबला ॥
विठ्ठला! सर्व साक्षी तूं । मी कशास आणूं किन्तू ॥ अंतरीं ॥
तुज अनंत असती डोळे । मी म्हणतें तूं हें केलें ॥ योग्यसें ॥
पंढरीस भावें जातें । " पंचामृत—पूजा " करितें ॥ मी तुझी ॥
नाहींच तुला खपणार । या घरांतला आचार ॥ हा हिचा ॥
जाहलें परस्पर काम । घेईन सुखानें नाम ॥ मी अतां ॥
कमलाकर आल्यावरती । सांगेनच मी किति होती ॥ नीच ही ॥
या येत्या वैशाखांत । कां? वेळ! करूं थाटांत ॥ लग्न तें ॥
बघुं नका निघा बाहेर । हें उजाडलें ध्या दार ॥ लावुनी ॥
रडुं नका दुःखही मजला । यावा न दोष आम्हांला ॥ यास्तव ॥
कुणि विचारिलें लोकांनीं । बोलणें नीट ऐकोनी ॥ सांगुया—॥
" घेउनी । पहाटे धुणीं । धुवाया झणी । कुठेंशी गेली "॥
योजूंया युक्ती पुढली ॥ बुद्धिनें " ॥

---

# प्रकरण आठरावें.

## " सत्यमेव जयते "

सत्यास नको आधार ।
तें स्वयेंच घे अवतार ॥ या जगीं ॥
काकूनीं युक्ती केली ।
पण खरी जनांना कळली ॥ माहिती ॥
वाटून दुःख अत्यंत ।
लागलीं वदूं गांवांत ॥ माणसें— ॥

" मारिली । सून कोंवळी ।
काय मिळविली । धन्यता मोठी ॥
उघडणार केव्हां दृष्टी ॥ सासवा " ॥

\+ + + +


भालचंद्र कविरायानें ।
उद्गारहि संतापानें ॥ काढले– ॥
" हा असला सासुरवास ।
आणिलच पशुवृत्तीस ॥ लाज कीं ॥
' स्त्री-हृदय ' म्हणावें कैसें ।
मरणाचे लपले फांसे ॥ ज्यांमधें ॥
स्त्री-हृदय, सुखाचा ठेवा ।
पण त्यांतच केव्हां जळवा ॥ निपजती ॥
लीलेचा सासुरवास ।
देइल का ? स्त्रीहृदयास ॥ जागृती ॥
अनुरती । मुलीवर अती ।
तशी नित्य ती । सुनेवर राहे ॥
यावेत सुखाचे दिन हे ॥ यापुढें " ॥

× × ×

दात्यांच्या कमलाताई ।
शिखऱ्यांच्या विमलाबाई ॥ बोलल्या– ॥
" अलिकडल्या या काळांत ।
रानटीपणा लोकींत ॥ अजुनही ॥
ना माय, बाप पोरीला ।
फावलें अधिक सासूला ॥ त्यामुळें ॥
किति दुष्ट म्हाळसाबाई ! ।

कालिमा अम्हांला बाई ॥ आणिला ॥
करणारि सुनेला जाच ।
गांवांत आमुच्या हीच ॥ जन्मली ॥
ती दुर्गा चांडाळीण ।
दोघींचें कारस्थान ॥ चालतें ॥
मैत्रीण जया ती त्यांची ।
येईल वेळ सत्याची ॥ कधितरी ॥
सत्वरी । जाउनी घरीं— ।
तिच्या, कुणितरी । पुसावें तिजला ॥
" मारिलीस कां ! लीलेला ॥ निर्दये ! " ॥

मा
र्गा
ती
ल
विश्रांती !



## दृश्य दुसरें.

# " लीलेचा संसार "

## प्रकरण पहिलें.

### " पुण्याहून प्रयाण "

नुकताच जेउनी बसला । कमलाकर कॉलेजाला ॥ जावया ॥
मारून हाक मोठ्यानें । अर्जंट तार दूतानें ॥ तों दिली ॥

" Start soon, Lila died. "

टपटपा आंसवें गळलीं । स्वर्गस्थ लाडकी झाली ॥ समजतां ॥
" कालच मज पडलें स्वप्न । लीला मी नावेमधुन ॥ हिंडलों ॥
नावच तों उपडी झाली । धाडसेंच मी त्यावेळीं ॥ सत्वरें–॥
पाठीवर घेउन सखिला । मी सुखें पैलतीराला ॥ चाललों ॥
पाण्याचा लोंढा आला । लाडकी तोंच धारेला ॥ लागली ॥
त्यावेळीं कितितरि भ्यालों । आरडलों, जागा झालों ॥ तोंच मी ॥
या माझ्या दृष्टीपुढुनी । हालेना भेसुर अजुनी ॥ चित्र तें ॥
मी सकाळपासुन होतों–। काळजींत, हातीं ये, तों ॥ तार ही ॥
अलिकडे दोन महिन्यांत । मी विशेष अभ्यासांत ॥ गुंतलों ॥
त्यामुळें वेळ ना झाला । लाडकीस धाडायाला ॥ पत्रही ॥
धाडिलें पत्र मी नाहीं । पण तिचें न आलें कांहीं ॥ कां बरें ! ॥

काधिं झालें प्राणोत्क्रमण । समजावें तारेवरुन ॥ या कसें ॥
झालें तरि होते काय । न कुणी मज आधीं हाय ! ॥ कळविलें ॥
अंतरलें " लॉ कॉलेज " । स्टडि कुठला ना स्थिर आज ॥ चित्त हें॥
होईल परिक्षा पास । जाइन तिज भेटायास ॥ उत्सुकें ॥
आशा या हृदयामधल्या । हृदयांतच कीं मावळल्या ॥ हाय ! रे !॥
आतां न टर्म भरणार । हा माझा सुख–संसार ॥ संपला ! ॥
निशिदिनीं । बेत योजुनी । गुंगतों क्षणीं । अम्ही कार्यांत ॥
असतोच ईश--संकेत ॥ वेगळा " ॥
" जाईन, कधी मी गांवा " । ही हुरहुर त्याच्या जीवा ॥ लागली ॥
सांपडलीं पत्रें सगळीं । प्रिय–सखीकडुन आलेलीं ॥ तीं तया ॥
" केलास घात भावाचा । कल्याणा ! किति हृदयाचा ॥ नीच तूं॥
हंसु नको काय केलेंस । खावया शेण शिकलास ॥ हें कधीं ॥
चोरिलींस पत्रें कांरे ? । चल गृहीं तुझें मी सारें ॥ सांगतों " ॥
यापरी । वदुन सत्वरी । जावया घरीं । पुणें सोडून ॥
बंधुला सर्व घेऊन ॥ तो निघे ॥

---

# प्रकरण दुसरें.

## " उद्वेगाचे उद्गार "

रात्रिच्या मेलनें आला । कमलाकर तो गांवाला ॥ आपुल्या ॥
खोलींत मांडिला पाट । वाढिलें फराळा ताट ॥ ताइनें ॥
करि आग्रह मोठा आई । प्रेमानें वसली ताई ॥ संनिध ॥
रागानें झिडकारूनी । वाढलें ताट सारूनी ॥ दूर तें ॥
संताप–भरें त्यावेळां । कमलाकर बोलायाला ॥ लागला ॥

" होतों मी ऐकत, आंत–। लग्नाचा होता बेत ॥ करित तो ॥
दिवसही न पुरते झाले । या स्थितिंत विचारहि सुचले ॥ हे कसे ॥
झाल्यावर दिन ते चार । करविलीत मग ती तार ॥ किति तुम्ही ॥
ही भूतदया कीं असुंया । आंतव्यांतली कीं माया ॥ बोलते ॥
नउं दिवस दिवाळी उरली। काळजी तुम्हांला पडली॥ म्हणुन कां॥
थाटांत करा थाटांत । सौख्यांत न तुमच्या येत– ॥ आड, मी ॥
जन करिती ' छीः थूः,' गांवीं । तरि तुमच्या नाहीं गांवीं ॥ काय हें॥
कधि बिऱ्हाड एखादेही । वा ब्राम्हण पूजेलाही ॥ ना टिके ॥
गृहिं गाय, म्हैस असुनीही । दुभतें न खाववत कांहीं ॥ तें तुम्हां॥
व्यापार त्यांतही करिता । दूध, ताक, लोणी विकिता ॥ काय हें ॥
जरि देव दर्शना गेला । घरचाच विषय वाटेला ॥ बोलता ॥
त्या प्रदक्षणा घालाव्या । गृहकथा तिथें बोलाव्या ॥ सारख्या ॥
क्रम नित्याचा हा तुमचा । धाकही न त्या देवाचा ॥ राहिला ॥
ही तुमची असली करणी । बाबांनीं वाडी म्हणुनी ॥ गांठली ॥
गृहिं असते ते त्या वेळीं । तर नसती इतकी आली ॥ दुःस्थिती ॥
बंधनें तुम्हां नाहींत । हा धीटपणा अंगांत ॥ त्यामुळें ॥
मैत्रीण जया ती तुमची । तिज तरी उभ्या गांवाची ॥ माहिती ॥
मंत्र, तंत्र करुनी नाना । क्षणिं तिनें रंगुनानांना ॥ भुलविलें ॥
' राजश्री ' रंगोपंत । " स्वस्ति श्री " होय गृहांत ॥ ती जया ॥
सौन्दर्योपासक ( ? ) पंत । सुकुमार (?) जया अत्यंत–॥ देखणी (!)॥
जोडीपण आहे जोडी । उभयतां लागली गोडी (!) ॥ तें असोः–॥
बायका तुम्ही नांवानें । नीचांतिल नीचच कृतिनें ॥ परि अहां ॥
ती छचोर ठाउक असतां । कां, तिला घेउनी जाता ॥ मंदिरीं ॥
केलेंस काय हें आई ! । अविचारें, तूंही ताई ! ॥ मत्सरें ॥
सांगता कशाला गोष्टी । तिळभरी न तुमच्या ओठीं ॥ सत्यता ॥

स्टेशनवर त्या शिखऱ्यांनीं । सांगितलें सारे म्हणुनी ॥ समजलें ॥
अचुक गांठ त्यांची पडली । देवानें त्यांना केली ॥ प्रेरणा ॥
मारला विळा आईनें । लीलेच्या शिरिं जोरानें, ॥ तूं तदा–॥
होतीस मौज पाहात । दुर्गे ! तव किति हें चित्त ॥ निष्ठुर ॥
जन आले आळीमधले । त्यांनींच तिला सोडविलें ॥ शेवटीं ॥
बोलता आंव आणून । मी कांहीं नाहीं नविन ॥ समजला ! ॥
परभारी निकुनी पेवे । पंढरीस जाता भावें ॥ कार्तिकीं ॥ "
" कधिं बरें ! । असें काय रे ! । चित्त हें झुरें । तिच्या दुःखानें ॥
पाहिन कां ? मी डोळ्यानें ॥ तिज पुन्हां ॥
वदु नये ! असें टाकून । देवासम वाडिलां मान ॥ समज हें " ॥
" तूं देवरूप जाणून । शतधा मी वंदन करिन ॥ भक्तिनें ॥
जाणतेपणीं पण घोर– । केलेंस कृत्य, धिःकार ॥ करिन मी ॥
इतकेंच नव्हें तर आई ! । शिवणार न दोघींनाही ॥ यापुढें ॥
दुर्गे ! हो ! आधीं दूर । दोघांचा त्वां संसार ॥ बुडविला ॥
विष लाडवांत घालून । मारलेंस कीं यजमान ॥ निर्दये ! ॥
तूं अनाथ हें जाणून ॥ बाबांनीं संभाळून ॥ घेतलें ॥
त्याचें हे प्रत्युपकार । धिःकार असो धिःकार ॥ जीवितां ॥
नक्राश्रू जे गळतील । घे रुमाल त्यांवर ढाळ ॥ शिस्तिनें ॥
त्या वैधव्याच्या काळीं । नसतिल कीं इतकीं गळलीं ॥ आंसवें ॥
ती बाळबोध वळणाची । मंडळी तुझ्या सासरची ॥ चांगली ॥
कर्तव्य दक्ष संसारीं । सासू तव अति सुविचारी ॥ असुनही ॥
सासूचा सासुरवास– । केलास, सासु झालीस ॥ तूंच कीं ॥
विणण्यांत आणि नटण्यांत । कामास तुझा ना हात ॥ लागला ॥
लक्ष कीं तुझें बाहेर । संसार कसा होणार ॥ नेटका ॥
रीत भात कशि कळणार ! । दिसुन ये तुझी व्यवहार –॥ शुन्यता ॥

४५२६


तव सासू प्रेमळ, शांत । अन्याय तिनें पोटांत ॥ घातले ॥
मी म्हणतों कीं ती चुकली । तुज हवेंच होतें वेळीं ॥ शासन ॥
या तुझ्यासारख्या स्त्रीला । दाविणें दया न्यायाला ॥ घातक ॥
योग्य न्याय समयीं करणें । ही शुद्ध दया दाखविणें ॥ म्हणिन मी ॥
हें तुझें पुस्तकी ज्ञान । यापुढती गुंडाळून ॥ ठेव तूं ॥
किति थरथेर करणार । कधि तुला अतां कळणार ॥ हित तुझें ॥
अन्याय ! । नव्हे हा काय ? । तुझे हे पाय । स्वैर असुनीही ॥
पायबंद कोणी नाहीं ॥ घातले ॥
कल्याण नांव किति मोठें । या चोराचें हें खोटें ॥ लक्षण ॥
फोडलीस पत्रें सगळीं । तीं तिचीं तिथें आलेलीं ॥ कां बरें ! ॥
खिडकींत तुझ्या सांपडलीं । आणलीं पहा ! हीं सगळीं ॥ मी इथें ॥
त्या पुण्यांमधें राहून । फळ हेंच कायरे ! शिकुन ॥ वात्रटा ! ॥
बन्ड गार्डन् पाहायाला । गेलास कितिकदा शाळा ॥ चुकवुनी ॥
चोरुन तूं असतां खात । कितिदां 'रेमार्केटांत' ॥ पकडिलें ॥
किति "हुर्यो हुर्यो" केले । पोरांनीं कानहि धरिले ॥ लाज ना ॥
तुज पुण्यामधें मी नेला । अपराधच मोठा केला ॥ वाटते ॥
तोच हा पहा ! माधव, रे ! । या म्हारवड्यांतहि धीरें ॥ राहिला ॥
अभ्यास करी नेटानें । स्कॉलरशिप् परवां त्यानें ॥ मिळविली ॥
कौतुक मज वाटे कीं हें । माधव हा 'स्कॉलर' आहे ॥ सानसा ॥
तूं पहा ! कसा विद्यार्थी । नापास चारदां चौथी ॥ इंग्रजी ॥
केलेंस । बरें केलेंस । कळे आहेस । शाहणा फार ॥
बसुनको इथें बाहेर ॥ जा कसा ॥
आई ! तूं थोरच थोर । तुजपुढें काय करणार ॥ बाळ हा ॥
पण सत्याच्या अभिमानें । सांगतों तुला विनयानें ॥ एकदां ॥
लग्नाचें पुनरपि नांव । काढूंच नको हा जीव ॥ जोंवरी ॥

हा 'लीलेचा संसार' । ना सुखाआड येणार ॥ कधि तुझ्या ॥
" हा लीलेचा संसार । संपला ! ! !" इथें उद्गार–॥ चिन्ह हें ॥
" अंतरीं । म्हणा हरि हरीं । तोच कीं करी । पाप–परिहार " ॥
हा 'लीलेचा संसार' म्हणतसे ॥

---

# प्रकरण तिसरें.

## विरह, उपरति, आणि समाधान !

"पाण्यांत उडी मारून । लीला जरि अंतर्धान ॥ पावली ॥
स्मृतिरूपानें ती अजुनी । अमुच्या या अंतःकरणीं ॥ राहिली "॥
बोलून असें गहिंवरुनी । सांगितलें शेजाऱ्यांनीं॥ स्थान जें ॥
तें तेव्हां पाहायाला । कमलाकर जाता झाला ॥ खिन्नसा ॥
घनदाट तरूंची छाया । विहिरीची झाकी काया ॥ नेहमीं ॥
केव्हांतरि दिवसामधुनी । यावें त्या रवि–किरणांनीं ॥ क्षण तिथें ॥
शेवाळ माजलें फार । पसरला घोर अंधार ॥ सारखा ॥
भीषणता जेथें नाचे । कोणास धैर्य जाण्याचें ॥ त्या स्थलीं ॥
पण वेड जया प्रेमाचें । भय जगांमधें कोणाचें ॥ त्या जिवा ।
प्रेमाचें हें सामर्थ्य । भव्यतेंतही सौन्दर्य ॥ दाखवी ॥
रसिकांना प्रेमस्थान । स्वर्गीय विलासाहून ॥ अधिक कीं ॥
प्रेमाच्या सौन्दर्यांत । एकरूप ज्यांचें चित्त ॥ जाहलें ॥
लाभास्तव ते प्रेमाच्या । घेतील करुन हृदयाच्या ॥ चिंधड्या ॥
ही शक्ति अशी प्रेमांत । हृदयाची गुंतागुंत ॥ करितसे ॥
विहिरीच्या कांठीं बसला । कमलाकर शोकें झाला ॥ व्याकुळ ॥
खिन्नता भरे हृदयांत । भीषणता त्या जागेंत ॥ चहुंकडे ॥

" शेवटचें दर्शन तेंही । सरले ! तव नाहीं ! नाहीं ! ॥ जाहलें ॥
पहिल्याच भेटिच्या वेळीं । 'सरला' या नांवें केली॥ स्तुति तुझी ॥
सरले ! ते सुख–दिन सरले । दुःखाचे वणवे सगळे । पसरले ॥
गेलीस कशी स्वर्गांत । लोटून मला विरहांत ॥ प्रियतमे ! ॥
तव कोमल अंतःकरणीं । निष्ठुरता इतकी कुठुनी ॥ जन्मली ॥
हेंच काय समजायाचें । हृदय कीं असे ललनांचें ॥ निष्ठुर ॥
पण निष्ठुरता ती तसली । वांट्याला माझ्या आली ॥ कां बरें ? ॥
दर्शन तव आतां कुठलें । केलेंस काय ! हें सरले ! ॥ लाडके ! ॥
केलास कसा ? अविचार । होतीस सुशिक्षित चतुर ॥ जिवलगे ! ॥
वेळेवर पत्रें मजला । जर असतीं त्या वेळेला ॥ पोचलीं ॥
तुज पुण्यास नेलें असतें । तिळभरी कधीं मीं नसतें ॥ दुखविलें ॥
सौख्याची झाली सांज । जीवितांत आतां मौज ॥ कोठली ! ॥
सरले ! हे माझे सरले ! । हें धाडस तुजला झालें– ॥ तरि कसें ॥
हायरे ! याच पाण्यांत । सरलेची प्राण्यज्योत ॥ लोपली ॥
वृक्षांनो ! हे वेलींनो ! । हे प्रफुल्ल सुम–मित्रांनो ! ॥ झणि वदा ॥
पाहिलीत ज्या वेळेला । शकलां न कसें सरलेला ॥ आडवूं ॥
पुष्पांनो ! " अपुल्याहून– । ही सुंदर," हेवा धरून ॥ हा मनीं ॥–
वेलींनो ! " अपुल्याहून– । ही कोमल," हेवा धरून ॥ हा मनीं ॥–
वृक्षांनो ! " अपुल्याहून– । विनयशील," हेवा धरून हा मनीं ॥–
केलांत तिचा सर्वांनीं ॥ धिःकार निबिड या रानीं ॥ काय हो ! ॥
त्यावेळीं होती रजनी । हा तुम्हां तरी कां म्हणुनी ॥ दोष द्या ॥
राज्यांत तिच्या अंधार । असलेंच घडुन येणार ॥ उघड हें ॥
पुष्पांनो ! त्या वेळेला । कीं असाल झोंपी गेलां ॥ सर्वही ॥
वेलिंनो ! द्रुमा बिलगूनी । तें असाल स्वानंदूनी ॥ झोपलां ॥
मी कुणां । दोष देत ना । तिच्या दर्शना ॥ उतावीळ झालों ॥
घेउं का ? उडी, " मी आलों– ॥ प्रिय सखे ! " ॥

हे माझे पंचप्राण । सरलेसह पडले गळुन ।। या इथें ।।
प्रेमाचीं स्वप्नें सरलीं । आशेची होळी झाली ।। हायरे ! ।।
निःसार होय संसार । विरहाचा अग्नि प्रखर ।। पेटला ।।
तोडतो हळुंच हा काळ । गुंफिती सुखाची माळ ।। माणसें ।।
हा सौख्यसुधेचा पेला । रसिकें न पुरा ओठाला ।। लाविला ।।
तों वियोग–राक्षस येई । काढुन घे दावू पाही ।। विषमता ।।
घडपडे । चित्त बापुडें– । सुखास्तव, पडे– । दुःख, पदरांत ।।
अनुभव हा संसारांत ।। नेहमीं ।।
आत्म्याला कधिं ना नाश । जरि दृष्टिपुढुन गेलीस ।। सांप्रत ।।
गीतेंतिल स्मरतो श्लोक । अदृश्य स्वरूपें ऐक ।। लाडके ! ।।
" नैनं छिन्दन्ति शस्त्राणि । नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो । न शोषयति मारुतः " ।।
श्लोकांत किती गांभीर्य । भगवंतें किति तात्पर्य ।। गोविलें ।।
त्यामुळें येउनी धीर । रमणीय होय संसार ।। नश्वर ।।
धन्य धन्य गीता–वाणी । या पवित्र भारत–भुवनीं ।। जन्मली ।
आठवला दुसरा श्लोक । अदृश्य स्वरूपें ऐक ।। लाडके ! ।।
" जातस्यहि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि " ।।
या समाधान श्लोकांत । होतसें अहाहा !!! चित्त ।। सुस्थिर ।।
अर्जुनास नाना परिनीं । सांगितलें भगवंतांनीं ।। ज्ञान हें ।।
तूं भक्त । धन्य अत्यंत । जाहले प्राप्त । गुरु श्रीकृष्ण ।।
भाग्यवंत तुजसम कोण ? ।। अर्जुना ! ।।
गीता ही दुभती गाय । देतसे जगाला पेय ।। ज्ञान हें ।।
आधार अशा गीतेचा । आधार अशा ज्ञानाचा ।। लाभतां ।।
कां ? आम्हीं दुःखी व्हावें । कां ? प्राप्त स्थितिला द्यावें ।। दूषण ।।

उचित तें करावें कर्म । त्यांमधेंच आहे धर्म ॥ आपला ॥
प्राधान्य असे कर्माला । कर्मेंच सिद्धि जनकाला ॥ लाभली ॥
उपनिषदें मज आठवलीं । जीं पूर्वीं होतीं केलीं ॥ पाठ मीं ॥
" न कर्मणा न प्रजया धनेन, त्यागे नैकेऽअमृतत्व मानशुः " ॥
ही ऋचाच बोधक फार । घोकावी वारंवार ॥ वाटतें ॥
पाठांतर पूर्वीं केलें । स्वारस्य त्यांतलें कळलें ॥ आज हें ॥
त्यागानें आनंदानें । सुज्ञ ज्या कर्ममार्गानें ॥ चालले ॥
तोच मार्ग मी धरणार । आयुष्य सार्थ करणार ॥ आपुलें ॥
उद्धार करिन देशाचा । हातांत ग्रंथ गीतेचा ॥ घेउनी ॥
शांततायुक्त जें शुद्ध । ' सत्याग्रह ' रूपी युद्ध ॥ चाललें ॥
अत्यंत राहुनी शांत । घेईन भाग मी त्यांत ॥ भक्तिनें ॥
तो तिथें दिवाकर आहे । वर्तमानपत्रांतुन हें ॥ समजलें ॥
मुंबईस गेलों म्हणजे । सांगेन ! वृत्त मी माझें । सर्वही ॥
तो पवित्र आश्रम-वास । बरि असेल संचित-रेष ॥ तर मिळे ॥
' सामर्थ्य असे चळवाळिचें । पण अधिष्ठान देवाचें ॥ तें हवें ' ॥
देवा ! मी निर्भय व्हावें । देश-कार्य संपादावें ॥ भक्तिनें ॥
करि मना । अशी प्रेरणा । हीच याचना । समर्थाजवळ ॥
" देशकार्य " करितां सफल जन्म हा ॥
लीलेसम संसारांत । असतील सुना जाचांत ॥ ज्या कुणी ॥
मी दुःखें त्यांचीं सारीं । मांडीन राज-दरबारीं ॥ योग्य तीं ॥
मज कोण करी अवरोध ? । तुटलेत अतां अनुबंध ॥ सर्वही ॥
सोन्याची असली घटिका । लाभली व्यर्थ आतां कां ? ॥ घालवा ॥
असतां मी या कार्यांत । लीलेचा आत्मा शांत ॥ होइल ॥
लीलेवर मी लिहिणार- । स्फूर्ति-काव्य, जनिं करणार ॥ जागृती ॥
छापतां तया देणार । मी ' लीलेचा संसार ' ॥ नांव हें" ॥

तों जलीं । लाट उसळली । तिनें जणुं दिली ॥ अनुज्ञा अपुली ॥
कमलाकर अश्रू ढाळी ॥ त्या जलीं ॥
अश्रूंचे सर गळलेले । पाण्यावर कांहीं झाले ॥ बुडबुडे ॥
क्षण पाण्यावरती रमले । लीलेचे प्राणच आले ॥ ते जणूं ॥
जल शांत जरासें होतां । विरले ते बघतां बघतां ॥ त्या जलीं ॥
करि विचार सारासार । शोक तो तदा परिहार ॥ जाहला ॥
हृदयांत निराशा बसली । तों तेथें आशा आली ॥ धावुनी ॥
जणुं आशारूपच लीला । कार्यांत धीर देण्याला ॥ प्रगटली ॥
ये उमेद कर्तव्याची । खिन्नता सर्व हृदयाची ॥ लोपली ॥
उधळलीं फुलें वृक्षांनीं । "शुभ चिन्हच पुढचें" म्हणुनी ॥ भक्तिनें ॥
वाऱ्यानें शाखा हलल्या । टाळ्याच जणूं वाजविल्या ॥ पादपीं ॥
बहु मनीं । हर्ष पावुनी । सुखें वेचुनी । फुलें त्यावेळीं ॥
कमलाकर सायंकाळीं ॥ ये घरीं ॥

---

# प्रकरण चवथें.

## "अंधार" !!!

—:×o:×—

**सां**गे न हेतु कोणाला । तो पुढें निघे मुंबइला ॥ जावया ॥

*　　*　　*　　*

गुण गृहामधें उधळून । गांवांतुन तो कल्याण ॥ निसटला ॥

*　　*　　*　　*

चोरिली जयेनें लुगडीं । परगांविं कुणाचीं भांडीं ॥ चांदिचीं ॥
समजतां राजदूतांनीं । जेलांत चौकशी करुनी ॥ कोंडिली ॥

पापकर्म उदया आलें । दुर्गेला कांहीं झालें ॥ दिवसही ॥
आई तर वारंवार । करुं लागे गृहिं धिःकार ॥ त्यामुळें– ॥
तिज होय नको माहेर । आठवलें पंढरपूर– ॥ क्षेत्र तें ॥
रात्रींच बसे गाडींत । कृतकर्मं लपवावींत ॥ या मिषें ॥
पण असतां ती वाटेंत । लागलें दुखूं पोटांत ॥ सारखें ॥
गांठलें शेवटीं गांव । जाहला तिचा अति जीव ॥ घाबरा ॥
पापाचें डबकें कुजलें । जन्मतां मूल तें आलें ॥ आडवें ॥
" नाहींच तुम्ही मरणार " । डॉक्टर हा देतां धीर ॥ ती म्हणे ॥
"मरणाची माझी इच्छा । डॉक्टर ! मी करितें पृच्छा ॥ द्या पुडी ॥
दुर्दैवें जरि मी जगलें । शीलानें आहे मेलें ॥ डॉक्टर ! ॥
करतील लोक धिक्कार । बोलतील ' विधवा पोर-—। ही पहा ' ! ॥
कां ? आतां मागें बघतां । संग्रहीं विषारी असतां ॥ औषधें ॥
द्या असा विषाचा घोट । घेतांच धरावी वाट ॥ मृत्युची ॥
वेळींच होउंदे अंत । आहे ही वेळ निवांत ॥ रात्रिची ॥
विधवेच्या संसाराला– । या असल्या, आळा घाला ॥ याक्षणीं ॥"
" बाई ! व्हा थोड्या शांत । यावेळीं या तावांत ॥ वदुं नका ॥
या असल्या संसाराला । मी तयार घालायाला ॥ बंधनें ॥
बंधनें परी नीतीचीं । आकांक्षा त्या मरणाची ॥ कां धरा ॥
तुम्हि पुनर्विवाहा योग्य । या पापापेक्षां काय ! ॥ नीच तो ॥
हा समाजही शिकलेला । अनुकूल अशा कार्याला ॥ सक्रिय ॥
देतसे तुम्हाला धीर । निघण्यास सुखें बाहेर ॥ यांतुनी ॥
किति रहाल अंधारांत । त्या जना, मना, फसवीत ॥ घडिघडी ॥
वैधव्य–दशा ही असली । होय कीं रौरवामधली ॥ रौरव ॥
अति मनोवृत्ति या स्वैर । यांच्यावर जर अधिकार ॥ ठेवितां ॥
वेळेवर आला असता । तर रुकार मीही नसता ॥ हा दिला ॥

अति जपुन बालविधवेला । जीवित हें कंठायाला ॥ लागतें ॥
अपवाद तुम्ही झालांत । हा प्रसंग आहे देत ॥ साक्ष कीं ॥
दुर्दैवें केला घात । राहणार वैधव्यांत ॥ म्हणुन कां ! ” ॥
“ दोष न त्या दुर्दैवाला । मी होउन माझा केला ॥ घात हा
सहवासें माझ्या कधिंही । प्रियकरा प्रेमसुख नाहीं ॥ लाभलें ॥
निष्कारण रुसलें, फुगलें, । मोकळ्या मनानें वदलें ॥ ना कधीं ॥
अल्पशा पुस्तकी ज्ञानें । वागलें अहंकारानें ॥ सासरीं ॥
शिकवण ना मज आईची । कोमलता स्त्री–हृदयाची ॥ कोठली ।
माताच हवी सुविचारी । मुलिस ती वळण माहेरीं ॥ लाविते ॥
तारुण्य त्यांत सौन्दर्य । आणखी स्वैरस्वातंत्र्य ॥ लाभतां ॥
मग बिघडायाला शील । लागणार कितिसा वेळ ॥ डॉक्टर ! ॥
वागलें हाय ! अविचारें । जन्माचें या मातेरें ॥ जाहलें ॥
हा प्रसंग मजवर आला । आहे मी या सर्वाला ॥ कारण ” ॥
“ हें काय ? अरेरे ! ! ! झालें । झालें तें होउन गेलें ॥ शांत व्हा ॥
यांतुनी चांगल्या व्हाल । विश्रांती कांहीं काळ ॥ घ्या इथें ॥
उपचार योग्य केलेत । वेळेवर हो ! आलांत ॥ या स्थलीं ॥
निर्भयें रहा या ठायीं । हें ‘ विठ्ठल विठ्ठल ’ हृदयीं ॥ नाम घ्या ”
“ हें सुदैव ! कीं दुर्दैव ! । समजूंतरि यांतिल भाव ॥ कोणता ॥
पातकेंच माझीं घोर । देवालातरि येणार ॥ कशि दया ॥
तारिल का ? मजला देव । येइल का ? माझी कींव ॥ डॉक्टर ! ”
“ शंका न धरा तिळमात्र । सद्भावें ‘ विठ्ठल–मंत्र ’ ॥ हा जपा ॥
नामानें शांती मिळते । चित्ताची सत्वर होते ॥ शुद्धता ॥
अधिकार असा नामाचा । कां ? विलंब नामीं वाचा ॥ रंगवा ” ॥
“ मीं केला होता बेत । घ्यावीच चंद्रभागेंत ॥ त्या उडी ॥
जणुं हात । तुम्ही धरिलांत । मला शकलांत । परतवूं वेळीं ॥
पालटली वृत्ती पहिली ॥ डॉक्टर ! ॥



कल्याण ! अरे कल्याण ! !
आलास कसा कोठून ? ॥ यास्थलीं ॥ पान ५९ वें.

का ! त्यागा अविचारानें । हें शरीर पुण्याईनें ।। लाभतें " ।।
" दुःखाच्या अतिरेकांत । धाडसें जीव देतात ।। बायका " ।।
" पण तुम्हासारखे थोर । वांचविती देउन धीर ।। संकटीं " ।।
" मम भगिनी झाली विधवा । लोटला न लग्ना नववा ।। दिवसही ।।
सर्पावर पडला पाय । क्षणिं होय दंश, पति हाय ! ।। वारले ।।
मी तिचें कुंकु वाढविलें । वाढविलें म्हणजे पुसलें ।। हें नव्हे ।।
अभिमानानें या रूढीच्या। केल्या न तिच्या भाग्याच्या ।। चिंधड्या ।।
बनवावी तशि ही बनते । रूढीचें अमुचें नाते ।। लांबचें ।।
ती पुनर्विवाहानें या । लागली सुखें नांदाया ।। पुनरपी ।।
तें असो, सर्व विसरूनी । शांत व्हा रहा क्षण पडुनी ।। या स्थलीं ।।
कंपौंडर येइल माझा । ऊन ऊन पाणी सांजा ।। घेउनी ।।
हळुहळूं । लागली पळूं । अम्हाला कळूं— । लागतां रूढी ।।
टिकणें न यापुढें प्रौढी ।। क्षण तिची ।।

---

# प्रकरण पांचवें.

## " अंधारांतील दोन प्रकाश-किरणें. "

" कल्याण ! अरे ! कल्याण !। आलास कसा कोठून ! ।। या स्थळीं ।।
ही विद्या कधि शिकलास । कंपौंडर कधि झालास ।। तूं इथें " ।।
" तूं इथें कशी आलीस । अचुक कीं एकमेकांस ।। भेटलों " ।।
" मी कशास सांगूं सारे— । तुज असेल तें परभारें ।। समजलें " ।।
" समजलें परी ती तूंच— । आहेस, मला आतांच ।। उमगलें " ।।
" कृतमर्मे माझीं घोर । भय मज तीं वारंवार ।। दाविती ।।
दिसतील वैनिला माझीं । मी करीत होतें जीं जीं ।। पातकें ।।

त्यासाठीं छळिलें तिजला । सांगितलें माहेराला ॥ जावया ॥
मी करवुनि सासुरवास । जाहलें तिच्या नाशास ॥ कारण ॥
शिकविलें बळें मी तुजला । वैनीचीं चोरायाला ॥ पाकिटें ॥
संसार तिचा जाळून । आलें मी चांडाळीण ॥ या इथें ॥
वाईट तिचें मी केलें । माझेंतरि कोठें झालें ॥ चांगलें ॥
रक्तानें जी भिजलेली । अन्नाविण तडफडलेली ॥ त्या तिची– ॥
किंकाळी येते कानीं । ऐकाया येथें अजुनी ॥ ती पहा! ॥
ती मेली नाहीं, नाहीं!! । या जितपणीं मेली ही ॥ अवदसा ॥
मोकळे । केस सोडिले । तिनें माखिलें ॥ कपाळीं कुंकू ॥
मारिते हाक मज ऐकू ॥ येतसे ॥
मजकडे बघे वाकूनी । वर पहा! पहा! "या, वैनी ! ॥ मज धरा "॥
" तूं भ्रमांत बडबडतेस । ताई! गे या वेळेस ॥ शांत हो! ॥
हें तुझें तुला मन खातें । गत मनुष्य फिरुनी दिसतें ॥ कां असें "॥
" पोटांत अरे? कालवतें । वैनीचें भेसुर दिसतें ॥ चित्र तें " ॥
" लागलीस बोलायाला । तो विषयच या वेळेला ॥ राहुंदे " ॥
" मी आतां सन्मार्गाला । लागणार, वैधव्याला ॥ त्रासलें ॥
ठरविलें ध्येय आहे मी । होणार तेंच परिणामीं ॥ सौख्यद " ॥
" म्हणजे? मी समजूं काय! । स्पष्ट सांग जें तूं ध्येय॥ आंखिलें " ॥
" झालें कां त्यांचें लग्न । कल्याणा! दिसतो तरुण ॥ डॉक्टर " ॥
" नुकतेंच लग्न कीं झालें । धंद्यास्तव येथें आले ॥ डॉक्टर ॥
पण विधिचा रोषच म्हणुन । ये विधुरावस्था कठिण ॥ या वयीं " ॥
" दिन कांहीं जाऊं देत । बरि होईन तोंपर्यंत ॥ नंतर-- ॥
मी त्यांच्या पाया पडुन । लग्नाचा काढुन प्रश्न ॥ म्हणेन की-- ॥
स्पर्शलांत ज्या हातानें । द्या हातीं पति--भावानें ॥ हात तो ॥
आपणां मनानें वरिलें । अर्धांगी आतां झालें ॥ यापुढें ॥

" या असश्या संसाराला । मी तयार घालायाला ॥ बंधनें ॥
बंधनें परी नीतीचीं । आकांक्षा त्या मरणाची ॥ कां धरा ॥
तुम्हि पुनर्विवाहा योग्य । या पापांपेक्षां काय? ॥ नीच तो ॥
हा समाजही शिकलेला । अनुकूल अशा कार्याला ॥ सक्रिय ॥
देतसे तुम्हांला धीर । निघण्यास सुखें बाहेर ॥ यांतुनी " ॥
हें तुम्हीच मागे वदला । तरि सार्थ करा वेळेला ॥ या अशा " ॥
" घेणार न ते माघार । ताई! तव हा निर्धार ॥ पाहतां ॥
प्रीतिचें । बोलणें रुचें । तिथें ना सुचे ॥ भेद हा 'तूं' 'मी' ॥

समताच तिच्या कीं धामीं ॥ नांदते ॥

सामाजिक प्रश्ना जोर । निःसंशय ते देणार ॥ तें असोः— ।
मी घरांत चोरी केली । क्षणिं पंढरपुरची धरिली ॥ वाट, या ॥
घेऊन इथें मोटार । मी स्वताः ड्रायव्हर स्वैर ॥ जाहलों ॥
साधलें काम तात्पुरतें । पूर्वी मज थोडें होतें ॥ येतहीं ॥
स्वर्ग दोन बोटें उरला । ठेंगणेंच जग त्या वेळां ॥ वाटलें ॥
अधिकारी केले खूष । कोणाचा नाहीं रोष ॥ राहिला ॥
मी मना म्हणे बघ आतां । किति तुझी असे रे ! सत्ता ॥या इथें ॥
मी तदा हंसत तोऱ्यांत । इतरांस तुच्छ मार्गांत ॥ लेखिलें ॥
मित्रांनीं आपणहून । ठेविलें " भाइकल्याण " ॥ नांव हें ॥
मी फुगलों त्यावेळेला । करुं भलत्या सलत्या लीला ॥ लागलों ॥
गुण नसतां केवळ मान । पैशानें ये चालून ॥ जो घरा ॥
तो कसा टिकावा ताई ! । फजितीच अशानें होई ॥ शेवटीं ॥
मी चढेल बनलों मानी । अभिमान असा अस्थानीं ॥ योग्य ना ॥
भेटली । नीच मंडळी । दिशा लागली । निराळी मजला ॥

आमंत्रण दुर्दैवाला ॥ मी दिलें ॥

जाहलों बाटली भक्त— । प्रख्यात, त्याच धुंदींत ॥ एकदां ॥

मोटार अती वेगांत । अविचारें भर रस्त्यांत ॥ सोडिली ॥
टांग्यावर तों आदळली । बाहेर माणसें पडलीं ॥ आंतलीं ॥
आघात घोर होऊन । पडलों मी गोळा प्राण ॥ जाहले ॥
संकटीं मला वांचविलें । देवा सम साह्या आले ॥ डॉक्टर ॥
मी त्यांच्या उपचारांनीं । उठलों त्या दुखण्यांमधुनी ॥ सत्वर ॥
मी भलत्या नादें आलों । श्रीहरिची नाहीं चढलों ॥ पायरी ॥
अल्पशी पूर्व पुण्याई । साह्याला आली, आई ॥ जशि मुलां ॥
पालटली माझी वृत्ती । देवावर बसली भक्ती ॥ किति तरी ॥
हें तुजला सांगायाला । आनंदच या वेळेला ॥ वाटतो ॥
ते खरे सुधारक असुनी । आहेतच भाविक, भजनी ॥ डॉक्टर ॥
बोललों शरण जाऊन । " सोडणार नाहीं चरण ॥ आपुले ॥
आधार मला द्या तुमचा । हा धंदा मोटारीचा ॥ सोडिला " ॥
ओळखून माझा भाव । त्यांनींच दिला मज ठाव ॥ या घरीं ॥
कंपौडर सध्यां केला । तरि हवें शिकाया मजला ॥ पुष्कळ ॥
सांगितलें मजला त्यांनीं । ऊन ऊन सांजा पाणी ॥ द्यावया ॥
आज्ञेसम आलों ताई ! । पथ्याचें आतां घेई ॥ ऊठ ! गे ॥
ही असेल माझी भगिनी । त्यांना तरि ती कोठोनी ॥ कल्पना ॥
मजलातरि आतां कळलें । तें असो, विस्मरूं सगळें ॥ मागचें ॥
तूं ठेव मनाला शांत । येतील अतां इतक्यांत ॥ डॉक्टर ॥
दुःखांतुन तावुन निघतीं । माणसें शाहणीं होतीं ॥ तीं पुढें ॥
दुर्दैवा दोष न द्यावा । महिमाच तयाचा गावा ॥ नेहमीं ॥
हे प्रसंग आले म्हणुनी । आपणांस आल्या कळुनी ॥ त्या चुका ॥
मार्ग हे नवे सांपडले । दुःखांनीं जागे केले ॥ आपणां ॥
कुणि कांहींही म्हणुदेत । कर्तव्य करूं लोकांत ॥ उचित तें ॥
तो ध्वांत । जरी व्योमांत । तारका त्यांत । उदित होतात ॥
कां करा? निराशें चित्त ॥ खिन्न हें " ॥

# प्रकरण सहावें.

## " विघ्नांतील विघ्न. "

" आंचवली संसाराला । त्या सासुरवासें लीला ॥ बापुडी " ॥
" कमलाकर त्यागी बनला । घर--दार सोडुनी गेला ॥ सर्वही " ॥
" गुण घरांमधें उधळून । क्षणिं गांवांतुन कल्याण ॥ निसटला " ॥
" दुर्गेला झाले दिवस । सोडिले तिनें गांवास ॥ शेवटीं " ॥
पंतांना हा वृत्तांत । साद्यंत सर्व वाडींत ॥ समजला ॥
होऊन मनीं उद्विग्न । बोलले " दिवस अति कठिण ॥ यापुढें " ॥
देव--धर्म पूजा यांत । दिन सुखें घालवूं पंत ॥ लागले ॥
तों आलें नविनच विघ्न । कर्माची गति अति गहन ॥ हें खरें ॥
स्नानास उतरले पंत । तों हाय? पाय कृष्णेंत ॥ घसरला ॥
साह्यास । कठिण समयास-- । कुणि न, धारेस । लागले पंत ॥
दृष्टि आड ते निमिषांत ॥ जाहले ॥

# प्रकरण सातवें.


## " पापाचें प्रायश्चीत्त ! "

दुर्दैव घोर कोसळलें । काकूंचे आतां फिरले ॥ सुदिन ते ॥
गांवांत होय धिःकार । जागा न तोंड बाहेर ॥ काढण्या ॥
ब्रह्मांड तदा आठवलें । दुःखांनीं जेव्हां भाले ॥ मारिले ॥
भरलें घर पाहुन ओकें । त्या उदास होउन शोकें ॥ बोलल्या ॥
" विठ्ठला ! काय केलेस । आणिलेस मजवर दिवस ॥ कठिण हे ॥

कमलाकर कोठें गेला । मुकलें मी सर्वस्वाला ॥ हाय रे ! ॥
तूं जये ! नीच अत्यंत । पाडिलेस मज पेचांत ॥ कितिकदा ॥
कल्याणा ! रे ! चांडाळा ! । जाणार अतां नर्काला ॥ कोणत्या ॥
परभारी पेवे विकुनी । जे होतें पैसे पुरुनी ॥ ठेविलें ॥
घातलास त्यांवर घाला । लाविलास रे ! नांवाला ॥ कालिमा ॥
केलास पुढें पोबारा । चोरा ! तुज आतां थारा ॥ ना कुठें ॥
बुडविलेस दुर्गे ! नांव । उलथलीस आणुन आव ॥ साध्विचा ॥
केलेंस पाप जें घोर । तें कोठें निस्तरणार ॥ अवदसे ! ॥
तूं मनीं । पुढिल जाणुनी । त्वरें येथुनी । पळुन गेलीस ॥
त्यांतल्या त्यांत केलेंस ॥ हें बरें ॥
तूं पोर कशी आहेस । हें कळूनही नादास ॥ लागलें ॥
तुज तरी दोष कां ! द्यावा । मी देतें या दुर्दैवा ॥ आपुल्या ॥
त्याला तरि तो कां ! म्हणुनी । घेतला बळें भाजूनी ॥ पाय मी ॥
देतें न दोष कोणाला । देतें मम अज्ञानाला ॥ योग्य हें ॥
देवाची करितें भक्ती । तिळमात्र न माझ्या चित्तीं ॥ शुद्धता ॥
खादाड अती मी क्रूर । बोलण्यांत वरुनी फार ॥ सात्विक ॥
रुपयाला पैसे तीन । घेऊनी गरिबांकडुन ॥ व्याज तें ॥
धन–संचय चोरुन केला । जो देवाला वा मजला ॥ माहिती ॥
तो आल्या मार्गे गेला । किति उपद्याप मी केला ॥ त्यास्तव ॥
ही उठाठेव करण्याला । त्या जया–देविनें मजला ॥ शिकविलें ॥
कारण मी या सर्वांस । कां ? पुनः पुन्हां इतरांस ॥ दोष द्या ॥
पंढरीस गेलें आलें । यात काय मोठें केलें ॥ पुण्य मी ॥
देव धर्म अल्पच करणें । माझें हें अति बडबडणें ॥ त्यांहुनी ॥
बोलणें वागणें भिन्न । वेगळेंच अंतःकरण ॥ त्यांहुनी ॥
नेहमींच माझें असलें । उघडील कशाला डोळे ॥ श्रीहरी ॥

जरि कितिही भजलें त्याला ।
तो असेल जाणुन मजला ॥ नेहमीं ॥
तो माझा साखर–भात ।
कधि नसेल उष्टावीत ॥ बघतही ॥
मी " विठ्ठल विठ्ठल " म्हणतां ।
रंगांत घरीं कधि असतां ॥ नाचत ॥
रंग ढंग पाहुन माझे ।
त्या असेल वाटत ओझें ॥ भक्तिचें ॥
दर्शनास मंदिरिं गेलें ।
तर असेल वाटत आलें ॥ संकट ॥
मी विनम्र पायीं होतां ।
भय असेल त्याचें चित्ता ॥ वाटत ॥
म्हणुन कीं काय ? ते आंत ।
बडवे ना राहूं देत ॥ क्षण उभे ॥
कांहीं तरि मी हें म्हणतें ।
वेगळें असें त्याचें तें ॥ कारण ॥
सारखे भक्त येतात ।
होते बहु गाभाऱ्यांत ॥ दाटण ॥
त्यामुळें । नियम घातले ।
काय बिघडलें । त्यांत कोणाचें ॥
पाळिनें घडे देवाचें दर्शन ॥
यापुढें भलें वागेन ।
सांगतें शपथ घेऊन ॥ विठ्ठला ! ॥
मी काय ? अरेरे ! ! ! केलें ।
लीलेच्या नाशा झालें ॥ कारण ॥

दे मला शाप तूं लीले ! ।
संसारीं विष कालविलें ॥ मी तुझ्या ॥
अमृत तें तरी मानून ।
गेलीस शील राखून ॥ या जगीं ॥
अमरता तुझ्या वाट्याला ।
या जितपणीं मज आला ॥ मृतपणा ॥
शाहणी । तुझ्यासम गुणी ।
सून, त्रिभुवनीं । पहा ! कोठेंही ॥
मिळणारच नाहीं नाहीं ॥ धुंडितां ". ॥



## दृश्य तिसरें.

# " लीलेचा संसार "

## प्रकरण पहिलें.

### चमत्कारिक पत्र.

शिक्षेची सरता सीमा । कमलाकर आला ग्रामा ॥ आपुल्या ॥
स्थिति गृहिची अवलोकून । तो बसे मनीं उद्विग्न ॥ होउनी ॥
लीलेवर लिहिल्या कविता । रमवूं त्या त्याच्या चित्ता ॥ लागल्या ॥
करि मोडाखोडी त्यांत । भाषेला उजळा देत ॥ स्फूर्तिचा ॥
" कमलाकर विष्णू नेने " । मारिली कुणी मोठ्यानें ॥ हाक तों ॥
उघडतां दार हातांत । तो देता झाला दूत ॥ पत्र तें ॥
" लीलेच्या त्या मामांनीं । धाडिलें किती दिवसांनीं ॥ पत्र हें ॥
म्हणतात " उद्यां येणार । जोडाया तो संसार ॥ आपुला ॥
सद्‌गुणी प्रौढ शिकलेली । मनिं भरेल दृष्टिस पडली ॥ ती जर ॥
समजाल असे प्रति लीला । लाखांत नांव घेण्याला ॥ योग्यशी ॥
डोलवाल प्रेमें मान । वाटेल जीव कीं प्राण ॥ आपणां ॥
ना विचार घेतां तुमचा । मी मुहूर्तही लग्नाचा ॥ ठरविला ॥
विश्वास वाटतो फार । निर्विघ्नपणें होणार ॥ लग्न हें ॥
केवळ जी दाखविणार । या जगांतला व्यवहार ॥ हेतु हा ॥
प्रेमानें सांभाळाल । मी करीन माझे बोल ॥ सत्य हे ॥

वळ माझ्या शब्दांतील । प्रत्यक्ष उद्यां समजेल ॥ आपणां ॥
वाचतां पत्र फाडाल । रागानें किंवा द्याल ॥ फेकुनी ॥
मी असे सर्व समजूनी । येईल उद्यां उमजोनी ॥ पण तुम्हां ॥
तोंवरी रहावें शांत । न पडे कधिं विधिघटनेंत ॥ अंतर " ॥
" किति विचार त्यांचे दुबळे । हें माझें ध्येय न कळलें ॥ वाटतें ॥
किति पत्र चमत्कारिक हें । लिहिण्याचें मोठें आहे ॥ धाडस ॥
लीलेविण मी स्त्रीजात । पाहतों मातृरूपांत ॥ नेहमीं ॥
अवकाश न आतां उरला । पत्राचें धाडायाला ॥ उत्तर ॥
राहुद्यां । उद्याचें उद्यां । वृथा कष्ट द्या ॥ कशाला जीवा ॥
सत्याची चिंता देवा ॥ नेहमीं " ॥

---

## प्रकरण दुसरें.

### विधि–घटना !

रविवारीं दुसऱ्या दिवशीं । मोटार उभी दाराशीं ॥ राहिली ॥
" गृह हेंच " असें जाणून । आंतून उतरलीं दोन ॥ माणसें ॥
कमलाकर आला दारीं । मामांची दिसली स्वारी ॥ तों उभी ॥
" पाहुणे दुजे हे कोण ? " । "सांगतों जरा येऊन ॥ आंत मी ॥
कमलाकर ! तुमची लीला । आहेच बेळगांवाला ॥ संप्रती ॥
जरि आली होती वेळ । तरि आला नव्हता काळ ॥ समजलां ! ॥
सांगतों आपणां सकल । आश्चर्य अती वाटेल ॥ ऐकितां ॥
घेतली उडी विहिरींत । पण पाणी नव्हतें तींत ॥ फारसें ॥
सरकारी वारंटाला । चुकवून तरुण कुणि आला ॥ त्या स्थळीं ॥
काढून रात्र या रानीं । जावेंच पुढें चकवोनी ॥ मनिं म्हणे ॥

आवाज होय विहरींत । तो बघे वाकुनी आंत ॥ ये तिथें ॥
"आपल्या जिवा त्रासून । या स्थळीं दिला हा प्राण ॥ कुणि वरें ?" ॥
बोलला असे तो वीर । त्यानेंच तिला बाहेर ॥ काढिली ॥
त्यालाही ओळख पटली । ओघानें कथितों सगळी ॥ माहिती ॥
बहु उपाय त्यानें केले । लीलेनें तेव्हां डोळे ॥ उघडिले ॥
देऊन धीर लीलेला । त्यानेंच बेळगांवाला ॥ आणिली ॥
ही, "विधि-घटना" हो ! समजा। कमलाकर ! आहे माझा ॥भरंवसा॥
वांचविले दुसरे प्राण । आपले प्राण घालून ॥ संकटीं ॥
तो पुरुष पहा, हा थोर । आपुला जयें संसार ॥ जोडिला ॥
'हे दुजे पाहुणे कोण !' । आहे कां आतां प्रश्न ॥ तो पुन्हां " ॥
"भेटुंदे । मला पाहुंदे । एकदां मुर्दे । थोर हा पुरुष " ॥
कमलाकर बोले हर्ष ॥ होउनी ॥

हे असे धैर्यधर नांव । कोल्हापूर यांचें गांव ॥ मूळचें ॥
अति घरची गरिबी म्हणुनी । आपुलें गांव सोडोनी ॥ निश्चयें ॥
आजोळ असे धोमाला । शिशुपणीं तिथें शिकण्याला ॥ राहिले ॥
लाडकें नांव "यशवंत" । नांवासम गुण आहेत ॥ उतरले ॥
कमलाकर! ऐका नवल । लीलेचे तुमच्या, बाल– ॥ मित्र, हे ॥
दोघांची एकच शाळा । लीला तर उठवायाला ॥ जायची ॥
दोघांस नाद बागेचा । हव्यास देवभक्तीचा ॥ नेहमीं ॥
इंग्रजी मराठी झालें । शिकण्यास पुण्याला गेले ॥ नंतर ॥
तेथुनही कलकत्त्याला । हे गेले भेटायाला ॥ मातुला ॥
प्रोफेसर मामा यांचे । वाटलें फार भाच्याचें ॥ कौतुक ॥
जातिची हुषारी बघुनी । आधार दिला मामांनीं ॥ चांगला ॥
'यशवंत खरे यशवंत' । बहु हुषार कॉलेजांत ॥ चमकले ॥
एल्. एल्. बी. होतां पास । चळवळींत कॉलेजांस ॥ सोडिलें ॥

होणार अतां म्हणतात । राष्ट्रीय–पाठशाळेंत ॥ शिक्षक ॥
देखणे सद्‌गुणी शांत । धाडसी रसिक आहेत ॥ चांगले ॥
मम कन्या द्यावी यांस । भामिनी योग्य वीरास ॥ कां कसे ?" ॥
"हें सार्थ धैर्यधर नांव । आकृतीच सद्‌गुण–भाव ॥ सांगते ॥
मामा ! या नरसिंहाला । शोभेल भामिनी–माला ॥ अर्पितां ॥
हा–योग । खरा संयोग । प्रीतिचें अंग । असे हो ! यांत" ॥
कमलाकर टाळी देत ॥ बोलला ॥
"सासरीं नांव हें लीला । माहेरीं म्हणती इजला ॥ 'यमु' असें ॥
मी अतां याच नांवानें । बोलणार हो ! ओघानें ॥ यापुढें ॥
पोंचवून यमुताईला । मी आलों या गांवाला ॥ नंतर ॥
भिक्षेचा धरिला वेष । आला न मुळीं कोणांस ॥ संशय ॥
वास्तवीक दुसरिच कोणी । पिडलेली व्रण रोगांनीं ॥ बालिका ॥
त्या ठायीं मेली होती । कळणार कसें ? ती नव्हती ॥ गांवची ॥
विहरींत निर्जनी रानीं । पाहिलें कुणी लेकानीं ? ॥ नीटसें ॥
पाटला समजलें कसलें ! । नासलें, फाटलें, फुगलें ॥ प्रेत तें ॥
नाहींशी झाली लीला । हें सायंकाळीं सकलां ॥ समजलें ॥
पाटिल ते पाटिलबोवा । 'डाव हा अतां साधावा' ॥ बोलले ॥
'सासुनें मारिली सून' । क्षणिं त्यानीं कारस्थान ॥ जुळविलें ॥
लीलेचा सासुरवास । माहिती उभ्या गांवास ॥ त्यामुळें ॥
लीलाच असावी मेली । सहजीच जनांनीं केली ॥ कल्पना ॥
या अपुल्या मातोश्रींनीं । पाटला लांच देवोनी ॥ वळविलें ॥
तोंडाला सुटलें पाणी । वाटेंतच पाटिल-वाणी ॥ थबकली ॥
मातोश्री पडल्या पार । धास्तीही झाली दूर ॥ शिस्तिनें ॥
हें असलें पोलिसखाते । जो जिवंत त्याचे करितें ॥ दिवसही ॥
हा चमत्कार पाहून । आलों मी तें निरखून ॥ सर्वही ॥

अनुभवें ठसे चित्तांत । सहसा न पंचनाम्यांत ॥ सत्यता ॥
माउली । अशी आपुली । लाज आणिली । उभ्या गांवाला ॥
सोशिक बहु तुमची लीला ॥ धन्य हो ! " ॥
" काय काय नंतर झालें । यशवंत ! करावें सगळें ॥ कथन तें " ॥
" मामांना भेटायाला । परतलों बेळगांवाला ॥ मी पुन्हां ॥
त्यानंतर मातोश्रींनीं । आपणां तार करनूनी ॥ कळविलें ॥
सांगतील पुढचें मामा । आनंदा नाहीं सीमा ॥ राहिली " ॥
" मुंबईस आपण गेला । राजकारणीं सांपडला ॥ वाचिलें ॥
आपणही त्या परगांवा । इतक्यांत कशाला कळवा ॥ ठरविलें ॥
या यशवंतांचे स्नेही । मुंबईंत होते तेही ॥ समजलें ॥
आपणाविशीं परभोर । कळविलें तयांनीं सारें ॥ युक्तिनें ॥
" ते कोण ? " पुढे समजेल । ओघात सर्व येईल ॥ बोलणें ॥
तें असो, लक्ष देऊनी । वर्तमानपत्रांमधुनी ॥ वाचिलें ॥
आपणांस शिक्षा झाली । देशास्तव पायीं पडली ॥ शृंखला ॥
' बंदिवान देशासाठीं !' । मिळविलीत आपण मोठी ॥ कीर्ति ही ॥
कर्तव्यमार्ग अति कठिण । आपण तो उल्लंघून ॥ दाविला ॥
लाभतात अल्पच दिन ते । मातृ–भूमि सेवा घडते ॥ ज्यामुळें ॥
मग पुढें एक महिन्यांनीं । आपणां दिलें सोडोनी ॥ वाचिलें ॥
आपणही आला गांवीं । लीलेस अतां आणावी ॥ ठरविलें ॥
मी तुम्हां पत्र पाठविलें । तें काल पोंचलें असलें ॥ पाहिजे ॥
लिहिलें मी होतें त्यांत । ' न पडे कधिं विधि–घटनेंत ॥ अंतर ' ॥
"ती कुठें ?...." आज येणार ! । कमलाकर ! आतां धीर ॥ क्षण धरा" ॥
" आनंद । अहा ! आनंद । सच्चिदानंद । चहुंकडे भासे " ॥
कमलाकर तो उल्हासें ॥ बोलला ॥

*  *  *  *

म्हाळसाकाकु त्या आंत । चरकल्या सर्व वृत्तान्त । ऐकितां ॥
त्या गेल्या देवगृहांत । घेऊन माळ हातांत ॥ बोलल्या-॥
" विठ्ठला ! यापुढें वैर । मी सुनेविशीं धरणार ॥ ना कधीं ॥
ती आज असे येणार । मीहून तिच्या जाणार ॥ संनिध ॥
धन्य धन्य माझी सून । ती म्हणून जाचांतून ॥ वांचली ॥
मीं केली माराहाण । सासूचा मोठा मान ॥ लाभतां ॥
मी ' सासू ' या शब्दांत । किति वैर करुनि हें व्यक्त ॥ दाविलें ॥
' कमि काय असे शिकलेला। मिळतील हजारों त्याला ॥ बायका ' ॥
लीलेला रागें रागें। बोललें हिणवुनी मागें ॥ एकदां ॥
मिळतील हजारों त्याला । मिळणार न एकहि लीला ॥ सद्गुणी ॥
हें आज कळोनी आलें । देवताच माझे लीले ! ॥ धन्य तूं ॥
उघडली । दृष्टि चांगली । जशा त्या मुली । तशी ती सून ॥
देईन जगा घालून ॥ मी धडा ॥

---

# प्रकरण तिसरें.

## विलक्षण योगायोग !

पांचच्या गाडिनें आली । लीला ती सायंकाळीं ॥ उत्सुक ॥
पाहतांच त्या लीलेला । कमलाकर मूढच झाला ॥ अंतरीं ॥
क्षण होतां दृष्टादृष्ट । एकमेक बघती इष्ट ॥ दैवतें ॥
चित्रासम झाल्या माना । ओठांतुन शब्द फुटेना ॥ एकही ॥
वर्षाव होय अश्रूंचा । ये भरुन कंठ दोघांचा ॥ गहिंवरें ॥
त्या मंगल दृश्या बघुनी । यशवंतराव ते हंसुनी ॥ बोलले ॥
" आठवतो मज तो काळ । यमुनेनें जुइचा वेळ ॥ लाविला ॥

मोठ्यानें वारा आला । मांडव तों खालीं पडला ॥ एकदां ॥
कमलाकर ! त्या वेळेला । देऊन हात सांवरिलो ॥ मीच तो ॥
आतांही यावेळेला । बालमित्र ये साह्याला ॥ तो पुन्हां ॥
आनंद वाटतो मजला । कीं ऋणानुबंधें आला ॥ योग हा ॥
मी आणि दिवाकर, यमु ही । मंडळी न फुटलों कधिंही ॥शिशुपणीं॥
मी नांव ' दिवाकर ' घेतां । कां ? असे रोखुनी बघतां ॥ मजकडे ॥
मुंबईत सध्यां असला । विसरे न तरी तो मजला ॥ अजुनही ॥
" कां बघूं नये मी सांगा । प्रेमाचा दिसतो धागा ॥ अंतरीं " ॥
कमलाकर ! ऐकला पाहूं । हें आतां नुसतें हूं हूं ॥ करुं नका ॥
" आडनांव जोशी त्यांचें" । "कमलाकर ! नातें तुमचें ॥ कोठलें " ॥
" यशवंत ! अहो ! यशवंत ! । माझे तर ते अत्यंत ॥ मित्र कीं ॥
सहवास जरी घटकेचा । तोच पूर्ण जिव्हाळ्याचा ॥ जाहला ॥
तावडींत सरकाराच्या । सांपडलें त्या मुळशीच्या ॥ प्रकरणीं ॥
जेलांतुन होतां मुक्त । भेटले बेलबागेंत ॥ एकदां ॥
स्नेह हा जडे त्यावेळा । ते तेव्हांपासून मजला ॥ जाणती ॥
मुंबईत होतो परवां । सांगितली माझी तेव्हां ॥ ही स्थिती ॥
मी इतकें सांगत असतां । कांहींच न त्यांच्या चित्ता ॥ वाटलें ॥
संपतां सांगणें सगळें । हास्यचि तें त्यांनीं केलें ॥ शेवटीं ॥
कारण तें त्याचें कळलें । आंतून तुम्ही तर सगळे ॥ एक कीं" ॥
" कमलाकर ! इतके असुनी । ना दिला थांग लागूनी ॥ आपणां ॥
त्यावेळीं वारंवार । आमुचा पत्रव्यवहार ॥ जाहला ॥
त्यांचाच अम्हां आधार । ते मित्र दिवाकर चतुर ॥ फार हो ! ॥
व्हावयास शेवट गोड । प्रेमयुक्त केलें वेड ॥ गुप्त हें ॥
पोंचवावया यमुनेला । जो गृहस्थ आहे आला ॥ या स्थळीं ॥
त्या दिवाकरांचा भाऊ । तोच कीं नका हो ! पाहूं ॥ विस्मयें ॥


बाहेर उभे आहेत । मित्र ते दिवाकर आंत ॥ बोलवा ॥ "
" नाहींना मी स्वप्नांत । आश्चर्य किती यशवंत ॥ आज हें " ॥
" आश्चर्य कशाचें म्हणता । मी होउन येतों आतां ॥ हा पहा " ॥
" हें काय! दिवाकर! केव्हां। आलांत अहो ! या गांवा ॥आमुच्या"॥
" तुमच्याच गांवचा मीही । नातें न जोडिलें कांहीं ॥ नविन हें ॥
रामराव जे कुलकर्णी । त्यांनाच दिलेली भगिनी ॥ मम असे ॥
दारुच्या भयंकर व्यसनीं । घरदार सर्व वडिलांनीं ॥ बुडविलें ॥
एकदां त्याच धुंदींत । घातला दगड डोक्यांत ॥ आइच्या ॥
दारुचा एक तो पेला । परितेथें सर्व घोटाळा ॥ करविला ॥
गृहिं आम्ही भाऊ दोन । दीनांहुन झालो दीन ॥ या जगीं ॥
त्यामुळें रामरावांनीं । आपल्या घरीं ठेवूनी ॥ घेतलें ॥
धाकटे बंधु हे नाना । नावडली करणें यांना ॥ याचना ॥
हे गेले पुण्यपुरीस । करण्याला विद्याभ्यास ॥ उत्सुकें ॥
मागुनी मधुकरी शिकले । हे आतां उत्तम झाले ॥ डॉक्टर ॥
मी मात्र न तेव्हां हललों । इंग्रजी मराठी शिकलों ॥ या इथें ॥
यापुढें स्वसामर्थ्यानें । मिळवावें मीच मनानें ॥ घेतलें ॥
मुंबईस नंतर गेलों । उद्योग पहाया फिरलों ॥ पुष्कळ ॥
मूळचाच मी तर नकल्या । मंडळींत नकला केल्या ॥ कितितरी ॥
दणधाकट मी देहानें । आणखी त्यांत रूपानें ॥ उत्तम ॥
त्यामुळें साधलें काम । गाठली सिनेमा फिल्म-॥ कंपनी ॥
समरस मी झालो तींत । जेव्हां जी होतो घेत ॥ भूमिका ॥
मॅनेजर पाहुन कामें । 'व्हेरी गुड् ॲक्टर' प्रेमें ॥ बोलले ॥
कंपनीस झाला लाभ । माझ्याशीं त्यांनीं लोभ ॥ राखिला ॥
तुमच्यासम शिकलों नाहीं । अंगच्या गुणें ख्याती ही ॥मिळविली॥
गांधींचें मी व्याख्यान । ऐकिलें लक्ष देऊन ॥ एकदां ॥

परिणाम मनावर झाला । त्याक्षणींच या धंद्याला ॥ सोडिलें ॥
मायभूमिची किंकाळी । ऐकाया तेव्हां आली ॥ नीटशी ॥
पारतंत्र्य हें जाणवलें । त्यामुळेंच माझे डोळे ॥ उघडले ॥
स्वातंत्र्य हेंच कीं ध्येय । स्वातंत्र्य गेय मम पेय ॥ हृदयही ॥
इष्टमित्र वा कुळदेव । स्वातंत्र्यच नाहीं भाव ॥ वेगळा ॥
निर्धार मनें हा केला । वाहिलें देशसेवेला ॥ आयु हें ॥
खादिनें जाहलों वेडा । सर्वही विदेशी कपडा ॥ फेंकिला ॥
पांघरलें देशी वस्त्र । सत्याग्रहरूपीं शस्त्र ॥ उपासिलें ॥
घेतला दंड हातांत । संचार करूं देशांत ॥ लागलों ॥
त्यावेळीं शिक्षा पहिली । मुळशींतच मजला झाली ॥ कडक, ती ॥
त्या पुण्यांत तुमची माझी । पहिलीच भेट रात्रीं जी ॥ जाहली ॥
लागला विचारूं जेव्हां । मोहक मी थापा तेव्हां ॥ मारिल्या ॥
कीं ' नांव दिवाकरपंत । शेतकी करित वाईंत ॥ राहतों ' ॥
नेहमींच मागें असतें । आम्हां ' सी. आय. डी. खातें ' ॥ घेरतें ॥
जरि विचारलें कोणीही । नांव गांव सांगत नाहीं ॥ तें खरें ॥
मम नाम असें हें शाम । लक्षांत असूंदे प्रेम ॥ वाढुंदे ॥
मुंबईंत आल्यावेळीं । माहिती तुम्ही सांगितली ॥ आपली ॥
घेतली सर्व ऐकून । आधिकच मी अंतःकरण ॥ लपविलें ॥
दुसऱ्याच दिवशीं पाकिट तें । आपणाविशीं यशवंतें ॥ धाडिलें ॥
ना तुम्हां कळविलें कांहीं । त्यासाठीं युक्त्या मीही ॥ लढविल्या ॥
प्रेमाच्या कारस्थानीं । मज घेता आला म्हणुनी ॥ भाग हा ॥
हे बंधु आणि ही यमुना । युक्तिनेंच केले यांना ॥ मी पुढें ॥
या दाराआड लपोनी । मी सर्व लक्ष देऊनी ॥ ऐकिलें ॥
ठरविलें अम्हीं संकेत । त्याप्रमाणेंच साद्यंत ॥ जाहलें ॥
भेटण्या उताविळ चित्त । हें किती रहावें शान्त ॥ दाबुनी ॥

येतांच नांव ओघांत । मी येउं नये कां आंत ॥ काय हो ! ॥"
" आपल्या गृहीं येतांना । लागे न पुसावें कोणां ॥ कथिहि तें "॥
" विषयांतर थोडें करतों । वृत्तांत नविन मी कथितों ॥ आपणां ॥
कमलाकर ! भागिनी तुमच्या । दोन्यांत मला परवांच्या ॥ भेटल्या ॥
पंढरींमधें आहेत । त्या सुधारल्या मार्गांत ॥ आपल्या "॥
" करूं नका तिचा उच्चार । मी तिचा सर्व व्यवहार ॥ जाणतों ॥
ती मेली म्हणुनी परवां । उठलेली होती अफवा ॥ एकदां ॥
सुखि असुंदे म्हणजें झालें । शामराव ! मन हें विटलें॥ तिजविषयीं ॥
म्हण एक इंग्रजीमधली । आठवली मज या वेळीं ॥ ती अशी ॥
" घातली । जुन्या बाटलीं—। मधें, चांगली । सुरा जरि मधुर ॥
'बाटली जुनीं,' येणार ॥ हें मनीं ॥
ती असेल आतां सोळी । तेवढ्यांवरूनी कसली ॥ पात्रता ॥
' त्या सुधारल्या आहेत ' । भावार्थ यांतला व्यक्त ॥ हाच ना ? "॥
" कमलाकर ! दुर्दिन सरले । त्यांचें मन तें पालटलें ॥ कितितरी ॥
एम्. बी. बी एस्. झालेले। नव विधुर, तरुण, जे लेले ॥ डॉक्टर ॥
त्यांच्याच दवाखान्यांत । त्या दुर्गाताई प्रसुत ॥ जाहल्या ॥
त्या तसल्या संकटकालीं । त्यांनींच चांगली केली ॥ शुश्रुषा ॥
आधार जाहला त्यांचा । त्या तसल्या आयुष्याचा ॥ सोबती ॥
त्यांच्याच घरीं आहेत । दुःखांतुन आतां मुक्त ॥ जाहल्या ॥
कमलाकर ! या वेळेला । कां तुम्ही खिन्न हा केला ॥ चेहरा " ॥
" वैधव्य चित्र तें दिसलें । सामाजिक प्रश्नहि आले ॥ स्मृतिपुढें ॥
त्या तरुणाचा सहवास । क्षणाहि तो होय दुर्गास ॥ विषसम ॥
ती तरुण देखणी त्यांत । तारुण्यवृत्ति दोघांत ॥ सारखी ॥
जाणार न ' नेचर ' कोठें । बाळि पडले मोठे मोठे— ॥ लोकही ॥
यावेळीं तारुण्याच्या । होणार चुका दोघांच्या ॥ सहज हें ॥

त्यापेक्षां.... " बोला बोला । या सामाजिक प्रश्नाला ॥ चालन " ॥
" कां ! पुनर्विवाह न केला । दोघांना असता झाला ॥ सुखदसा " ॥
" कमलाकर ! तुमचा प्रश्न । सोडविला आपणहून ॥ ताईंनीं ॥
त्या पुनर्विवाहच करुनीं । राहिल्या सुखानें गृहिणी ॥ होउनी ॥
डॉक्टरीणबाई झाल्या । पूर्विच्या न आतां उरल्या ॥ समजला ? ॥
चरख्यावर आनंदांत । उरलेल्या वेळीं सूत ॥ काढिती ॥
कधिं पिकेटिंग-त्या करिती । कधिं 'प्रभातफेरिस जाती' ॥ भक्तिनें ॥
त्या सुधारल्या आहेत । पण तुम्ही अर्थ केलांत ॥ वेगळा ॥
कल्याणबंधु तो तुमचा । कंपौंडर त्या लेल्यांचा ॥ जाहला " ॥
" आनंद वाटला मजला । दोघेही सन्मार्गाला ॥ लागली ॥
या गृहिं जी घडली क्रान्ती । त्यामुळेंच ही उत्क्रान्ती ॥ जाहली ॥
नीट सर्व आलें ध्यानीं । फसविलें तुम्ही सर्वांनीं ॥ होय ना ! " ॥
" फसविलें न आम्ही कोणी । यमुनेस मात्र देऊनी ॥ हंसविलें ॥
संधिचा लाभ घेऊनी । काव्य–बद्ध नाटक करुनी ॥ दाविलें ॥
शेवटच्या अंकामधले । प्रत्येक प्रवेशच झाले ॥ बोधक ॥
कार्य यांत ज्यांनीं केलें । त्याचे गुण उदया आले ॥ अंगचे ॥
संसार रंगभूमी ही । तिजकडे दृष्टिनें याही ॥ पाहतां ॥
' लीलेच्या संसारांत ' । पूर्वभाग जो अत्यन्त ॥ भीषण ॥
कारुण्यरसें भरलेले । आहेत प्रवेशच सगळे ॥ त्यांतले ॥
स्वार्थ–बद्ध अंतःकरणें । साधाया हित असुयेनें ॥ पाहती ॥
होऊन विजय सत्याचा । लीलेच्या संसाराचा ॥ जम बसे ॥
शेवट हा गोडच झाला । धन्यवाद त्या देवाला ॥ यांतले ॥
काव्यबद्ध नाटक असलें । गद्यांत अहा ! रंगविलें ॥ चांगलें ॥
तर फारच फार खुलेल ! । संधि ती तशी येईल ॥ कधि बरें ? ॥
हा ' लीलेचा संसार ' ! । उद्बोधक बहु, करणार ॥ रंजन ॥

एक कार्य माझें उरलें । शेवटीं अतां तें केलें ॥ पाहिजे ॥
मी कशास लावूं वेळ । संपूर्ण खेळ होईल ॥ तरिच कीं ॥
कमलाकर ! तुमची लीला । सांभाळा ही सेवेला ॥ सादर " ॥
बोलून असें मामांनीं । दोघांचे कर प्रेमांनीं ॥ करिं दिले ॥
अत्यंत मनोहर ज्याच्या । लागल्या कळ्या उमलाया ॥ हळुंहळूं ॥
सुंदरसा हार जुईचा । यशवंतें तो लीलेच्या— ॥ करिं दिला ॥
घालविला कंठीं पतिच्या । जाहला गजर टाळ्यांचा ॥ त्याक्षणीं ॥
त्या प्रसंगास पाहून । ती बघे लाजलाजून ॥ पतिमुखा ॥
भेटती । एकमेक ती । वियोग स्थिती । कठिण अति कठिण ॥
अनुभवाविना हें ज्ञान ॥ कोठलें ॥
" त्यावेळीं तो दुःखाचा । यावेळीं आनंदाचा ॥ गजर हा ॥
त्यारिचा गजर ऐकूनी । मी जागा झोपेमधुनीं ॥ जाहलों ॥
नित्याच्या अभ्यासाला । उठलों मी त्यावेळेला ॥ सत्वेर ॥
तो गजरहि तेव्हां सांगे । मरण्यास जीव हा त्यागें ॥ चालला ॥
हा गजरहि आतां सांगे । कीं जीव रमे अनुरागें ॥ तो पुन्हां ॥
अव्यक्त । भाव एकांत । दिसे दुसऱ्यांत । व्यक्त झालेला " ॥
माधव हें वदता झाला ॥ स्फूर्तिनें ॥
वाजवीत हर्षें टाळी । शामराव ते त्यावेळीं ॥ बोलले ॥
सहज एक सुचली कोटी । केवळ ती मौजेसाठीं ॥ सांगतां ॥
ओळखा तुम्ही भावार्थ । फारसा खोल शब्दार्थ ॥ करूं नका ॥
'सासू' या शब्दांमधुनीं । 'सा' अक्षर जर वगळूनी ॥ पाहिले ॥
'सू' अक्षर केवळ उरलें । संसारीं 'सूंसूं' केलें ॥ सासुनें ॥
वाऱ्यासम 'सूंसूं' करित । संसार-गेह उध्वस्त ॥ करूं बघे ॥
'सा' पहिला स्वर गाण्यांत । 'सूं' व्यंजन संसारांत ॥ सासुच्या ॥
तें करीत असतां 'सूंसूं' । सूसूची झाली 'सासू— ॥ देवता' ॥



“ कमलाकर ! तुमची लीला । सांभाळा ही सेवेला ॥ सादर ॥ ” पान ७८.

देवीचा हा अवतार । ' बळि सुनेचाच घेणार ! ' ॥ म्हणतसे ॥
' सा ' नांदी संगीतांत । ' सू ' कोरस संसारांत ॥ सासुच्या ॥
' सा ' नांदी मंगल दावी। ' सू ' कोरस धूळच उडवी ॥ शुभगृहीं ॥
ती ' सू ' न म्हणोनी सून । सासवा सुना या भिन्न ॥ अन्वयें ॥
त्यामुळें । वैर माजलें । अक्षरांतले । भेद काढाया ॥
कुणि हवा नवा जन्माया ॥ पाणिनी " ॥

बसलेल्या देवगृहांत । घेऊन माळ हातांत ॥ भक्तिनें ॥
जरि चिंतेनें थकलेल्या । मंडळींत काकू आल्या ॥ सत्वरें ॥
करि नमस्कार भावानें । उभि राहे मर्यादेनें ॥ सून ती ॥
" हो लेकुरवाळी बाळे ! । विसर सर्व जें जें झालें ॥ मागचें ॥
सांभाळ नवा संसार । या वृद्धपणीं आधार ॥ तूं मला ॥
ज्यांत वैर नांदत होतें । सोडलें आज तें नातें ॥ सासुचें ॥
तुजसम ना जरि शिकलेली । तरि सुधारणा झालेली ॥ सासु ही ॥
अवतरे मातृ-रूपानें । पाहते पहा प्रेमानें ॥ तुजकडे ॥
ये अशी जवळ तूं लीले ! । वर पहा ! उघड हे डोळे ॥ निर्भयें ॥
जन्मलीस अंतःकरणीं । पोटच्याहि पोरांहूनी ॥ अधिक तूं ॥
मी देवदेव करणार ! । मी तुझींच खेळविणार ! ॥ बाळकें ॥
दाखीव ग्रंथ वाचूनी । ऐकेन लक्ष देऊनी ॥ चांगलें ॥
अनुभवें कळोनी आलें । शिक्षणें सुसंस्कृत केलें ॥ मन तुझें ॥
हें पटे । चित्त पालटे । मनांतिल तुटे-। तेढ, वाटे हें ॥
कीं स्त्रियांस योग्यचि आहे ॥ शिक्षण " ॥

" सत्याचा झाला विजय । देखावा हा रमणीय ॥ कितितरी ॥
मी धन्य धन्य भाग्याचा । लाभ हा तुम्हां सर्वांचा ॥ जाहला ॥
आई ! मी वंदन करितों । ये बैस आणुनी देतों ॥ आसन ॥
आजची दिवाळी खरि ही । देशभक्त आले गेहीं ॥ चालुनी ॥

आजचा । पर्वकाळचा । दिवस आमुचा । सुसंस्मरणीय ॥
कारण या सर्वां होय ॥ प्रभुच तो " ॥

---

# प्रकरण चवथें.

## धन्योद्गार

गांवांत चहुंकडे वार्ता । ती तेव्हां हां हां म्हणतां ॥ पसरली ॥
अत्यंत वाटुनी नवल । त्यावेळीं ते पाटील ॥ विरमले ॥
साद्यंत समजलें सकलां । मागील उलगडा झाला ॥ त्यामुळें ॥
दात्यांच्या कमळाबाई । शिखऱ्यांच्या विमलाबाई ॥ बोलल्या ॥
'येईल वेळ सत्याची' । वदलेली वाचा साची ॥ जाहली ॥
अत्यंत हर्ष वाटून । भालचंद्र कवि येऊन ॥ बोलला–॥
'अनुरता । मुलीवर अती । तशी नित्य ती । सुनेवर राहे ।
यावेत सुखाचे दिन हे ॥ यापुढें' ॥
"बोललों असे मी होतो । सोन्याचा सुंदर दिन तो ॥ उगवला ॥
सासवा सुनांचें वैर । यापुढें जगीं दिसणार ॥ ना कधीं ॥
लागणार दिसुं शुभचिन्हें । आजच्या प्रसंगें मज हें । वाटतें" ॥

*　　*　　*　　*

मैत्रिणी गृहीं येऊनी । लीलेचें कौतुक करुनी ॥ बोलल्या ॥
"धन्य धन्य लीलाताई ! । बुद्धीतर केलिस बाई ॥ कुंठित ॥
'हे असले दिन जातील । भाग्याचे ते येतील ॥ यापुढें ॥
राखून मनें दोघांचीं । मी वाहिन संसाराची ॥ काळजी' ॥
बोललीस लीले ! मागें । तें तुझें सत्य झालें गे ॥ या युगीं ॥
पाहून तुझा संसार ! । निघणारच धन्योद्गार ! ॥ जन-मुखीं ॥

सत्वशील तूं आहेस । येणार तुझी कोणास ॥ पात्रता ॥
लाभले । दिवस चांगले । कार्य जाहलें । मनाजोगें हें ॥
सत्याचा वाली आहे ॥ प्रभुच तो ॥ ”

*    *    *    *

इच्छिलें जसें मामांनीं । त्याप्रमाणेंच ये जुळुनी ॥ लग्न तें ॥
मधु गेला कॉलेजाला । कमलाकर उद्योगाला ॥ लागला ॥
करि शेती उत्साहानें । चाकरांसवें ममतेनें ॥ वागुनी ॥
उत्पन्न वाढलें फार । थाटला तयें संसार ॥ चांगला ॥
करि सर्वांवर उपकार । सांभाळी अति व्यवहार ॥ नीतिनें ॥
बोलणें चालणें एक । लागले कराया लोक ॥ वाहवा ॥
करि सुधारणा बेतानें । लोकांचीं अंतःकरणें ॥ जाणुनी ॥
करि संघटना गांवांत । मोकळ्या मनें सर्वांत ॥ मिसळुनी ॥
गीतेवर त्याची भक्ती । कधिं देई व्याख्यानें तीं ॥ प्रवचनें ॥
गांवांत । करी अत्यंत । शांततायुक्त । चळवळी नाना ॥
जीवसा सर्व लोकांना ॥ होय तो ॥

---

# प्रकरण पांचवें.

## काव्यमय प्रसंग !

“ लाडके ! ” येवढे शब्द । कमलाकर वदुनी स्तब्ध ॥ राहिला ॥
घातली खालती मान । लीलेचें अंतःकरण ॥ भरुन ये ॥
भिन्न भिन्न अंतःकरणें । संलग्न प्रेम-भावानें ॥ जाहलीं ॥
स्वप्नांतिल तो देखावा । लीलेच्या जीवा तेव्हां ॥ आठवे ॥
मी ‘ तेव्हां ’ आणी ‘ आतां ’ । हा विचार चित्तीं येतां ॥ ती म्हणे ॥

" स्वप्नीं जे केले नवस । काळानें आलें त्यास ॥ सुयशही ॥
' जर नाथ उद्यां येतील....'। त्यांतील उद्यांचा काळ ॥ वाढला ॥
वाढला तरीही त्यांत । भावी यश हें अज्ञात ॥ साठलें ॥
धन्य धन्य ते प्रभुराज । दाविला अम्हांला आज ॥ सुदिन हा " ॥
कौतुकें बघुन लीलेला । कमलाकर त्यावेळेला ॥ बोलला ॥
" ईश्वरी । कृपा ज्यावरी । पहा सत्वरीं । तरे तो जीव ॥
जरि कुठें मिळेना ठाव ॥ सागरीं ॥
आनंदप्रद परिणामीं । जाहलें काव्य हें नामी ॥ रम्यसें ॥
एवंच मानवी बल हें । मर्यादित रूपें आहे ॥ या जागीं ॥
इतिहास तुझाही कळला । समजली एकमेकांला ॥ हृद्गतें ॥
विसरुंया मागच्या गोष्टी । ही नवीन आतां सृष्टी ॥ आपुली ॥
तुजवर मी लिहिलें पहिलें । कारुण्यजनक अति झालें ॥ काव्य तें ॥
ऐक तूं किती प्रेमाचा । त्यांतला भाग शेवटचा ॥ वाचतों ॥

सामाजिक खंडकाव्य.

# " लीलेचा संसार "

कवि:—कमलाकर विष्णू नेने.

"कुठल्याशा एक गांवीं । जाहली गोष्ट ऐकावी ॥ नीट ती ॥

*   *   *   *

" मारिली । उडी त्या जलीं । क्षणीं त्या स्थळीं । होय जलरूप ॥
ती गळे कळी निष्पाप ॥ यापरी ॥
मरण ना कधीं प्रेमाला । प्रेम हेंच दे मरणाला ॥ जीवन ॥
संसार—सौख्य तें कसलें । नव्हतेंच तिनें अनुभविलें ॥ पतिसवें ॥
त्यामुळें । प्राण परतले । पतिशिं गुंतले । होय ती वेल ॥
मग तिथेंच कंठी काळ ॥ निर्जनीं ॥

बहरली कळ्यांनीं वेल । ना तथापि उमलें फूल ॥ एकहीं ॥
जरि मेघें वृष्टी केली । आनंदें नाहीं झुलली ॥ ती कधीं ॥
तीं खिन्न सदा पाहूनी । भृंग—पंक्ति त्याही दुरुनी ॥ चालल्या ॥
रवि— किरणें करितां स्पर्श । कधिं नाहीं तिजला हर्ष ॥ वाटला ॥
जरि सुटला वारा गार । तरि तिचा हृदय— संसार ॥ खिन्नसा ॥
आसपास वेली नाना । पाहतां नवल तें त्यांना ॥ वाटलें ॥
कितिकांनीं केला प्रश्न । 'झुरतेस कुणा पाहून ॥ बालिके ! ॥
सौंदर्य तुझें तारुण्य । कितितरी असें रमणीय ॥ बालिके ! ॥
हा भोग कुणा देणार ? । कां असेंच वाळविणार ? ॥ तनुस या ॥
कां धारण करिशी मौन । कां अशी नेत्र झांकून ॥ सांग कीं ॥
हे योग समाधि ज्ञान । तुज देता झाला कोण ? ॥ सद्गुरु ॥
क्षणमात्र पहा तूं इकडे । आनंद किती हा वेडे ! ॥ चहुंकडे ॥
घे अनुभव तारुण्याचा । जीवांच्या संयोगाचा ॥ एकदां ॥
जोडीविण स्थिरता नाहीं । जोडीविण सुख ना कधिंही ॥ अंतरीं ॥
जोडीस्तव धडपड चाले । जोडींतुन जन्मा आलें ॥ प्रेम गे ॥
जाईल तुझी हुरहूर । स्पर्शतां एकदां भ्रमर ॥ रसिक हे ॥
उघडुनी दृष्टि बघ तूं गे । प्रेमभाव होतिल जागे ॥ हृदयिचे ॥
स्वर्ग तो पाहिला कोणीं । जें दिसेल या डोळ्यांनीं ॥ तें खरें' ॥
कितितरी । लता यापरी । बोलती परी । बघेना तिकडे ॥
प्रेमाचें प्रेमच कोडें ॥ उलगडी ॥
तीं बघुन मनोहर वेला । तों रमेश संनिध गेला ॥ भक्तिनें ॥
कितितरी आज, दिवसांनीं । त्या तिच्या कळ्या उमलूनी ॥ डोलल्या ॥
डोलतां डोलतां हंसल्या । प्रेमाच्या सुंदर खुलल्या ॥ भावना ॥
पाहणें, डोलणें, हंसणें । क्षणिक तें तिचें दाखविणें ॥ प्रेमही ॥
पाहुनी रमेशा हर्ष । उधळिलीं लतेनें पुष्पें ॥ त्यांवर ॥

सरतांच हेतु आशेचा । तों देह गळे वेलीचा ॥ त्या स्थळीं ॥
पाहिलें । तया वाटलें । नवल त्यामुळें । परी ती वेला ॥
त्याक्षणींच अक्षयतेला ॥ पोंचली ॥ ”
“ तो गडे राहुंदे विषय । त्याच्याशीं आतां काय ॥ आपणां ॥ ”
( लीलेचा हात धरूनी । प्रतिबिंब दर्पणीं बघुनी ॥ तो म्हणे ॥ )
“ पण आतांचें हें काव्य । किति रम्य अहाहा ! धन्य ॥ आज मी ॥
कर सरले ! इकडे बोट । आंगठी हिऱ्याची नीट ॥ जप बरें ! ॥
( स्वप्नांतिल स्मृति होऊनी । ती बघे मनीं दचकूनी ॥ पतिकडे ॥ )
कां चपापून बघतेस । संकोच कसा धरिलास ॥ अजुनही ॥
संकोच, भीड भावंडें । प्रेमाचें नच हें कोडें ॥ उकलतीं ॥
हे प्राणसखे ! मृगनयने ! । बघ बरें ! अतां प्रेमानें ॥ ये अशी ॥
लाडके ! मनापासून । आलिंगन आपणहून ॥ दे मला ॥
या अशा समाधानांत । प्रेमाच्या सहवासांत ॥ संप्रती ॥
जर आलें सुंदर मरण । धन्य धन्य मी होईन ॥ कां अशी ” ॥
“ धडधडलें माझें हृदय । हें असें अमंगल काय ॥ या इथें ॥
वदुं नये असें केव्हांही । नेहमीं न वेळा कांहीं ॥ सारख्या ” ॥
“ हें त्यांत अमंगल कसलें ! । मिळतसे जन्म हा सरले ! ॥ मृत्युनें ।
मरण हें पेरणें, आणी— । जनन तें उगवणें, ज्ञानी ॥ सांगती ॥
लाडके ! । सौख्यदायके ! । कधिं न मरुं शके । अमर हा आत्मा ।—
वेदान्तहि—
याचा—
महिमा ॥
गातसे ॥

# प्रकरण सहावें.

## " चमत्कार ! "

" यापुढें जपुन वागावें । आईस घरीं ठेवावें ॥ वेगळें ॥
मनिं विचार होता केला । अनुभवें आज पालटला ॥ तो परी ॥
आइचें निवळलें चित्त । झालेला आहे दिसत ॥ पालट ॥
करणार न सासुरवास । दृढ झाला हा विश्वास ॥ तिजविशीं ॥
विसरून अतां सारेंही । एकिनें रहावें गेहीं ॥ यापुढें " ॥
कमलाकर परमोदार । एकांतीं करि सुविचार ॥ यापरी ॥
नंतर तो बसला असतां । शेलेच्या सुंदर कविता ॥ वाचित ॥
इतक्यांत पत्र हातांत । द्यावयास आला दूत ॥ सत्वरें ॥
कमलाकर चकितच झाला । पाहतांच त्यावेळेला ॥ पत्र तें ॥
" खालती सही बाबांची । अति झाली आश्चर्याची ॥ गोष्ट ही ॥
हें पत्र खरें कीं भास । प्रत्यक्ष सही मग भास ॥ हा कसा ॥
बाबांनीं आहे लिहिलें । माझें तर मन गोंधळलें ॥ हें अती ॥
पुण्यवंत बाबा अमुचे । असणार साह्य देवाचें ॥ योग्य हें ॥
म्हणतात " चार दिवसांनीं । सर्वांना मी येऊनी ॥ भेटतों ॥
घसरला पाय कृष्णेंत । जाहलों भयें अत्यंत ॥ घाबरा ॥
धारेस लागलों जेव्हां । 'संपलें आयु' मज तेव्हां ॥ वाटलें ॥
अघटीत ईश्वरी लीला । निर्विघ्नपणें बेटाला ॥ लागलों ॥
कितितरी संकटें आलीं । देवानें सुटका केली ॥ त्यांतुनी ॥
दाविली दिशा देवानें । मी सुखें त्याच मार्गानें ॥ चाललों ॥
भेटले पुढें मार्गांत । सद्गुरू आत्मरूपांत ॥ मग्न जे ॥
त्यांसवेंच गोकर्णास । आलों मी त्यांचा दास ॥ होउनी ॥

सहवास सुखाचा झाला । शांतता खरी हृदयाला ॥ लाभली ॥
आश्चर्य वाटतें मजला । कीं प्रवास इतका झाला-॥ तरि कसा ॥
ही यात्रा गोकर्णाची-। व्हावया, कृपा देवाची ॥ कारण ॥
असतांना मी वाडींत । स्थिति गृहिची होती विदित ॥ सर्वही ॥
तदनंतर गोकर्णांत । आश्चर्ययुक्त गृहवृत्त ॥ समजलें ॥
त्यालाही कारण झालें । यात्रेस भक्तजन आले ॥ तिकडचे ॥
उतरले लोक ते जेथें । आम्हीही होतों तेथें ॥ राहिलों ॥
आपसांत बोलत होते । आंतून सर्वही मीं तें ॥ ऐकिलें ॥
लागलें मला वाटाया । यावेंच तुम्हां भेटाया ॥ एकदां ॥
भेटून अतां सर्वांस । राहणार गोकर्णास ॥ मी पुन्हां ॥
जावया गृहीं सद्गुरुंनीं । आज्ञाहि मनापासूनी ॥ मज दिली ॥
या साऱ्या आश्चर्यांत । आश्चर्यच माझें व्यक्त ॥ नविन हें ॥
आश्चर्य विलें आश्चर्या । जो झाला हर्ष लिहाया ॥ ये, न तो ॥
होईल भेट ज्यावेळीं । उलगडा अधिक त्यावेळीं ॥ करिन मी ॥
तोंवरती शांत रहावें । हा आशिर्वाद कळावें ॥ आपला-॥
—विष्णुपंत विनायक नेने " ॥

" प्रभुकृपा-दृष्टि-घन माला । आम्हांला सुखवायाला ॥ वर्षिली ॥
प्रभुनेंच अहा ! दाखविला । आम्हांला सुदिनांमधला ॥ सुदिन हा ॥
' लीलेच्या संसारानें ' । सर्वांचीं अंतःकरणें ॥ खुलविलीं ॥
हा ' लीलेचा संसार ' ! । ह्यापुढती हर्षोद्गार ! ॥ चिन्ह हें " ॥
बोलून असें तो गेला । शुभ वृत्त त्वरें आईला ॥ सांगण्या ॥
आनंद जाहला सकळां । तो जसा तसा करण्याला ॥ वर्णन ॥
असमर्थच माझी वाणी । केल्यास महाकवि कोणी ॥ करिलही ॥
लिहुं कसें । अशक्यच दिसे, । अहो ! जें असे । वर्णनातीत ॥
तें शब्दांच्या सृष्टींत ॥ नाढळे ॥

# प्रकरण सातवें.

## ".आनंदीआनंद"

—❧:o:❧—

पत्रासम आले पंत। त्यांना गृह फार निवान्त ॥ वाटलें ॥
कमलाकर धावुन आला। अत्यंत भक्तिनें वडिलां ॥ भेटला ॥
लीलेनें वंदन केलें। मामंजी गृहिं आलेले ॥ पाहतां ॥
काकूंनीं म्हटलें भावें। 'अपराध सर्व विसरावे ॥ शरण मी' ॥
गळलेले अश्रू पुशित। त्या स्तब्ध उभ्या दारांत ॥ राहिल्या ॥
बघितलीं विष्णुपंतांनीं। आलेलीं स्त्रीच्या नयनीं ॥ आंसवें ॥
क्षणिं त्यांना तेव्हां कळलें। मन हिचें अतां पालटलें॥ कितितरी ॥
दृष्टीनें केवळ कळतें। भाव-बद्ध-मानस असतें ॥ ज्या स्थळीं ॥
पुत्राच्या पाठीवरुनी। कौतुकें हात पंतांनीं ॥ फिरविले ॥
भर आला वात्सल्याला। कडकडुन एकमेकांला ॥ भेटले ॥
क्षण उमका बोलायाला। कोणाला त्यावेळेला ॥ होइना ॥
गळणारे अश्रू पुसुनी। भरलेला कंठ करूनी ॥ मोकळा ॥
विष्णुपंत त्यावेळेला। आनंदें बोलायाला ॥ लागले ॥
" कल्पनाहि नव्हती बाळ !। कीं मंगलदिन येईल ॥ हा असा—॥
मधु कुठें " पुण्याला गेला। शिकण्याला, दिपवाळीला ॥ येइल " ॥
" वाडीला गेलों जेव्हां। म्हटलेलें होतें तेव्हां ॥ मी असें ॥
'मी पुढें पुन्हां येईन। वागेल आजपासून ॥ जर भली' ॥
शुभयोग खरोखर आला। सर्वांच्या आनंदाला ॥ कारण " ॥
" सत्यता सदा वाचेंत। सद्विचार आचरणांत ॥ नेहमीं ॥
होणार ! खरें होणार !। काढाल मुखाबाहेर ॥ शब्द जे " ॥
इतक्यांत 'वाढिलीं पानें'। म्हाळसाकाकु प्रेमानें ॥ बोलल्या ॥

जेवाया उठले पंत । अत्युत्तम होता बेत ॥ ठेविला ॥
ते धुतां पाय तात्काळ । पुसण्यास दिला टॉवेल ॥ काकुंनीं ॥
कमलाकर आणी पंत । बसतांच सुखें थाटांत ॥ भोजना ॥
लीला घे वाढायाला । काकु त्या तिच्या साह्याला ॥ लागल्या ॥
वृत्तांत घरांतिल सगळा । कमलाकर सांगायाला ॥ लागतां ॥
विष्णुपंत आनंदानें । बघुं मधुनी आश्चर्यानें ॥ लागले ॥
उरलें न भान दोघांस । हातांतिल हातीं घास ॥ राहिला ॥
ते इतके झाले दंग । चालला चढत अति रंग ॥ गोष्टिला ॥
ती ब्रह्मानंदीं टाळी । लागते जणूं त्यावेळीं ॥ भासलें ॥
द्वैतांतुन अद्वैतांत । रमुं पाहे त्यांचें चित्त ॥ हळुं हळूं ॥
गोंधळली आहे लीला । काकूंनीं त्यावेळेला ॥ जाणिलें ॥
बोलल्या पुढें होऊन । ' कमलाकर ! घे मागून ॥ भीड कां ! ' ॥
भानावर दोघे आले । भोजनास बसलों, कळलें ॥ मग तया ॥
" मी भिडस्त इतका नाहीं । मार्मिकता आहे आई ! ॥ ही तुझी ॥
लागली भूक सडकून । वाढाया तरि अनमान ॥ करुं नका ॥
पेटलीं इंजिनें दोन । पुरणार न वाटे अन्न ॥ मोजकें " ॥
" भीमाची झाली तृप्ती । लाडू ते दोनच कुंती ॥ वाढितां ॥
तात्पर्य हेंच यामधलें । प्रेमें जें अर्पण केलें ॥ तें पुरें " ॥
" पण गोड गोड बोलून । भीमानें लाडू दोन ॥ उपटिले ॥
आम्हाला एकहि नाहीं । ढेकर मग यावी आई ! ॥ ती कशी ?" ॥
" हो ! झाली स्मृति बरि मजला । लाडू मी वाढायाला ॥ विसरलें" ॥
" पण चक्रवाढ व्याजानें । करणार हिशोबी टिपणें ॥ मी तरी "
" तूं कॉलेजांतिल पोर । आम्हांला आडविणार ॥ बोलतां " ॥
" पण विनोद आणी हास्य । यांचा हा लाभहि काय ॥ थोडका ॥
लाडुही मिळाले आम्हां । विसरणार नाहीं भीमा ॥ मी कधीं " ॥

" एकाच तुळसिपत्रानें । दे ढेकर संतोषानें ॥ श्रीहरी " ॥
" तें कशास आपोष्णीनें । देतों मी आनंदानें ॥ ही पहा " ॥
हांसली । तोंच मंडळी । मौज वाटली । विनोदें फार ॥
हा विनोद–रस अति मधुर ॥ नउं रसीं ॥

---

## प्रकरण आठवें.

### " लीलेचा संसार ! "

संसारीं लीला रमली । गेहाला शोभा आली ॥ पुनरपि ॥

ती सासु आणि ती सून । तरि एकचि अन्तःकरण ॥ दोघिंचें ॥
" भावगीत" लीला वाचे । वेधलें लक्ष काकूंचें ॥ कौतुकें ॥
त्या कविंनीं जीं जीं लिहिलीं । सत्काव्यें तीं आणविलीं ॥ काकुंनीं॥
त्या बसल्या ऐकायाला । संपतां काव्य लीलेला ॥ बोलल्या ॥–
" विश्वासराव दातार । नागेशपंत सरदार ॥ वकिल ते ॥
कां दोष तयांना द्यावा । दुसऱ्याचा सद्‌गुण घ्यावा ॥ नेहमीं ॥
पोटास्तव लटपट सारी । नित्याची या संसारीं ॥ चालते ॥
साधिला स्वार्थ दोघांनीं । कां नीच एवढ्यावरुनी ॥ त्यां म्हणा ॥
त्यांतुन या संसारांत । सगळेच न त्यागी, सन्त ॥ जन्मती ॥
ते आज कसेही असले । तरि त्यांनीं माझें केलें ॥ चांगलें ॥
तुजमुळें । गेह शोभलें । असासि झांकलें । रत्न तूं लीले ! ॥
वाटतें दुःख कीं छाळिलें ॥ मीं तुला " ॥

# प्रकरण नववें.

## " प्रसाद चिन्हानि पुरःफलानि "

शांतियुक्त संसारांत । सर्वांचे दिन सौख्यांत ॥ चालले ॥
लीलेस पडे तों स्वप्न । संन्याशी कुणि येऊन ॥ बोलले ॥
" हो जागी झोंपेमधुन । घे आम्र-फळें हीं दोन ॥ तुज दिलीं " ॥
करि वंदन कर जोडून । तों स्वामी अंतर्धान ॥ पावले ॥
त्या सरशीं जागी झाली । " हें स्वप्न " तिला मग आली ॥ कल्पना ॥
स्वप्नांत जोडिले हात । जागृतींत होते दिसत ॥ ते तसे ॥
त्या आम्र-फळांचा वास । मोहवूं तिच्या हृदयास ॥ लागला ॥
" हा चमत्कार नाहीं कां ? । वाटणार नाहीं लोकां ॥ पण खरा ॥
देवावर भक्ती ज्यांची । त्यां पटते दृष्टांताची ॥ सत्यता " ॥
बोलून असें ती लीला । करि देवाच्या प्रतिमेला ॥ वंदन ॥
तों प्रतिमेवरलें पुष्प । करिं गळे, म्हणे ती हर्ष ॥ होउनी— ॥
" मजसि हा । प्रसादाचि अहा ! । दिला कीं पहा ! । आज देवांनीं ॥
प्रभुराज ! आपुली करणी ॥ अघटित " ॥

*　　*　　*　　*

काकूंना कळुनी आलें । कीं सुनेस कांहीं झाले ॥ दिवसही ॥
पांढऱ्या खणाची चोळी । तिज शिवुन सुखें त्यावेळीं ॥ बोलल्या— ॥
" होउंदे खणाचा शकुन । डोहाळजवणहि छान ॥ पाहुंदे ॥
लाजून किती बघशील । झाल्यावर घेशिल बाळ ॥ कौतुकें ॥
अति तुला । लागुनी ळळा । लागशिल मुलां । खेळवायाला ॥
वाटेल तुच्छसा तुजला ॥ स्वर्गही " ॥

*　　*　　*　　*

लागतां तिला डोहाळे । थाटांत तिचे सोहाळे ॥ करविले ॥
समजलें गृहीं सर्वांना । लीलेला नवरा महिना ॥ लागला ॥
लागलें दुखूं पोटांत । प्रसुत-काळ तो अत्यंत ॥ कठिण कीं ॥
तिज धीर दिला काकूंनीं । आणविली बोलाऊनी ॥ सुइणिला ॥
तों आली कळ जोरानें । त्याक्षणीं नेत्र लीलेनें ॥ फिरविले ॥
गहिंवरुन काकुंना आलें । अश्रूही त्यांचे गळले ॥ शिरिं तिच्या ॥
घाबरी जाहली लीला । पुत्ररत्न ये जन्माला ॥ तोंच कीं ॥
फोडिला मुलानें टाहो । मंडळी बोलली "ओ ! हो !" ॥ त्याक्षणीं ॥
आनंद होय सर्वांस । तेजस्वी त्या बाळास ॥ पाहतां ॥
राउळीं । शर्करा भली । सुखें वांटली । विष्णुपंतांनीं ॥
शंकरास एकादशणी ॥ करविली ॥

## प्रकरण दहावें.

### लीला आणि शशी !

ती लीला झाली माता । जन्मतां मुलांवर ममता ॥ वाढली ॥
आठवला सासुरवास । एकांत विपुल लीलेस ॥ लाभतां ॥
ती म्हणे "याच खोलींत । त्या एके काळीं रक्त ॥ सांडलें ॥
तो खिळा याच दाराचा । कीं ठाव जयें रक्ताचा ॥ घेतला ॥
तेंच हें दार कीं ज्यानें । ढोलाच्या आवाजानें ॥ भिवविलें ॥
येथूनच वैतागून—। चालले,.... नको तें स्मरण ॥ छेः नको ॥
तो प्रसंग पहिला तसला । हा प्रसंग आतां असला ॥ मंगल ॥
जें मनीं न किंवा ध्यानीं । तें मंगल दृश्य घडूनी ॥ ये इथें ॥
या याच झरोक्यांमधुन । त्यावेळेला शशिकिरण ॥ आंत ये ॥
लाविला झरोंका तरिही । या बालमुखीं हलुं येई ॥ संप्रतीं ॥

बाळ ! हा तुझा मामा रे । जावया नको सामोरे ॥ कां तुला ॥
केलेस हांसरे गाल । हें पुरें ! पुरें ! लागेल ॥ दृष्ट कीं ॥
हांसतोस वारंवार । शब्द ना मुखाबाहेर ॥ एकही ॥
बघ, रुसून मामा गेला । हा असाच त्यावेळेला ॥ एकदां ॥
' बंधु ' त्या प्रसंगीं म्हटलें । मामाचें नातें जडलें ॥ नविन हें ॥
त्यावेळीं हा दुःखांत । यावेळीं आनंदांत ॥ भेटला ॥
तेव्हांची स्मृति देण्याला । वाटतें पुन्हां हा आला ॥ या स्थळीं ॥
जरि शिरलें वैभवधामीं । विसरेन कशी आतां मी ॥ तरि तया ॥
माझा हा भोळा भाव । ' शशि ' ठेव मुलाचें नांव ॥ म्हणतसे ॥
करतांच असा उच्चार । हंसलास बालका ! मधुर ॥ किति पहा ॥
नांव हें तुला आवडलं । असं असं, असे गुणि बाळ ॥ कितितरी ॥
आजच्या मुहूर्तावर मी । ' शशि ' नांव ठेवलें नामी ॥ हें तुझें ॥
गालांत तोंच तूं हंसुनी । पाहसी मुठी वळवूनी ॥ मजकडे ॥
कोणत्या जन्मिची इतकी— । ओळख ही, मज वाटे कीं ॥ नवल हें ॥
वात्सल्यें पाहे आई । बाळरे ! नवी नवलाई ॥ ही तुझी ॥
वाटे हें जीवेंभावें । बाळरे ! तुला चुंबावें ॥ हें असें ॥
या अशा बाहुपाशांत । कवटाळुन असतां घेत ॥ मी तुला ॥
जो हर्ष मनाला होई । समजेल तिला जी आई ॥ जाहली ॥
रडतोस असा कां म्हणुनी । असतां तुज आनंदूनी ॥ घेत मी ॥
खालती हवें पहुंडाया । म्हणुनी कां बाळ ! रडाया ॥ लागशी ॥
ठेवतांच थोडें खालीं । पडलीच मनोहर गालीं ॥ ही खळी ॥
मिळतांच तुला स्वातंत्र्य । मावेना गालीं हास्य ॥ या तुझ्या ॥
ही स्वतंत्रता प्रिय तुजला । परवशता तर आम्हांला ॥ नित्य रे ! ॥
जन्मदाच केवळ आई । बाळ मातृभूमी नाहीं ॥ ही तशी ॥
तुज हिचा सदा आधार । माझ्याहुन आहे थोर ॥ मातृभू ॥

जरि हवें तुला स्वातंत्र्य । कां ? नको हिचें दारिद्र्य ॥ जावया ॥
झाल्यावर मोठा बाळ ! । स्वातंत्र्यास्तव करशील ? ॥ यत्न का ! ॥
केलेंस किती रे ! हास्य । समजतें तुला हें काय ॥ बोलणें ॥
शाहण्या गुलामा किति रे !। इतक्यांत मलुल मुख का रे ॥ हें तुझें ॥
मीं गुलाम म्हटलें म्हणुनी । पाहतोस रागाऊनी ॥ काय रे ! ॥
मीं लटकें म्हटलें तुजला । इतक्यांत अरेरे ! हंसला ॥ हा किती ॥
'रक्षीन मातृभूमीस' । वळवून मुठी म्हणतोस ॥ कायरे ? ॥
जणुं म्हणशि पाय हलवून । "देशास्तव उडि घेईन ॥ ही अशी" ॥
नृपराज शिवाजी, बाजी । मावळे वीर, तानाजी ॥ रणपटू ॥
मातृभूमिच्या सेवेला । कंटाळा त्यांनीं केला ॥ नच कधीं ॥
बाळ तूं तशी धर हांव । गाजीव सद्गुणें नांव ॥ या जगीं ॥
हंसलास किती गालांत । समजाया कां इतक्यांत ॥ लागलें ॥
खेळविशी या आईशीं । किति बाई ! बाई ! करिशी ॥ भावना ॥
दे गोड एकदां पाहूं । मी होउन आधीं घेऊं ॥ कायरे" ॥
कौतुकें । घेइ ती मुके । होउं ना शके । शांति लीलेची ॥
'हुरहूर सदा' प्रेमाची ॥ ही स्थिती ॥

---

# प्रकरण अकरावें–बारावें

## "ओहो ! दिवाळी !"

गृहवृत्त समजलें मधुस । आला तो इंटर पास ॥ होउनी ॥
थाटांत बारसें झालें । जन गांवांमधले आले ॥ उत्सुकें ॥
लीलेच्या मनिं जो भाव । त्याप्रमाणेंच "शशि" नांव ॥ ठेविलें ॥
नउ हजार रुपये आले । त्या दिवशिं लॉटरीमधले ॥ नवल कीं ॥
'शशि' नांवाचा हा शकुन । सर्वांनीं हें बोलून ॥ दाविलें ॥

लीला तर आश्चर्यानें । बघुं लागे आनंदानें ॥ सारखी ॥
हर्षाच्या अतिरेकांनीं । रडली ती भरलीं नयनीं ॥ आंसवें ॥
" नउ दिवस दिवाळी उरली । आदरें म्हणुन पाठविलीं ॥ पाकिटें ॥
' येणार अम्हीं त्या वेळीं ' । हीं अशीं सकाळीं आलीं ॥ उत्तरें ॥
यशवंत, दिवाकर मित्र, । मामाही परमपवित्र ॥ मंडळी ॥
भेटतील आनंदांत । दिपवाळी करुं थाटांत ॥ साजरी " ॥
" दादा ! तूं अति भाग्याचा । करि वृष्टी आनंदाचा ॥ मेघ हा " ॥
" कारण या सर्वा देव । आणखि हें त्यास सुदेव ॥ समज तूं ॥
ही जोडी असली म्हणजे । माधवा ! मनीं इच्छूं जें ॥ तें मिळे" ॥
" लागलास बोलूं म्हणजे । तुजकडे लक्ष हें माझें ॥ वेधतें " ॥
" आई ! हा शिकला असुनी । आहे कवि उत्तम आणी ॥ लेखक" ॥
" आहेच तसा हा शिकला । त्यामुळें धन्यता मजला ॥ वाटते " ॥
" बाबा हो ! इतकें असुनी । हा नाहीं व्यसनीं, मानी ॥ अल्पही" ॥
"स्तुति पुरे पुरे झाली ती । करितसे गुणांची माती ॥ स्तुति-सुरा" ॥
" दादा ! जे सद्गुण दिसले । त्यांचें मीं वर्णन केलें ॥ योग्य तें ॥
आहेत तुझ्यासम थोर । नाहींतच ते फुगणार ॥ स्तुतिमुळें ॥ "
बोलती । विनोदांत तीं । सुखें नांदती ॥ होय सौख्याचें ॥
संसार-चित्र लीलेचें ॥ हें दुजें ॥


* * * *

आजचा पहा हा थाट । मात्रागणरूपी पाट ॥ ठेविले ॥
हीं काव्य ओळिचीं पानें । शब्दार्थरूप पक्वान्नें ॥ वाढिलीं ॥
रसिकांनो ! या ठायीं या । प्रेमानें मागोनी घ्या ॥ भीड कां ॥
ही माझी कविता-रमणी । वाढाया घेइल मधुनी ॥ आपणां ॥
हा प्रसाद-रस हो ! सेवा । सावकास आतां जेवा ॥ भक्तिनें ॥

विनवुनी ।
हात जोडुनी ।
स्वता येउनी ॥
कवी पंक्तींत ॥
रसिकांस असे हा करित ॥ आग्रह ॥

*　　　*　　　*　　　*

भद्रंकर्णेभिः शृणुयाम देवाः भद्रं पश्ये माक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरंगेस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥



रा. क्र. ७८२५

समाप्त.




" लीलेचा-संसार "

हें काव्य खालील पत्त्यावर मिळेल.

गोपाळब्रदर्स–बुकसेलर्स

तुळशीबाग रोड, पुणें नं. २.

एस्. डी. वैद्य, लक्ष्मी रोड

नंबर २ पुणें.

वि. ग. भागवत आणि मंडळी,

नंबर २ पुणें.

परचुरे पुराणिक आणि मंडळी,

माधवबाग मुंबई.

उद्धार !

सुप्रसिद्ध कवि श्री. मनमोहन


किंमत आठ आणे. पुणें.

स्पृश्यअस्पृश्यांच्या विषया-

वर लिहिलेलें खंडकाव्य.

सर्व प्रासिद्ध बुकसेलरकडे

मिळेल.


REFBK-0004726

REFBK-0004726